नागपूर प्रकाशन क्रमांक—३७

# " शापित आणि उःशापित "

( कथा संग्रह )

लेखिका—

सौ. इंदुमती शेवडे, एम. ए.

M83.1
S558

नागपूर
प्रकाशन

[ किंमत २ रुपये

UNIVERSAL LIBRARY
OU_192442
UNIVERSAL LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M331 3555 Accession No. M659

Author शेणडे, कृष्णा.

Title स्वामित्व भाग 3. स्वामित्व.

This book should be returned on or before the date last marked below.

प्रकाशक—

**वि. मा. घुमाळ**

नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर

●

मुद्रक—

**ल. म. पटले**

रामेश्वर प्रिंटिंग प्रेस, सीताबर्डी, नागपूर

# प्रस्तावना

कोणत्याहि पुस्तकाला प्रस्तावना लिहावयास घेतल्यावर, प्रथम अशा प्रस्तावनेची आवश्यकताच काय, असा नकारापेक्षी प्रश्न स्वतःला विचारण्याची प्रथा आहे. लघुकथासंग्रहांच्या बाबतींत हा प्रश्न विशेषच न्याय्य ठरेल. शिवाय, प्रस्तुत संग्रहाच्या लेखिका सौ. इंदुमती शेवडे या अनेक मासिकांच्या वाचकाच्या चांगल्या परिचयाच्या आहेत. तेव्हां, त्यांच्या संग्रहाला अशा प्रस्तावनेची वास्तविक कांहीच आवश्यकता नाही. परंतु, कांही विशेष कारणासाठी या संग्रहाला कांही तरी प्रास्ताविक असावें, असे आम्हां दोघींनाहि वाटले. व बऱ्याच चर्चेनंतर ते प्रास्ताविक मींच लिहावें, हे ठरलें. म्हणून, हे चार शब्द.

सौ. इंदुताईनी आजपर्यंत पुष्कळच कथा लिहिल्या आहेत. त्यांची जीवनाकडे पहाण्याची दृष्टि चिकित्सापूर्ण व बुद्धिनिष्ठ आहे; तशीच ती उदारहृदयाहि आहे. जें भोवतालीं दिसतें त्यावर विचार करण्याची, जरा गैरसोयीचीच संवय त्यांना जडली आहे. सामाजिक प्रश्नांच्या विश्लेषणाच्या द्वारें, परिस्थितीच्या मुळाशी जाऊन, तिथे जे दिसेल तें, फारसे न बिचकतां पाहण्याची शक्ति त्यांच्यामध्ये आहे. साहित्यगत लालित्य त्यांच्या ओळखीचें आहे. तशीच कायद्यामध्यें आवश्यक असणारी शास्त्रशुद्ध दृष्टि व अभ्यासुपणाहि त्यांना लाभला आहे. त्यामुळे, त्यांच्या एकंदर लिखाणांत विविधता आढळून येते. परंतु, प्रस्तुत पुस्तकांत आपल्या एकाच विशिष्ट प्रकारच्या कथा त्यानी संग्रहित केल्या आहेत. व त्या म्हणजे प्रेमविषयक कथा.

अनेक 'वादां'नीं व अनेक प्रकारच्या संघर्षानी व्यापलेल्या आजच्या काळांत निव्वळ प्रेमकथांचा संग्रह किती वाचकांना रुचेल, याविषयीं लेखिकेचे मन साशंक आहे. परंतु, एकतर बहुतांश वाचकांची आवड व वाचनविषयक वृत्ति लक्ष्यांत घेतली तर अशी शंका येण्याचें कारण दिसत नाही. व त्यापेक्षांहि महत्वाची गोष्ट ही की सौ. इंदुताई शेवडे यांच्या या प्रेमकथामध्ये एक

विशिष्ट दृष्टिकोन आढळून यतो. कोणातरी दोन व्यक्तींच्या प्रेमाची कथा रंगवून वाचकाला क्षणभर गुंगवून टाकण्याच्या हेतूने या कथा लिहिलेल्या नाहीत. भोवतालच्या जगांत लेखिकेला तऱ्हतऱ्हेचे संसार दिसून येतात; तऱ्हतऱ्हेचे व्यक्तिसंबंध आढळतात. त्यापैकी बहुतेकांमध्ये कांहीतरी खुपणारे असतें—कुठे विसंगतता, तर कुठे अन्यमनस्कता, कुठे प्रीतिविषयाबद्दल भलतींच अपेक्षा तर कुठें प्रेमविषयक जाणीवेचाच पूर्ण अभाव. हे असें का असावें, असा प्रश्न लेखिकेला अनेकदा पडला असावा. यापैकी कित्येक समस्या समाजाच्या कोणत्याहि परिस्थितीत न सुटणाऱ्या आहेत अशा भावनेतून 'शापित' ही पहिली कथा स्फुरलेली दिसते या कथेमध्ये लेखिकेचा प्रीति विषयक दृष्टिकोनहि स्पष्ट झालेला आहे. त्या कथेतील दोन कल्पित दैवी जीव, मन्दार आणि कल्पना, हे जणु प्रेमी जनाचे प्रतीक आहेत. "पुनः त्या मोहाचं आकर्षण वाटणार नाही, असलं आयुष्य राहील तुमचं! एकमेकाचा सहवास कधीच सुखद होणार नाही तुम्हाला." असा शाप घेऊनच ते मानव जन्मांत अवतरले. प्रीति साफल्य किंवा त्याचा विश्रब्धपणा काहीं मानवाना लाभूंच नये, अशी विधियोजना आहे का काय, असे कित्येक मानवी ससाराकडे पाहून इंदुताईंना वाटत असावें. "शापित" या कथेंत अगतिक झालेल्या अशा दोन मानवी जीवांच्या धडपडीचं चित्रण केलं आहे.

या संग्रहांतील बहुतेक कथांमध्ये असे 'शापित' जीव दिसून येतात. त्यांना प्रीतीचा दिव्य भास झाला, परंतु तो वास्तवाने टिकूं दिला नाही. ती दिव्यता त्यांच्या "अनुद्बुद्ध मनांत" दडी मारून बसली व त्यांच्या वास्तव जीवनांत मात्र विपरीतताच भरून राहिली. परंतु तरीहि या शापित जीवामध्ये एक वेगळेपणा उरतो; त्यांच्या मधील अंतर्हित दिव्यत्व त्यांना इतरेजनांपेक्षा वेगळें ठरवतें, अशी लेखिकेची भावना दिसते. इतकेंच नव्हे तर या आपल्या वेगळेपणाचा मान राखून, त्याच्या आधारावरच जीवन आंखण्याचा निर्धार जे करतील तेच उःशापित ठरतील अशीहि भावना या कथांमध्ये दिसून येते. आपल्या अंतःकरणप्रवृत्तींचें पावित्र्य ओळखून त्यासाठीं हिंमतीने सामाजिक

निर्बंधांना तोंड देणें, हा एकच या शापावर उःशाप आहे, असें 'न सुटणारी गांठ' या कथेंत लेखिकेनें सुचविलें आहे. सदाशिवराव व इंदिराबाई यांनी अशी हिंमत केली. व म्हणून परिस्थिति अत्यंत प्रतिकूल असूनहि त्यांना एक प्रकारचें समाधान मिळूं शकलें. हे समाधान किती मोलाचें आहे, परिस्थिति कितीहि बदलली किंवा प्रतिकूल झाली तरी ते एकदां लाभलें तर कसें हरवूं शकत नाही, याचे अधिक स्पष्ट चित्रण 'तिचें थडगें' या भावपूर्ण कथेमध्ये झालें आहे. जॉन व लिझी शापित तर खरेच. पण त्यांनी जी उःशापित अवस्था स्वतः प्राप्त करून घेतली तिचे चित्रण लेखिकेने इतके रम्यपणें वठवलें आहे की तेवढया-साठी तो शापहि शिरोधार्य वाटावा.

या संग्रहातील कथांमध्ये अनुस्यूत असलेला हा विचाराचा धागा लक्ष्यांत येताच या कथांचे वैशिष्ट्य प्रतीत होते, अशी माझी समजूत आहे. ललित साहित्यामध्ये आज प्रेमकथाची वाण आहे, असें नाही. परंतु या बऱ्याच प्रेम-कथा ऐहिकतेने, क्षणिकतेच्या भावनेने पोखरल्या सारख्या वाटतात इंदुताईच्या या कथांच्या मुळाशी प्रेमाच्या चिरस्थायित्वाची आस तरी आहे, त्याच्या मोलाची जाणीव आहे. ते क्षणिक आहे व ऐहिकच आहे असा कोडगा विश्वास त्यात कुठेहि आढळत नाही. कोणाला हा केवळ भाबडेपणा वाटेल; पण काही थोडयाना तरी त्यांतच या कथाची थोरवी आहे, हें पटेल.

तंत्रदृष्ट्या, 'निळासूट' सारखी वस्तुनिष्ठ व सहानुभूतिपूर्ण कथा, किंवा 'टेलिफोनवरील प्रेम' मधील नर्मविनोद, मूलतःच उठावदार आहेत. 'शापित' (१९४६) व निळा सूट (१९४९) या कथाच्या लेखनकालांतील तीन. वर्षांच्या अवधींत लेखिकेच्या तंत्र कौशल्यामध्ये व कथावस्तूवरील प्रभुत्वामध्ये किती विकास झाला आहे, हे कोणाच्याहि सहज लक्ष्यांत येण्याजोगें आहे. या विकासक्षमतेला सौ. इंदुताईच्या जीवनजिज्ञासेची व व्यासंगप्रियतेची जोड मिळाली आहे. त्यामुळे, त्यांच्याकडून पुष्कळ व सुंदर लिखाण होईल, हें निश्चित.

**कुसुमावती देशपांडे**

# आमचीं प्रकाशनें

| | | | |
|---|---|---|---|
| १ माझें कादंबरी लेखन | १॥ | १४ जीवनप्रवाह | २॥ |
| २ वीणा | ३ | १५ हंसदूत | २। |
| ३ लढवय्ये | ३ | १६ मार्क्सवादी अभ्यास | १॥ |
| ४ शककर्ता शालिवाहन | २॥ | १७ इंदिरा | २॥। |
| ५ द्राविडी प्राणायाम | २। | १८ गोल देऊळ | ३ |
| ६ अडेलतट्टू | ४ | १९ दूर कुठे तरी | २॥। |
| ७ प्रत्यय | २॥ | २० जगाला कळलं पाहिजे | ३॥ |
| ८ पुन्हां एकदां | ४ | २१ काल समुद्रातील रत्नें | ४ |
| ९ म्हणे लढाई संपली | १॥ | २२ मधु | २॥ |
| १० दोन प्रख्यात युद्धतंत्रे | २ | २३ लकेरी | २॥ |
| ११ नवीं मूल्ये | ४ | २४ विचित्रिता | २ |
| १२ सखी | ३। | २५ पहिला कवि | १॥। |
| १३ सावलीच्या उन्हांत | ३ | २६ "शापित आणि उःशापित" | २ |

## ज्योतिष ग्रंथ

ले. कै. ह. ने. काटवे

| | | | |
|---|---|---|---|
| १ रवि-विचार | १॥ | ११ गोचर-विचार | १॥ |
| २ चंद्र-विचार | १॥ | १२ शुभाशुभ ग्रह विचार | २ |
| ३ मंगळ-विचार | १॥ | १३ योग-विचार(भा.१) | १ |
| ४ बुध-विचार | १॥ | १४ ,, ,, (भा २) | २ |
| ५ गुरु-विचार | १॥ | १५ ,, ,, (भा.३) | २ |
| ६ शुक्र-विचार (आ.२) | २॥ | १६ ,, ,, (भा.४) | १ |
| ७ शनि-विचार ,, | २॥ | १७ ,, ,, (भा ५) | १॥ |
| ८ ग्रहण विचार | २॥ | १८ योग-विचार (भा.६-७) | २ |
| ९ भाव-विचार (दु.आ.) | २ | १९ अध्यात्म ज्योतिष | १० |
| १० भावेश-विचार | २ | | |

नागपूर प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर—१

कै. पित्याच्या

पूज्य स्मृतीस—

# अनुक्रमणिका


१. शापित .... .... .... .... ९

२. निळा–सूट .... .... .... .... २७

३. किनाऱ्याचं अंतरंग ... .... .... .... ४१

४. अनुद्बुद्ध मन .... .... .... .... ५७

५. न सुटणारी गांठ .... .... ... .... ६४

६. तिचें थडगें .... .... .... .... ७५

७. आजीनं गोष्ट सांगितली .... .... .... ९१

८. टेलीफोनवरचं प्रेम .... .... .... .... ९९

# १. 'शापित'

त्याचा उद्भव झाला तो इथंच, पृथ्वीवर. पण मूळ होतं स्वर्गांत. सूर्यास्ताचा समय. पश्चिमेकडे एक लहानशी टेकडी. सूर्य तिच्या आड नुकताच लोपत होता. फक्त कांही फिकट किरण आकाशांत होते. त्या भोवतालची पिवळी छटाहि अजून आकाशांत घुटमळत होती. उन्हाचे अवशेष कुठंकुठं विखुरले होते. टेकडीखालीं पसरलेलीं हिरवींगार शेतं. त्यांतील कोंवळं गवत वाऱ्याच्या झोतानं मधूनच हादरून जाई. आपसांत झोंबाझोंबी करी. पलीकडील झाडांच्या टोंकावर धांवत्या उन्हाची सोनेरी कड चमके. आकाशांत दोन-चार पांढरे ढग इकडून तिकडे भटकत होते. पक्षांचा किलबिलाट अन् मधूनच ऐकूं येणारा एखाद्या वन्य पशूचा आवाज अस्तकाल सुचवीत होता. सारंच भूल पाडणारं, मोह घालणारं होतं. अन् अशा वेळीं स्वर्गांतील देवदूत मन्दार अन् कल्पना यांच्या मनानं पृथ्वीवर जाऊन भटकण्याचं घेतलं. तीं दोघं निघालीं. भूतळावर आलीं. त्यांनी चोहीकडे नजर टाकली. अत्यंत रमणीय देखावा वाटला त्यांना तो. बराच वेळ इकडून तिकडे बिहार करण्यांत त्यांनी घालवला.

तिन्हीसांजा झाल्या. अंधाराची छटा पृथ्वीला झाकूं लागली. पक्ष्यांचा थवाच्या थवा अनंत आकाशांतून भरारी मारतांना दिसला. मन्दार अन् कल्पना या दोघांना हंसू आलं. तीं एकमेकांना म्हणालीं,–" किती वेडीं पांखरं आहेत हीं! कितीहि उंच भरारी मारली तरी स्वर्गांत थोडंच जातां येणार? परत इथंच यावं लागेल."

ती सारीं पांखरं घरट्याकडे परतत होतीं. झाडं निश्चलपणे उभीं होतीं. मधूनच एखाद्या फांदीवर एखाद दुसऱ्या पक्ष्याचं फडफडणं ऐकूं येई. हळूहळू अंधार वाढूं लागला. प्रकाशमय पृथ्वीचं धूसर अंधःकारांत झालेलं रूपांतर भयानक वाटलं. पण क्षणभरच. निश्चल उभ्या असलेल्या वृक्षांच्या मागून

एकदम प्रकाश फुटला. चंद्रानं हळूच डोकं वर काढलं होतं. हां हां म्हणता तो वर सरकूं लागला. वृक्षांच्या सावलीशीं चंद्राचे किरण पाठशिवण खेळूं लागले. अन् थोड्याच अवकाशांत अगदी शुभ्र चांदणं पडलं. मन्दार अन् कल्पना दोघंहि एका शिळेवर बसून होतीं. ब्रह्मदेवाच्या करणीचं कौतुक वाटलं त्यांना. स्वर्ग-सृष्टीपेक्षा मानवी सृष्टि कांही कमी आकर्षक नाही. आनंदानं बागडत तीं उठलीं. अन् अंमळशानं चोहीकडे पाहत चालूं लागलीं. कांही अंतर चालून जातांच लांब एका गांवाची वस्ती त्यांना दिसली. सीमेवरच सुंदर बाग होती. त्यांतील रातराणीचा सुवास वातावरणांत भरून गेला होता. पांढऱ्या शुभ्र फुलांचे गुच्छ चांदण्यांत जास्तच खुलून दिसले. पलीकडे लताकुंज होता कल्पनेनं तिकडे बोट दाखवलं. दोघांनी तिकडे पावलं वळवलीं. कुंजाभोवती असलेल्या वेलीच्या फांद्या बाजूला सारून त्यांनी आत डोकावून बघितलं. किती विलक्षण दृश्य वाटलं त्यांना तें. आंत एक फरसबंद ओटा होता. त्यावर बसलेली तरुणी मागे रेलली होती मागे बसलेल्या प्रियकरावर तिने आपला भार टाकला होता. तिच्याभोवती त्याच्या दोन्ही हातांचं कडं अन् हनुवटी तिच्या खांद्यावर. गालाला गाल भिडलेले. प्रीतीचं कुजबुजणं चालू होतं. चंद्राकडे बघत तीं बसलीं होती अन् एकमेकांत मग्न होतीं.

तें बघून मन्दार अन् कल्पना क्षणभर निश्चल उभीं राहिलीं. मंदाराची नजर अभावितपणे कल्पनेकडे गेली. स्वर्गीय तेज चेहऱ्यावर झळकत असलेला 'मन्दार' आज कल्पनेला किती आकर्षक वाटला! आपल्या सौंदर्यानें वेड लावणारी अप्सरा 'कल्पना' मन्दारला अत्यंत मोहक वाटली. त्यांची बदल-लेली दृष्टि त्यांनी एकमेकांच्या नजरेंत बघितली. अन् क्षणार्धात ती दोघं मानवी मनोविकारांच्या मोहांत गुरफटलीं. आपल्या स्वर्गीयत्वाचा त्यांना विसर पडला. तीं त्या मोहाला बळी पडली. एकदम मंदारानं कल्पनेला बेभानपणे जवळ ओढलं. त्यांचा तेव्हाच अन् तिथंच अधःपात झाला याची त्यांना एकदम जाणीव झाली.

जड अंतःकरणानं तीं स्वर्गात परतलीं. सर्व साक्षी ब्रह्मदेवाच्या नजरे-पासून त्यांना कांही लपवतां आलं नाही. ब्रह्मदेवाचा कोपाग्नी भडकला. त्या अग्नींत आपण जळून खाक होणार असं त्यांना वाटलं. त्यांनी शरमेनें खाली माना घातल्या. देह थरथरत होता. हात जोडून तीं उभीं होतीं. शाप मिळाला· " तुम्हांला मर्त्य लोकांत तीस वर्षं राहावें लागेल. मानवी मनोविकारांना अगो-दर बळी पडणारा मन्दार याच्या शापाचा अवधि दहा वर्षांनी जास्त राहील. पुनः त्या मोहाचं आकर्षण वाटणार नाही असलं आयुष्य राहील तुमचं! एक-मेकांचा सहवास कधी सुखद होणार नाही तुम्हाला ! ! "

बिचारीं दोघं ! त्यांना 'दे माय धरणी ठाव' असं झालं. ती तेथून तडक निघून गेलीं. स्वर्गाच्या दाराचा उंबरठाहि त्यांनी हिमतीनं ओलांडला. पण शेवटीं दुःखातिरेकांत तिनं त्याच्या कुशींत तोंड खुपसून घेतलं. हताशपणे त्यानं तिच्या सोनेरी केसांवरून हात फिरवला. अन् हाच शापाचा उद्भव ! हीच त्याची सुरवात ! !

* * *

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट. त्या नगरींतील एका श्रीमंत सावकाराकडे आज खूप गडबड चालली होती. खूप वर्षांनंतर त्याच्या अवाढव्य इस्टेटीला वारस जन्मला होता. लोकांची ये जा चालू होती. जिकडे तिकडे आनंद दिसत होता. नवीन अर्भकाचे तोंड बघून सारेजण कौतुक करीत परत जात. गोजिर-वाणं गुटगुटीत पोर, भव्य कपाळ, काळेभोर डोळे, मोहक नाक. 'किती गोड' पोर आहे' असंच सारेजण म्हणत. अर्भकाच्या मातेला किती अभिमान वाटे त्याचा. दृष्ट-बिष्ट लागली बाळाला तर? अन् ती त्याला छातीशीं धरी. सावकार अनेकदा खोलींत डोकावून गेला होता. असं ते नवसाचं नवलाईचं पोर होतं.

* * *

विद्याधर ब्राह्मणाकडे त्या दिवशीं मात्र दुःखाची काळी छाया पसरली होती. जन्म अन् मरणाच्या परस्पर विरोधी घटनांमुळे तो भांबावून गेला होता. त्याच्या पत्नीनं ऐका कोवळया पोरीला जन्म देऊन कांही तासांनंतर प्राण सोडला होता. जमलेल्या चार-चौघी आयाबायांनी सारं उरकलं. पत्नीच्या मृत्युच्या वेदना त्याला असह्य होत्या. एवढा विद्वान् ब्राह्मण-पण गरिबीत जिनं इतकी वर्षं साथ दिली ती गेली, ह्या कल्पनेनं त्याला भडभडून येई. वारंवार दुःखाचा उमाळा उसळे-त्याने खूप शोक केला. पण मागून पोरीची आठवण आली. त्यानं बायांजवळून तिला मागितली. एकीनं आंत जाऊन पोरीला आणलं. दोन्ही हातांनी त्यानं तिला घेतलं. फडक्यांत गुंडाळलेलं आठ तासाचं तें अर्भक. केत-कीचा रंग, चिमुकले डोळे, इवलीशी जिवणी अन् सोनेरी केस. तो तिच्याकडे अधाशासारखा बघत राहिला. तेवढया दुःखांतही पोरीचं सौंदर्य पाहून बरं वाटलं त्याला. मोठया दुःखानं तो म्हणाला, 'अभागी पोरी, एका अप्सरेचं सौंदर्य घेऊन कशाला आलीस या गरीबाकडे ?' अन् अभागी हा शब्द फार बोचक वाटला त्याला ! एकदम त्याला दुःखाचा ज्यास्तच कढ आला. दोन्ही हातांनी तिला लपेटून त्यानं छातीजवळ धरलं. त्याच्या एकल्या जिवाला पोरीचं किती विरंगुळा झाला. तो एक आशेचा किरण होता त्याच्या अंधकारमय जगांत ! समाधानाचा सुस्कारा त्यानं सोडला. तशा स्थितींतच किती वेळ तो बसून राहिला असता; पण एकाएकी त्याचं लक्ष बाहेरच्या दाराकडे गेलं. एक आठ नऊ वर्षाचा मुलगा दारांत उभा होता. त्याची केविलवाणी मुद्रा, श्रांत सुकलेला चेहरा, असहायता ओसडून निघालेली, फाटके कपडे, अनवाणी पाय, सारं कांही बोलकं होतं. पण तें पोर भिकाऱ्याचं नव्हतं. आंत शिरावं किंवा कसं या द्विधा स्थितींत तो उभा दाराशींच घुटमळत उभा राहिला. विद्या-धरांनी त्याच्याकडे बघितलं मात्र अन् त्यांना पाझर फुटला त्यांनी कळवळून विचारलं—

"कशाला आलास बाळ इकडे ?"

" बाळ " हा प्रेमळ शब्द त्याच्या अंतःकरणात भिडला. त्याला एकदम रडूं आलं.

" मामांनी घरातून हाकून लावलंय " तो हुंदका देत म्हणाला.

" आई वडील कुठं गेले ! "

" मला मामांखेरीज दुसरं कोणी नाही. "

अन् त्या दिवसापासून तो विद्याधराकडे राहूं लागला. सारंग म्हणत त्याला ते. वीणा बारा वर्षांची होईपर्यंत तो तिथंच राहिला, तिचं बालपण त्याच्याच सहवासांत गेलं. आयुष्यांतील एक तप वीणेनं त्याच्याबरोबर आनंदांत घालवलं. त्याची बुद्धी तरतरीत होती. वृत्तीनं बाणेदार व स्वभावानं प्रेमळ म्हणून त्यांना तो हवासा वाटे. त्याला विद्याधरांनी शिक्षण दिलं. ते स्वतः विद्वान् पंडित होते. विद्यादानांत त्यांना आनंद होई. सारंगशिवाय त्यांचा एक क्षणहि जात नसे.

* * *

दोन्हीं मुलं भराभर वाढूं लागलीं. दोघंहि आपापल्या परीनं सुंदर होतीं. विद्याधराच्या जीवनाची वीणा जणुं ज्योतच होती. लहानपणीं त्यांच्याभोवती घुटमळत राही, नाचे, बागडे. त्यांनी तिला खूप शिकवलं. आईची उणीव प्रेमानं भरून काढायला ते झटत; पण मातेची उणीव कधीतरी भरून काढतां येते कां कोणाला ? स्त्रीची ऋजुता अन् मार्दवता वीणाच्या आयुष्यांत उतरली नाही. स्त्री जीवनाचा कस अन् रस तिच्या जीवनांत ओतला गेला नाही. ती तारुण्यांत शिरली खरी पण फोंफावलेल्या वृक्षाप्रमाणं स्वैर, बुद्धीनं तीव्र पण वृत्तीनं हूड, अंतःकरणानं हळवी पण वागणुकीत बेदरकार अशी बनली. विद्याधरांशीहि ती जेव्हां वाद घाली तेव्हां त्यांना अभिमान वाटे. पण प्रत्येकाशी वाद करण्याची तिची ईर्ष्या व विजयाचा उन्माद बघितला की, त्यांना अस्वस्थता वाटे. तिचं वाढतं सौंदर्य पाहून त्यांची भीति दुणावे. उद्या लग्न झालं की पतीला

ही वृत्ती कशी चालणार ? पण लग्नाची कल्पना येतांच त्याचं हळवं मन पुढं विचार करण्याचं टाळी. तिच्या विरहाची कल्पना त्यांना असह्य होई. अन् एकदम मन खिन्न होऊन जात असे सारंगहि आता राहिला नव्हता. पुढील विद्याभ्यासासाठी तो काशीस जाऊन राहिला होता.

* * *

विकास-सावकाराच्या इस्टेटीचा वारस-असाच वाढत गेला. मातापित-राच्या डोळ्यांतलं बाहुलं. पैशाला अंत नव्हता. म्हणून त्याच्या लाडांतहि कधी बाध आला नाही. आपलपोटी, कांहीशी स्वैर वृत्ति त्याची बनली. पण बुद्धी तीव्र होती. त्याचा स्वैरपण, बेफिकिरी, स्वार्थ यांच्यामागे दडून बस-लेला त्याचा दिलदारपणा, हळवेपणा मधून मधून दिसून पडे. अतूट संपत्तीची सत्ता असूनही कुरटेपणा, आडमुठेपणा नव्हता. तो देखणा, विद्येची व कलेची आवड असलेला, अन् रूबाबी असा असल्यामुळे लोकांना आवडे. लहानपणा-पासून तो विद्याधरांजवळ शिकायला येई. इतर अनेक मुलं येत. त्यांत ही दोघं पुढे असत. एखादे वेळी तिनं त्याचा वादात पराभव केला तर गर्विष्ट हंसा-प्रमाणे ती ताठरपणा दाखवी. त्याला मग मनस्वी संताप येई व त्याचा वचपा पुनः दुसऱ्या वेळीं तिचा पराजय करून तो काढून घेई. तिला त्या पराजयांतहि अननुभूत आनंद वाटे. त्याची बुद्धीची तल्लख आवडे. पण त्याची श्रीमंती अन तज्जन्य स्वार्थ याचा तिला तिटकारा येई.

* *

अन् अशा प्रकारें भराभर वीस वर्षं निघून गेलीं. विकासला लहानपणापासून शिल्पकलेचा छंद होता. पुढे त्या कलेचं त्याला वेडच लागलं. विद्याधराकडचं शिक्षण आटोपून तो नजीकच्या नगरींत कलेचं पुढचं अध्ययन करण्यासाठी गेला. तीन वर्षानंतर परत आला. तेव्हा वीणा केवढी मोठी वाढलेली त्याला दिसली, तिचं मुसमुसतं तारुण्य तो रोज पाही. तिची त्याला भीति वाटे. पण अनिवार मोह पडे. तिची वृत्ति मात्र अलीकडे बदललेली दिसे. अबोल बनली

होती ती. सदैव कुठल्या तरी विचारांत गढून राही. नाही तर पुस्तकांत डोकं खुपसून बसे. विचार करतांना त्याचा चेहरा तिला समोर दिसे. त्याला समजण्याचा ती प्रयत्न करी. त्याच्या व्यक्तित्वाची फोड करून बघे पण आकलन होत नसे. त्यामुळे निर्माण झालेले असमाधान मात्र वाढत जाई. त्याच्या तारुण्याची ऐट आवडे. त्याच्या सन्निध्याची ओढ वाटत असे.

विद्याधराच्या तें सारं लक्षांत येई. त्यांची अस्वस्थता वाढे. आपल्या मायेची पाखर तिच्या आयुष्यावर घालून कशाला उगाच बंधन निर्माण करायचं ? शेवटीं त्यांनी एके दिवशी वीणेच्या लग्नासंबंधी सावकाराला विचारलं. अप्सरेसारख्या तिच्या लावण्यानं एखादा राजकुमारहि विकत घेतला असता, मग विकासची काय कथा ? त्या दोघांचा जोडा ईश्वरानं मुद्दाम निर्माण केला आहे असं सर्वांनाच वाटे. विकास व वीणा यांनी स्वतःचीं मने पुरीं जागली नव्हतीं. पण एकात तारुण्याची अधीरता तर दुसरींत तारुण्याची बेफिकिरी. दोघंजणं विवाहाने बद्ध झालीं.

" आपण कुठंतरी चुकत तर नाहीना ? " अशी अस्वस्थता दोघांनाहि वाटत होती त्या दिवशीं. त्या रात्री विकासच्या विशाल वक्षःस्थलावर डोकं टेकून वीणा स्वतःला विसरूं पाहात होती. विकासचे दोन्ही हात तिच्याभोवतीं होते. त्याचा गाल सोनेरी केसावर टेकला होता. त्याला कसली तरी हुरहूर लागली होती. मनांत विचार आला, " हेच का वैवाहिक सुख ! " दोघंहि स्तब्ध होतीं.

* * *

लग्नानंतर लगेच आपली शिल्पकला, सारी सामग्री अन् वीणा यांसह दुसऱ्या एका छोटया गांवांत तो जाऊन राहिला. वीणा सर्वस्वी आपल्या एकटयाच्याच वांटयाला यावी असा कांहीसा अस्पष्ट विचार त्याच्या मनांत डोकावला होता त्या वेळीं ! !

अन् त्याच्या खऱ्या जीवनाला सुरवात झाली ती यापुढंच ! कालांतरानं प्रणयाचा उन्माद ओसरला. वैवाहिक जीवनाचं गोड स्वप्न विरलं. बाळपणापासून निर्माण केलेलं दोघाचं असत्याचं जग नष्ट झालं. आपण दुसऱ्या नवीन जगांत जात आहोंत. दोन्ही जगं वेगळीं आहेत हें त्यांना दोघांनाहि कळे. एकमेकांचें तारुण्य अन् सौंदर्य यांविषयी वाटणारं मोहपटलहि आता दूर झालं. वरची झिलई निघून गेली अन् त्या खालीं दडलेलीं दोघांचीं अति विद्रूप, भेसूर स्वरूप परस्परांनी बघितलीं. त्यांना आढळून आलं-त्यांच्या आवडीनिवडी, मनोवृत्ति, स्वभाव, या साऱ्यांत मुळापासून तफावत होती. ती कशी भरून काढावयाची ? हा केवढा प्रश्न होता. तीं अस्सल रूपं त्यांना तिरस्करणीय वाटलीं. आता भोगलोलुप वृत्तीची हौस फिटली होती. शेवटी तिचा वीट आला. प्रणयाची शिसारी आली. प्रणयापलीकडे त्यांचं जीवन जाऊच शकलं नाही. त्यापलीकडे असलेली निर्भेळ, निरागस, निस्वार्थी प्रीति त्यांनी अनुभवली नाही. अन् म्हणून त्यांतून असमाधान निघालं. जीवन हा एक ' अखंड कंटाळा ' वाटूं लागला. त्यांतलं नाविन्य अन् त्याबरोबर आकर्षणहि गेलं उमेदहि गेली. शब्दांची देवघेवहि फारशी उरली नव्हती.

त्यांतील ही शिळेपणाची भावना घालवून टाकण्यासाठी वीणेनं एक दिवशीं विकासला विचारलं, — " मी बाबांकडे जाऊं का विकास ? "

" जातेस ? " त्यानं जडपणे मान वर करून विचारलं.

" हं. "

"कधी ? "

"आजच. "

त्याला उत्तर म्हणून त्यानं होकारार्थी मान हालवली. न कळत सुटकेचा निश्वास टाकला. त्याचा अर्थ वीणेलाहि कळला. मनाला टचकन बोचून गेलं.

त्याच दिवशी तिनं विद्याधरांकडे जाण्याची तयारी केली. संध्याकाळीं बैलगाडी दारासमोर उभी राहिली. गाडींत चढण्यासाठी तिनं पाठ वळवली. तिची पाठमोरी आकृति विकास न्याहाळीत होता. खिन्नतेखेरीज कसलीहि भावना मनांत नव्हती त्या क्षणीं; पण तिची गाडी लांब निघून गेली अन् हातांतील काठीचा टेकू गळून पडावा त्याप्रमाणं निराधार त्याला वाटलं. हात अधांतरी लोंबत राहिला. 'तिला उगीच जाऊं दिलं' असं अनेकदा मनांत आलं. तिच्या नुसत्या साहचर्यात किती शक्ति, किती आधार आहे याची त्याला जाणीव झाली. संध्याकाळी घरांतील सामसूम सोसवेना. त्यानं दिवाहि लावला नाही. खिडकीला टेकून वाटेकडे विमनस्कपणे बघत तो तसाच उभा राहिला.

* * *

घरापासून गाडी लांब जाऊं लागली, तसतशी वीणेच्या जिवाची ओढ वाढत गेली. वाढत्या अंधाराबरोबर खिन्नताहि वाढूं लागली. विकासचं सान्निध्य कंटाळवाणं वाटलं होतं. त्याचा स्पर्शहि सहनीय नव्हता क्षणापूर्वी. पण आता मात्र त्याची तिला राहून राहून आठवण येई. अन् मग ती बेचैन होऊन जात असे 'आपण उगीच निघून आलों' असं तिला कितीदा तरी वाटलं, विषण्णमानानं ती माहेरीं पोचली. वीणेला पाहतांच विद्याधर धावत आले. तिला दोन्ही हातांनी सावरीत 'किती वाळलीस?' असं कायसं म्हणाले; पण वीणेच्या अश्रूंसमोर साऱ्याचा विसर पडला. माहेरी बरेच दिवस तिनं काढले. विकासाशिवाय एकेक क्षणहि काढणं आता तिला कठीण जाई. पण परत जाण्याची आठवण येतांच विकासची तिरस्करणीय, रागीट मुद्रा, त्याची बेफिकिरी, त्याची विषयलोलुपता सारं कांही आठवे. आंगावर कांटा उभा राही. त्या निष्प्रेम जीवनापेक्षा विद्याधराची ममता शतपटीनं बरी असं वाटे. पण कांही काळच. या दुर्बल ममतेवर आपण जगूं शकू का? अन् तेहि किती दिवस? विकासच्या अभेद्य मिठींत कुठलं सामर्थ्य आहे? त्या अभेद्य

कवचांत कुठली सुरक्षितता वाटते ? तो मोह आवरण्यासाठी ती झटे. पग शिवाय रहावेनाच म्हणून एके दिवशी ती विकासकडे परतली.

त्याचा काळवंडलेला चेहरा पाहतांच तिला भडभडून आलं. तिनं त्याच्या दंडाचा आधार घेतला. त्याच्याजवळ हवी असलेली सुरक्षितता आपल्याला मिळाली असं वाटलं. अधीरपणे विकास म्हणाला, " आता पुनः सोडून जाणार नाहीस असं वचन दे मला. "

" तुझ्याशिवाय मी राहूं शकत नाही हे कळलंय, विकास ! " ती कुजबुजली.

* * *

उपचारानं अंगांत मुरलेला रोग क्षणकाल नाहीसा झाल्याप्रमाणे वाटतो, पण कांही काळानंतर पुन्हा त्याचीं लक्षणं उद्भवतात. तद्वतच या दोघांचं झालं. बालपणापासून पडलेली वृत्ति व बनलेली प्रकृति समूळ कशी जाणार ? त्यांच्यांतील विरोध, तफावत कायम राहिली. कांही कालानंतर उलट जास्त जोराने प्रतिक्रिया घडली. पुनः तिरस्कार, असमाधान, कंटाळा सारं कांही जोरानं उसळून वर आलं.

" आपणांस सुखी होतां येणं खरंच शक्य नाही का ? ' असं दोघेहि विचारीत. कांही दिवस ते प्रयत्नशील मेळ व सलोखा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत. सुख जवळ आल्याप्रमाणं वाटे पण किती दिवस ? तिची स्वैर, स्वतंत्र वृत्ति पाहिली की त्याला संताप येई. तिचा चक्काचूर करावासा वाटे. आपण तिचं जीवनसर्वस्व; त्याखेरीज तिला दुसरं कांही नसाव असं मनापासून वाटे. तिचं विद्येचं प्रेम, स्वावलंबी वृत्ति, तिचं वेगळं अस्तित्व याची त्याला चीड येई. तिला चिरडून टाकण्याचा तो प्रयत्न करी. उलट त्याचं विषयी प्रेम तिला नकोसं वाटे. प्रीतीची भूक तिला होती प्रणय नकोसा होता त्याला तृप्ती आहे. त्याच्यामागे कंटाळा आहे असं तिला वाटे. त्या वेळीं तिला

स्वतःच्या सौंदर्याचा राग येई. ती स्वतःचं वेगळंच जग आहे असं मानी. त्याच्यापासून दूर राहूं पाहत असे.

त्यांच्यांतील विरोधाला, भिन्नतेला, असंतोषाला अंत नव्हता. त्या स्थितीतून दोघंहि पळवाट शोधूं लागली. विकासला शिल्पकलेचा आधार होताच. तो त्यांत तासन्तास घालवी. स्वतःला त्यांत विसरून जाण्याचा प्रयत्न करी. दगडातुन तऱ्हेतऱ्हेचं कौशल्य तो निर्माण करी-त्या वेळीं त्याला जास्त खिन्नता वाटे. मनात येई, "आपल्याला ही कला अवगत आहे. जीवनकला मात्र जाणली नाही आपण." अन् तो दुःखी होई. तो खोलींतच राही नेहमी. पण वीणेच्या सान्निध्याची मात्र जाणीव राहत असे. कुठल्या तरी गूढ बंधनानं दोघांना जखडून टाकलं आहे असं त्याला वाटत राही. त्या वेळी त्याची दृष्टि तयार केलेल्या वीणेच्या पुतळ्यावर स्थिर होई. दोन वर्षापूर्वीची शिल्पकृति होती ती. अनेकदा तो मूर्तीकडे पहात बसला राही. विचारांत देहभान विसरून जाई. साऱ्या जुन्या गोड आठवणी येत. वीणेत त्यानं पूर्वी बघितलेल्या सर्वांगसौंदर्याचं प्रतीक होतं ते. त्याची ती काल्पनिक वीणा, अन् सत्यसृष्टींतील वीणा दोन आहेत वेगवेगळ्या! याचं त्याला दुःख होई. जिच्यांत पूर्वी हें सौंदर्य आपण बघूं शकलों तिच्याविषयी ही तिरस्काराची भावना कां? ती कां काढून टाकतां येत नाही? तिचा पगडा इतका जबरदस्त कां? अन् शेवटीं ईश्वरानं या दोन परस्परविरुद्ध जीवांचं जीवन एकत्र कां जखडून टाकावं-? हें कोडं मात्र उलगडत नस दैवाशीं खेळलेल्या शर्यतींत आपण हरलों. यांतून आता सुटका नाही-' फक्त मृत्यूंतूनच! त्याशिवाय नाही; ही कल्पना त्याला हताश करून सोडी. अन् आंतल्या आंत जिवाचा कोंडमारा होई. हातांतली टाकी तो फेकून देई.

* * *

वीणेनं विरंगुळा शोधला तो पुस्तकांत. विद्याधरामुळं विद्येची लागलेली अभिरुचि कायम होतीच. पुस्तकांत डोकं खुपसून ती तासच्या तास बसे. पलीकडच्या

खोलींतून विकासच्या हातोडीचा 'ठक्ठक्' आवाज येई. त्या आवाजाची तिला एक प्रकारची सोबत वाटे. मधूनच वाचनाचा कंटाळा आला की, ती खिडकी-बाहेर डोकावून बघे. समोरील हिरवीगार शेतं, मोठमोठाले वृक्ष, निळं आकाश, अन् लांब दिसणारे क्षितिज तिच्या मनांत नाना तऱ्हेचे विचारतरंग उठवीत. जवळून खळखळ वाहणारी नदी क्षितिजापलीकडे कुठंतरी अदृश्य होई. त्या प्रवाहाबरोबर जाऊन बघावं असंहि वाटे. नदीच्या पाण्यांत पडलेली आकाशाची पडछाया पाहतांच जिवाला कसली तरी, अनंताची ओढ लागून राही. कुठल्या-तरी अचाट शक्तीचं अस्तित्व अन् साक्षित्व तिला भासमान होई. जगाला सोडून कुठंतरी आपल्या खऱ्या दुसऱ्या जगांत जावं असं तिला वाटे. पण कुठं ? हें मात्र कळेना. अन् ती खूप अस्वस्थ होई. विद्याधरांचाहि आधार नाहीसा झाला होता. नदीच्या कांठावरील शेतांत चिमण्या आपल्या चोंचींत भरून आणलेले दाणे कोंवळ्या पिल्लांना भरवीत. तें दृश्य पाहून तिला हूरहूर लागून राही. उरांत अस्पष्ट, असंदिग्ध संवेदना उठूं लागत. विकासपासून आपणांसहि एखादा असला चिमणा जीव मिळाला असता तर ? त्या चिमुकल्या पिलानं दोघांच्यांतील तफावत नाहीशी केली असती—अन् अशा प्रकारें हळूच विकासची आठवण मनांत शिरकाव करी. इतका विजोड असूनहि विद्याधरांना आपला जोडा ईश्वरनिर्मित वाटावा ? मनापासून विकासचा तिटकारा असून त्याची कला, तारुण्य व संपत्ति यांच्या क्षणिक मोहाला आपण बळी पडलों. विधीनं हा सूड घेतला असंच वाटे. पण आता काय त्याचं ? मृत्युनं तरी या असुखाचा शेवट होईल. ही कल्पना येतांच तिला उदास वाटे. मृत्यु हवासा वाटूं लागला. शरिरानं ती खंगलीच होती. मन तर केव्हाच पोखरून निघालं होतं.

* * *

अशा अवस्थेंत त्यांच्या वयाचीं तीस वर्षें पुरीं होत आलीं. मानसिक क्लेश व यातना यांनी दोघांचं जीवन नष्टप्रायः झालं होतं.

एके दिवशीं वीणेच्या कानावर बातमी आली की, गांवांत एक विद्वान् तरुण पंडित आला आहे. त्यानं अनेकांना वादांत जिंकलं होतं. शिष्यहि त्याला लाभले होते. त्याचं सारं आयुष्य विद्याभ्यासांत गेलं होतं. धर्माचा प्रचार करीत तो हिंडे. मठस्थापनेचा त्याचा हेतु होता. जुन्या देवीच्या देवालयासमोर तो प्रवचन देणार होता. ती लगबगीनं जायला निघाली प्रवचनासाठीं. रात्रीचा दिवे-लागणीचा सुमार होता. मंदिरासमोरच्या भव्य पटांगणांत सर्वजण बसून होते. प्रवचन चालू होतं. ती हळूच जाऊन बसली प्रवक्त्याचं तोंड दुसरीकडे होतं. त्याचं वाक्य कानावर पडलं मात्र अन् तो आवाज तिला ओळखीचा वाटला. खणखणीत आवाजांत ते सांगत होते,—" ' सत्य, अहिंसा, परोपकार ' या तत्त्वांवर जगांतील साऱ्या धर्मांची उभारणी आहे. तीं तीन सनातन तत्त्वं··· दुसरं वाक्य अर्धवटच राहिलं. त्यांनी दुसऱ्या भागांतील अर्ध्या प्रेक्षकांकडे तोंड वळवलं होतं. त्यांची नजर क्षणभरच वीणेवर स्थिरावली. मनाची एकदम चल-बिचल झाली. वाक्य अर्धवट कां राहिलं म्हणून वीणेनं बघितलं अन् त्यांची दृष्टादृष्ट झाली. किती दचकली ती. सारंग होता तो ! त्याचं तें भव्य कपाळ, तरतरीत नाक, डोळ्यांतून ओसंडणारं विद्वत्तेचं तेज, सारं कांही तसचं होतं. पण जास्त काळवंडून गेला होता तो. ती बारा वर्षांची असतांना सारंग विद्या-धरांचं घर सोडून गेला होता. तेव्हाच्या त्याच्या मुद्रेचा ठसा तिच्या मनावर होता. पण अस्पष्टपणें. तेव्हाच्या जुन्या स्मृति जागृत झाल्या. तिला एकदम भडभडून आलं. ती तिथं थांबली नाही. तडक उठून घरीं परत आली. सारी-कडे अंधारच होता. विकास शिलागारांतच होता. कारण त्याच्या टांकीची ठकठक स्पष्टपणे ऐकूं येत होती. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघून ती परत गेली.

ती रात्र तिनं तळमळून काढली. दुसरा दिवस तसाच उदासीनतेंत व विमनस्कतेंत गेला. जुन्या आठवणी पुनः उजळू पाहात. त्यांना अजीबांत पूसून टाकण्याचा ती यत्न करी. पण शेवटीं राहवलं नाही. रात्रीं अकराचा सुमार

होता. विकास नुकताच झोपला होता त्यांची ती रुंद छाती, त्यावर दुमडून-धरलेले हात, कपाळावर विखुरलेले केस हें सारं तिनं बघितलं जातांना. मोहक वाटलं तिला ते. पण मोह पडला नाही त्याचा फक्त त्या हृदयांत आपणासाठी कुठं कोपरा नाही, आडोशाची जागा नाही, याचं तिला दुःख झालं. ती झटकन् निघून गेली. झपाझप पावलं टाकीतच देवालयांत शिरली. बाहेरच्या पायरींजवळ पुजारी झोंपला होता. आंतल्या गाभाऱ्यांतून मंद प्रकाश येत होता. हळूच ती आंत शिरली व उंबरठ्यावर उभी राहिली. सारंग एकटा वाचीत बसला होता. समयी तेवत होती. त्याची पडछाया भिंतीवर पडली होती. समईच्या त्या निस्तेज प्रकाशांत त्याचा प्रेमळ, शांत चेहरा स्पष्ट दिसत होता. तिनं हळूच हांक मारली. "सारंग!" ती ऐकू जाण्याइतकी स्पष्ट नव्हती. पण कसल्या तरी सान्निध्याच्या जाणिवेमुळं त्यानं दचकून वर बघितलं, विचारलं, "कोण, वीणा?"

"हं! मी आलेय्" असं,कसंबसं उच्चारीत ती त्याच्याजवळ जाऊन बसली.

"किती खंगलीस तूं! कशानं तुझं सारं सौंदर्य गेलं? काल रात्रीं बघितलं तेव्हा डोळ्यांना ओळख पटली नाही. तेव्हापासून मुळीच चैन पडलं नाही." त्याच्यास्वरांत अखंड प्रेमळपणा होता.

यावर ती बोलली नाही. अंमळशानं थांबून तिनं म्हटलं, " सारंग, तूं उद्या पहाटे जाणार असं ऐकलं अन् म्हणून धावत आले. मलाहि येथून ने आपल्याबरोबर. नाही म्हणूं नकोस."

"पण कुठं?"

"जगांत तूं जिथं जाशील तिथं. वाटेल तिथं."

"पण मी असा भटकत राहणार. तूं माझ्याबरोबर कशी येऊं शकशील? मला सारं नीट सांग. तूं विकासला सोडून जाणार असं म्हणते आहेस का?"

हुंदका देत मानेनेच तिनं ' हूं ' म्हटलं. त्या एका अस्पष्ट शब्दांत किती असीम यातना भरल्या आहेत हे त्याला स्पष्ट दिसत होतं.

" कशी राहूं तिथं ? सारंग, मी व विकास दुःखी आहोंत रे ! एकहि दिवस सुखांत गेला नाही आमचा. कधी पटलं नाही. शारीरिक प्रणयापलीकडे खरं प्रेम कधी मी अनुभवलं नाही. किळस वाटते मला त्याची. उपभोगाचं गमक इतकीच त्याची किंमत आहे. आता नुसता तिरस्कार उरलाय एकमेकांसाठी. प्रत्येकाच्या हृदयाचे तुकडे झाले आहेत. ते सांधतां येत नाहीत. आपसांतील भिन्नता काढतां आली नाही. अन् म्हणून हृदयहि भिन्न राहिलीं ! मग कशी राहूं ? कशासाठी ? अन् कुणासाठी तें सांग. देवाचा शाप तर नाहीना हा असं वाटतं. बाबा माझं दुर्भाग्य पाहून स्वर्गात तळमळत असतील. "

ती बेभानपणें बोलत होती. दुःखाचा अतिरेक झाला होता. तिचं खंगलेलं शरीर पाहून त्याला कसलीशी भीति वाटली. हळूवारपणें तो म्हणाला.

" अशी बेभान होऊं नकोस, वीणे ! माझं जीवन बघ ? मी कुठं कधी प्रेम अनुभवलं आहे ? कुठलं सुख मला लाभलंय ? विद्याधरांखेरीज कुठली दुसरी ममता मला ठाऊक आहे ? अन् आज विद्याधरहि गेले. पण मानवी जीवन हे नुसत्या प्रीतीसाठीच आहे का ? केवळ सुखासाठीच आहे का ? प्रीति ही मोठी शक्ति आहे खरी; पण मानवी जीवनाचा हेतु उदात्त आहे. प्रीति त्याचं साधन आहे, साध्य नाही. माझ्यासारखं कठोर मन कर. माझ्या मार्गात मोह पाडूं नकोस. विकासच्या प्रीतिविरहित तुझ्या जीवनालाहि वेगळीच किंमत आहे हें ओळख, वीणे ! मानवी जीवन कांही उदात्त तत्त्वासाठी आहे. तें हिणकस नाही. फार श्रेष्ठ आहे."

तो आवेशांत बोलत सुटला. मागून त्याला जाणीव झाली की वीणेनं त्याच्या मांडीवर डोकं टेकलं होतं. तिचे अश्रू मांडीवर पडत होते. तो तिच्या केसावरून हात फिरवीत होता. त्याच्या आवाजांतील कठोरता

परंतु जिव्हाळा, उत्कंठा तिला जागवत होती. तिनं मान वर करून अश्रू पुसले. म्हटलं, " सारंग, मी जातें. पण माझ्यांत मानवी जीवनाचं सामर्थ्य नाही. " ती निघून गेली. तो तिच्याकडे पाहातच राहिला.

शिक्षकानं वर्गांत दिलेला पाठ मुलाच्या बौद्धिक ताकदीच्या पलीकडचा, आकलनशक्तीच्या पलीकडचा असल्यास मुलाची जी केविलवाणी, बावरलेली स्थिति होते, तद्वतच वीणेचं झालं.

ती परतली. पण हताश, भग्न झालेल्या मनःस्थितींत. सारंगकडे जातांनाचा तिच्या धापांतील जोर कोठच्या कोठे जाऊन त्याऐवजी निराशेचा जडपणा आला होता. घरांत येऊन ती बिछान्यावर पडली. डोळे मिटून घेतले. आयुष्यांतील आशांचे किरण लोपून गडद अंधकारच फक्त राहिला होता. सुटकेचे सारे मार्ग तिला बंद दिसले. त्यापलीकडे ती जाऊं इच्छीत होती. फक्त एकच मार्ग उघडा दिसला. शेवटीं तिथूनच तिला जायचं होतं हें तिनं ओळखलं.

मध्यरात्रीं वीणेनं हांक मारली होती, 'विकास !' ती विलक्षण साद ऐकून तो दचकून उठला.

" काय म्हणतेस ? " पुनः आवाज मिळाला नाही. भीतिची संवेदना त्याला झाली. तो उठून तिच्याजवळ गेला. खालीं वांकून बघितलं. उशाशीं जळत असलेल्या दिव्याचा फिक्कट प्रकाश तिच्या चेहऱ्यावर पडला होता'. मरणाच्या क्लेशाचं प्रतिबिंब तिच्या चेहऱ्यावर पडलं होतं. त्यावरील अनंत भावांचं गूढ त्याला उमजलं. त्यानं तिचा हात दाबला. त्या स्पर्शांतून विकासच्या मूक भावनांची तिला ओळख पटली. जे इतके दिवस शोधीत होतों ते मृत्यूंतून मिळावंना ? खिन्न हास्याची सूक्ष्म रेषा तिच्या चेहऱ्यावर उमटली होती. निर्बलपणे तिनं म्हटलं, " विकास, सारंग म्हणतो मानवी जीवन केवळ प्रीतीसाठी नसून कांही उदात्त ध्येयासाठी आहे. खरं का हें ? "

"कुठं भेटला सारंग तुला? तूं काय बरळतेस हे?"

"कांही नाही. माझं इकडचं दुर्दैवी आयुष्य संपलं. मी जाते, विकास!" तिचे डोळे आपोआप मिटत होते.

—"कुठं चाललीस, वीणे?" त्यानं कातरतेनं विचारलं. तिनं कामचेच डोळे मिटले. तो स्फुंदून स्फुंदून रडूं लागला.

* * *

आपल्या उर्वरित आयुष्याचीं वर्षं विकासनं कशीं घालवलीं असावींत? वीणेच्या पुतळ्याजवळ तो नेहमी बसून राही. वाटल्यास एखादे वेळीं हातांत हातोडी घेई. पण तिचा लवकरच कंटाळा आला की तो ती लांब भिरकावून देत असे. पुतळ्याच्या पायाजवळून तो हलत नसे. त्याच्या जीवनाला वेळेचं बंधन राहिलं नव्हतं. कधी कधी खिडकीबाहेरील दृश्यांकडे नजर गेली की ते आकाशाला जाऊन भिडलेले पर्वत, गगनचुंबी झाडें, लांब क्षितिजाजवळ जाऊन मिळणारी नदी, साऱ्यांचा त्याला अनंताशी संबंध आहे असं वाटे. त्यावेळीं त्याला स्वतःच्या जडतेची तीव्र जाणीव होई हीं सारीं त्याला कांही तरी सुचवीत. "यावेळीं कुठं असेल वीणा?" हे त्याला गूढ वाटे. वीणेच्या प्रत्यक्ष सहवासापेक्षां तिची स्मृतिच फक्त गोड असावी याचं त्याला नवल वाटे. गतायुष्याच्या कटुजीवनानं खंगलेलं त्याचं शरीर भंग होण्याची इच्छा धरी. एकटं आयुष्य काढणं कठीण होतं. वीणेच्या स्मृतिखेरीज कसलाच विरंगुळा किंवा आकर्षण त्याला उरलं नव्हतं. आयुष्यांत भगभगपणा, भकासपणा भरलेला होता. त्याच्या अंगाचा सांपळाच काय तो राहिला होता. डोळे खोल गेलेले, त्यांना कसली तरी ओढ लागलेली होती या मर्त्य जगापलीकडचं जग त्यांना दिसे. व त्याचं मन अस्थिर होऊन राही.

अशा प्रकारं दहा वर्षं निघून गेलीं. त्या दिवशीं अनेक दिवसांची पावसाची झड बंद होती. सकाळीं त्याच्या शिलागारांत लख्ख उजेड पडला होत

त्या प्रकाशांत सारे पुतळे व अनेक इतर कलाकृति चमकत होत्या. फक्त वीणेचा पुतळा अन् विकास तिथं नव्हते. पुतळा जमिनीवर पडला होता. त्याचे दोन तुकडे झाले होते. त्या भग्न मूर्ती खाली चेंगरलेला विकासचा देह उताणा पडला होता. त्याच्या भव्य कपाळावरचे केस विखुरलेले होते अन् चेहऱ्यावर समाधानाची लकेर झळकत होती.

*( ही कथा प्रथम सह्याद्रीत प्रसिद्ध झाली. )*

# १. निळा सूट

"तीन आणे एक कप!" "तीन आणे एक चाय!"

'काफे रीगल' मधे शिरणाऱ्या प्रत्येक इसमावर पोऱ्या तें वाक्य धाडकन् फेकी. संध्याकाळची दिवेलागणीची वेळ. वाढत्या अंधाराबरोबर रेस्टोरांत येणाऱ्याजाणाऱ्या लोकांचीहि गर्दी वाढत होती. काफेच्या एका कोपऱ्यांतल्या खुर्चीवर कासवाप्रमाणे तो अंग चोरून बसला होता. तें त्यानं कुठं कांही चोरी केली होती किंवा दरोडा घातला होता म्हणून नव्हे, तर त्याला तसं अंग चोरून बसण्याची सवयच लागली होती!

कारण 'डी. ए जी. पी. टी.' ह्या पंचाक्षरीच्या तावडींत सापडलेला कारकून होता तो! दरमहा पन्नास रुपडया हा त्याचा पगार. त्यांतून साडे दहा रुपये खोलीचं भाडं, एकवीस रुपये खानावळीचा डबा, दोन आणे रोजप्रमाणे ऑफिसला जाण्यायेण्याचं बसचं भाडं. अगदी साधी बेरीज, वजाबाकी नि त्रैराशिकं होतीं; नि त्यांतून वाट काढून तो बिचारा शरीर नि आत्मा यांची तोंड मिळवणी करीत होता. आणि अशा अनेक त्रैराशिकांना धैर्यानं तोंड देऊन, ऑफिसमधे दिवसभर वरिष्ठांच्या पोटभर शिव्या खाऊनखाऊन उरलीसुरली पोटाची खळगी तो भरून घेत होता. वरिष्ठ, गरीबी, परिस्थिति या साऱ्यांनीच त्याच्या आत्म्याला मारून टाकायचा कट केला तर बिचाऱ्याला अंग चोरून बसायची सवय लागेल नाहीतर काय?

शिवाय, तो त्या रेस्टोरांत येणारं रोजचं गिऱ्हाईक थोडाच होता? त्यामुळं त्याच्या वागण्यांत परिचित वातावरणांत वागण्याची धिटाई, पोऱ्याशीं लगट किंवा मॅनेजरशीं सलगी असलं कांहीएक नव्हतं. महिन्यांतून फक्त एकदाच तो तिथं येई. तीनचार तारखेला, महिन्याच्या सुरवातीलाच पगार हातीं पडल्यावर. हाच त्याच्या जीवनांतला एकच एक शौक होता. कारण, "काफे रीगल' फक्त वरच्या वर्गातल्या लोकांनाच परवडण्यासारखं होतं.

तो येई नि सरळ जाऊन त्या कोपऱ्यांतलं टेबल निवडी. कुणी त्याच्या शेजारी येऊन बसला तरच बोलायला तोंड उघडी; नाहीतर फक्त खायलाच. तिथं तो एखाद्या अदृश्य अस्तित्वाप्रमाणं लोकांची हालचाल व त्यांचीं बोलणीं ऐकत बसे. त्या वेळीं एका वरच्या अपरिचित अशा वेगळ्याच वातावरणांत आपण आहोंत असं त्याला वाटे. त्या संध्याकाळींच आपण दिवसांतून दहा तास खर्डेघाशी करणारे कारकून आहोत ह्याचा त्याला विसर पडे. कारकुनी आपल्या रक्तांत न भिणूं देण्यासाठी ही धडपड होती. फक्त त्या वेळींच आपलं हृदय अजून मेलं नाही, आपल्या आत्म्याला अजून गंज चढला नाही असं त्याला वाटे. आपल्या पूर्वतरुण जीवनांतल्या आकांक्षांची उजळणी तो करूं लागे, या निर्दय व प्रचंड सामाजिक चौकटींतला आपण कुठंतरी बसविलेला एक क्षुद्र खिळा नसून माणूस आहोंत असा त्याला अनुभव येई. उभ्या महिन्यांतली ती एकच संध्याकाळ म्हणजे त्याच्या जीवनांतलं काव्य होतं व त्या एकट्या संध्याकाळच्या जोरावर तो महिन्यांतले एकोणतीस दिवस रखडून टाकी.

" तीन आणे एक चाय ! ", " तीन आणे एक दोसा " पोऱ्यानं आरोळी मारली. कोपऱ्यांतल्या त्या तरुणानं कॉफीचा एक घोट घेतला. इतक्यांत " ए छोकरा ! " अशी एका नवागत तरुणाने हाक मारली व एका सुंदर तरुणीसह तो कोपऱ्यातल्या तरुणाच्या समोरच्या टेबलावर येऊन बसला.

" छोकरा... ..इधर आव ! "

" जी साब ! " टेबलावर कपबशा मांडीत पोऱ्या म्हणाला.

" दो गरम चाय लाव...और देखो, और क्या क्या है ?"

" रसगुल्ला, चमचम, गुलाब जामुन, रसमलाई ! सेव, चिवडा, भजिया, आलू बोंडा..." त्यानं पाढा वाचून दाखविला.

" तो फिर - दो प्लेट आलूबोंडा, दो प्लेट रसगुल्ला ! "

" जी साब ! " वाऱ्याच्या झोताप्रमाणे पोऱ्या झरेकन निघून गेला.

कोपऱ्यात बसून आज 'तो' हें पाहात होता पण त्याचं लक्ष कशाकडेहि नव्हतं. पोऱ्यांच्या आरोळ्या, कपबशांचा खणखणाट, चवदार पदार्थांचा घमघमाट, तो चमच्यांचा बशांशीं होणारा टणटणाट नि नाना तऱ्हेच्या आवाजाचं तें मधमाशांप्रमाणं घोंघावणं यांपैकी कशाकडेहि त्याचं लक्ष नव्हतं. काऊंटरवर एका कोपऱ्यांत ठेवलेला रेडिओ गात होता—"हॅस ले-जी भरभर कर हंस ले!" पण तेहि त्याच्या कानावरून ओझरतंच निसटत होतं. त्याच काऊंटरमागे उभा राहून गिऱ्हाइकाजवळून 'खणाखण!' पैसे मोजून घेणारा तो काफेचा जाडजूड मालक नि त्याच्या तोंडाशीं समोरच्या प्लेटमधे ठेवलेल्या दोशाचं साम्य हेंहि तो आज विसरला होता. त्याच्या शेजारी बसलेल्या जोडप्याच्या संवादाकडेहि त्याचं लक्ष नव्हतं. त्याचं लक्ष वेधलं होतं फक्त एका गोष्टीकडे! त्या तरुणानं घातलेल्या त्या सुंदर निळया सुटाकडे!

निळा सूट!

कितीतरी मधुर स्वप्नं त्यानं त्या एका वस्तूभोवती रेखाटलीं होतीं. कॉलेजांतील तारुण्यापासूनच्या त्याच्या आकांक्षात निळया सुटाला प्रामुख्याचं स्थान होतं. जेव्हाजेव्हा तो स्वतःची ऐटबाज पोशाखांत कल्पना करी, तेव्हा-तेव्हा त्यानं निळा सूटच कल्पिला होता. 'स्कायब्लू' पासून 'नेव्हीब्लू' पर्यंतच्या सर्व छटा त्याला आवडत. पण गरिबीमुळं तो ही हौस कधीहि भागवूं शकला नव्हता. निळा सूट हें त्याचं एक स्वप्नच राहून गेलं होतं.

म्हणून आपल्या प्रेयसीशीं गुलगुल गोष्टी करणाऱ्या शेजारच्या तरुणाचा त्याला हेवा वाटला एकदम. पण तो त्या तरुणीबद्दल नव्हे, तर सुटाबद्दल! तो अनिमिष नजरेनं त्या तरुणाच्या तंगड्यांकडे पाहात होता. अहाहा! काय तो कलर नि काय ती क्रीझ! नि पॅडिंग केलेले खांदे तरी किती झकास दिसत होते! त्याच्या मनांत एक भलताच विचार आला. इतक्या सुंदर नि रुंद खांद्यांचा सर्वांत उत्तम उपयोग कोणता असूं शकतो; अर्थात एखाद्या सुकुमार पोरीचं मस्तक टेकून धरण्याचा! त्याला एकदम वाटून गेलं...पण

स्वतःच्या बाबतींत त्या सर्व विचारांची निरर्थकता त्याला एकदम जाणवली व त्याला कसंसंच वाटलं; तो अस्वस्थ झाला. त्यानं आपल्या प्लेटमधील दोसा तसाच टाकून दिला व काऊंटरवर पैसे फेकून तो विमनस्कपणे काफेच्या बाहेर पडला.

त्यानं तडक घरी जाऊन आपल्या खोलीचं कुलुप काढलं. दार उघडतांच समोर मध्यभागीं फाटलेल्या सतरंजीनं त्याला सलामी दिली. एक तोटी फुटलेली दुतोंडी सुरई त्याच्याकडे वाकडी मान करून वेडावीत होती. एक खाट, तीवर तिला साजेसा बिछाना, उजव्या कोपऱ्यांत वर असंख्य गोष्टींचा भार वाहणारं टेबल, एक खुर्ची, स्टोव्ह नि घडयाळ व भिंतीवर दोन फोटो -एक स्वतःचा नि दुसरा म. गांधीचा ! ही त्याची दौलत.

१०×१० ची खोली. तेथील ते खायला धावणारं वातावरण. कोणता ना कोणता अवयव गारद झालेल्या वस्तु व प्रत्येकीतून डोकावणारी संकीर्णता- ह्या साऱ्याला एकदम विसंगत असणारा तो निळा सूट त्याला पुन्हा आठवला. तो त्याच्या नजरेसमोरून हालेना ! ' कांही झालं तरी सूट करवायचाच' असं त्याच्या मनानं घेतलं व एका विलक्षण तगमगींत तो खाटेवर जाऊन पडला.

सुमारें महिन्यानंतर.

" तीन आणे एक कप ". " तीन आणे एक चाय ! " पोऱ्या अधून मधून ओरडत होता.

" रसगुल्ला, चमचम, सेव..."

" ए, छोकरा ! " त्यानं हाक मारली.

" जी साब ! "

" एक काफी, एक रसगुल्ला ! "

आजहि तो आपल्या नेहमीच्या कोपऱ्यांत बसला होता. परंतु वेगळ्याच झोकांत ! ' माझें जग मी राज्य करी ' च्या ऐटींत. आजहि त्याचं कुठंच लक्ष नव्हतं. समोरून हसत खिदळत शिरणारा एक गुलहौशी लोकांचा फडहि त्यानं

पाहिला नाही. कारण तो स्वतःतच चूर होता. आजतागाईत एका कारकु-नाच्या फक्त स्वप्नसृष्टीत असलेला ' निळा सूट ' तो पेहरून होता आज !

नि खरोखरच त्याला विसर पडला की आपण एक क्षुद्र कारकून आहोंत. त्याच्या जवळजवळ रक्तांत भिनलेली ती ' कारकुनी ' दृष्टि निजतांना चष्मा काढून ठेवावा तशी त्यानं काढून ठेवली होती !

मघाशी आंत शिरतांना काफेच्या दारांत लागलेल्या मोठया आरशांत त्यानं आपलं पूर्ण प्रतिबिंब पडलेलं पाहिलं होतं. त्याला किती आश्चर्य वाटलं ! अगदी नखशिखान्त बदलला होता तो ! रोजच्या अस्ताव्यस्त भांगाऐवजी कुठला तरी दिलखुष हेअर क्रीम चोळून दुभंगलेले ते केस, रोजच्या कळकट चुरगळलेल्या कपडयाऐवजी सुंदर, कडक इस्त्रीचा तो निळा सूट, दाढी केलेले गुळगुळीत गाल, चेहऱ्यावर कारकुनी मरगळीऐवजी आशा व रोमान्सचा नवा तजेला—अगदी आपादमस्तक बदलला होता तो !

" तीन आणे एक कप ", " तीन आणे एक चाय ! " त्या ललकारीनं तो भानावर आला. त्यानं सभोवार पाहिलं.

" ए पोऱ्या, दो चाय ! " शेजारून त्याच्या कानावर शब्द पडले. त्यानं चमकून पाहिलं. तेच त्या दिवशींचं जोडपं—निळा सूट घातलेला तरुण, गुलाबी साडी नेसलेली तरुणी. किती मग्न दिसत होतीं तीं एकमेकांत ! त्यांच्या प्रत्येक हालचालीत दृश्य स्वरूपाचं प्रेम दिसत होतं. तिची प्रेमानं ओथंबलेली नजर, त्याचं तिला प्रत्युत्तर, तिचं माना वेळावणं, त्याचा विनोद, अधूनमधून दोघांचं टेबलाखाली होणारं चोरटं हस्तांदोलन—एक गोडशी सळसळ त्याच्या हृदयांत होऊं लागली. आजहि त्याला त्या तरुणाचा हेवा वाटला; पण आज सुटाबद्दल नव्हे—तरुणीबद्दल !

नि पुन्हा त्याला पन्नास रुपडयांची आठवण झाली. त्याच्या व्यवहारी मनानं हृदयाला उत्तर दिलं, की ' तुला प्रेम परवडूं शकत नाही.' नि त्या विचा-राची यथार्थता त्याला इतक्या तीव्रतेनं जाणवली, की त्याची आतापर्यंतची

आजची बेदरकारवृत्ती पार विरघळली. " प्रेम करायलाहि पैसा लागतो तर !" तो स्वतःशीच पुटपुटला व नाहीनाही त्या विचारांचं काहूर त्याच्या मनांत उठलं. तो किती वेळ तरी ह्या विचारमग्न अवस्थेंत बसला असता कोण जाणे...

तेवढ्यांत पोऱ्यानं येऊन त्याला हळूच म्हटलं, "क्यो साब, किसकी राह देख रहे हो ?"

साधं वाक्य, पण त्याला चीड आली. त्यानं दटावीत उत्तर दिलं, " तुम्हे इससे मतलब ? जाओ, अपना काम करो ! "

त्यानं आजूबाजूला पाहिलं-तें जोडपं केव्हाच निघून गेलं होतं. त्याचं लक्ष बाहेर गेलं. खूप अंधारून आलं होतं; पण रात्र झाली नव्हती. पावसाचीं लक्षणं स्पष्ट दिसत होतीं. लागलीच पावसाचे थेंबहि आले पण त्याला उठावंसं वाटेना. त्यानं आणखी एक काफीचा कप मागवला व तो पुन्हा आपल्या विचारांचं रवथ करीत बसला.

" सर्ररऽऽ" एकदम जोराची पावसाची सर आली. रस्त्यावरील दिव्यांच्या प्रकाशांत जाणाऱ्या—येणाऱ्यांची धडपड त्यानं बघितली व काफीचा एक घोट घेतला इतक्यांत—

त्याचं लक्ष समोर गेलं. पावसापासून संरक्षण होण्यासाठी एक तरुणी गडबडीनं आंत शिरली. क्षणभर तिनं आजूबाजूस बघितलं; निरनिराळ्या टेबलांशीं बसून तोंड चालवीत असलेले लोक पाहिले. त्यांतली एकहि जागा तिला पसंत पडली नसावी. कारण, त्यानंतर तिनं काफेच्या कोपऱ्यांत पाहिलं... 'तो' होता तिथं !

त्याच्याकडे तिनं एक चोरटा कटाक्ष टाकला. त्याच्या हृदयांत एक धडधड सुरू झाली. ' येणार का ती आपल्या जवळच्या रिकाम्या जागीं बसायला ? ' तरुणीनं हळूहळू पावलं टाकायला सुरवात केली. नकळत त्याचा हात छातीशीं गेला अन्—

ती हळूच त्याच्या शेजारीं येऊन बसली ! इतकच नव्हे, तर तिनं एक पुसटसं स्मितहि केलं. त्यानंहि उलट गाल चढविला व तिला संकोचून विचारलं,

" कॉफी मागवूं का एक ? "

" अं ?...नकोच ! " तिनं संकोचून उत्तर दिलं.

" नको का ? घ्या ना ! तुम्ही पावसानं भिजलां आहात," पुन्हा दोघंजण–पण ह्या वेळीं किंचित जास्त मोकळेपणीं हसलीं.

पोऱ्यानं कॉफी आणली. पुढं काय बोलावं हें दोघांनाहि समजत नव्हतं. आळीपाळीनं तीं कॉफीचे घोट घशाखाली ढकलीत होतीं; तीं एकमेक कोण, कुठं राहतात, त्यांची नांवं काय, हे त्यांनी एकमेकांना विचारलं नाही. वैयक्तिक प्रश्न विचारणं त्यांना कदाचित् बरं वाटलं नाही. पण फक्त एक-मेकांची संगत पसंत होती हे दिसत होतं. ती मधूनमधून त्याच्या अगदी ताज्या क्रीझ केलेल्या सुटाकडे पाही; तें पाहतांच त्याला मूठभर मास चढे. तो स्वतःचं अस्तित्व विसरला. त्याच्या आजूबाजूचं परिचित वातावरण एका वेगळ्याच रंगानं भरून राहिलं.

एकाएकीं ती चुळबुळ करीत म्हणाली, "पाऊस कसा अजून थांबत नाही ? घरीं पोचायला उशीर होईल ! "

"उंः ! त्यांत काय ?" तो हळूच म्हणाला, "रात्र झाली तर मी पोचवून देईन." तिनं तें मान्य केलं. ती गप्प बसली.

मधूनमधून तो तिच्याकडे पाही. तीहि चोरून तेंच करीत होती. त्यामुळं त्या गोष्टीला दोघांनीहि हरकत घेतली नाही.

एकाएकीं ती म्हणाली, " तुम्ही इथं नेहमी येतां ? "

" नाही. असंच रविवारीं...बहुधा दिवे लागणीच्या सुमारास. "

" रविवारीं ?...अस्सं ! " तिनं स्वतःशींच पुटपुटत म्हटलं.

पाऊस थांबला होता. ती जायला उठली तोहि पाठोपाठ उठला. त्यानं काऊंटरवर दोघांचे पैसे फेकले व तीं दोघं बाहेर पडलीं.

चालतांचालतां ती म्हणाली, " तुम्हाला उगीच तसदी देत आहें मी."

" छे छे ! " एवढाच शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडला. पण तिला काय ठाऊक तो त्याच्या आयुष्यांतील एकमेव आनंदाचा पहिला क्षण होता !

रस्त्यावर तीं दोघं बोलत होतीं; पण स्वतःच्यासंबंधी त्यानं तिला कांहीच कल्पना दिली नाही. तिला आपल्याविषयी जे काय वाटतंय त्याचा कशाला भंग करायचा ? त्याला मोह वाटला; तिच्या कल्पना जालाला वास्तवतेचा धक्का द्यावासा वाटला नाही त्याला ! कांही वेळ चालल्यानंतर एका अंधाऱ्या गल्लीच्या तोंडाशीं ती थांबली.

" घर आलंच माझं; मी जाईन आता. तुम्ही जाऊं शकतां ! " औपचारिक आभाराचे शब्द तिच्या तोंडून बाहेर पडले नाहीत, पण नजरेंतून कृतज्ञता ओसंडून निघत होती तिच्या.

' आता पुन्हा केव्हा ? ' असे कांहीसे शब्द त्याच्या अगदी जिभेवर आले; पण ते तिथंच थांबले. कारण, ती तेवढयांत अदृश्य झाली होती !

दुसरे दिवशी तो किंचित उशिरा उठला. कालचा प्रसंग त्याच्या स्मृतिपटलावरून झर्रकन् निघून गेला व हृदयाला एक गोडशी कळ लागल्याचं त्याला आढळलं. सभोवतालचं सारं जग त्याला स्वप्नवत् वाटूं लागलं. त्यानं रोजच्याप्रमाणं सारीं कृत्यं उरकलीं; पण रोजच्यापेक्षा अगदी वेगळ्या वृत्तीनं. एका रात्रींत त्याच्यांत आमूलाग्र परिवर्तन झालं होतं म्हणाना !

तो इराण्याकडचा चहा, ' डी. ए. जी. पी. टी. ' ऑफिसांतल्या जाडजाड फायली, ते इकडून तिकडे हिंडणारे ' बोलके ढलेप, ' ' तांबडया फिती'चं वातावरण किंवा खानावळीतलं मळमळीत अन्न...ह्यांपैकी एकाहि गोष्टीची त्यानं दरकार बाळगली नाही. एखाद्या निद्राचराप्रमाणं आकाशांत स्वैर भटकणाऱ्या ढगासारखी त्यानं रविवार संध्याकाळपर्यंतची वेळ काढली.

रविवारीं संध्याकाळी त्यानं पुन्हा वेष पालटला. कोरीकरकरीत ब्लेड काढून गुळगुळीत दाढी केली, केसांना पोमेड लावून ठिकाणावर बसविलं, पायांत चकचकीत शू चढविला व निळा सूट पेहेरून तो खोलीबाहेर पडला. नकळत त्याचे पाय त्याला 'कॉफ रीगल' कडे घेऊन गेले. तिथं त्यानं रोजची जागा घेतली व कॉफी मागवली. तिचे घोट घेतघेत तो मागील 'तिच्या' आठवणीचे घोट घेऊं लागला. रोमान्सच्या गुंगींत तो असतांनाच .. काय आश्चर्य !

तीच तरुणी त्याच्याकडे येत होती! आनंदाश्चर्यानं तो अगदी थिजून गेला.

ती ज्वळ येताच तो शुद्धीवर आला, स्मित करून तिला शेजारी बसविलं व तिच्यासाठी दुसरा कप मागवला. त्याच्या सुटाकडे पाहात ती म्हणाली,

"किती सुंदर आहे हा सूट, नाही ?"

"हं. दर रविवारी घालतो मी हा !" तो हसून म्हणाला.

"कां बरं ?"

"असंच. माझ्या त्याविषयी कांही भावना आहेत. रविवारशीं माझ्या आयुष्यातली एक महत्वाची घटना निगडित आहे."

"अस्सं ?" ती कुतूहलानं म्हणाली.

कांही क्षण गेले. तीं दोघं आज खूपच मोकळेपणीं बोलत होतीं. दोघांच्याहि बोलण्यांतून मागच्या रविवारपासून त्यांच्या हृदयाला एक नवीन विकार जडल्याचा उल्लेख होत होता.

"परवा कॉलेजांत मुलींनी मला छेडलं. म्हणे, तुझ्यांत कांहीतरी बदल झालाय एकदम !" ती. त्याला गुदगुदल्या झाल्या.

"मी त्या दिवशी ऑफिसांतील एक फाईल काढून बसलों; पण काय वाचीत होतों ते समजलं सुद्धा नाही !"—तो.

तिच्या हृदयांत पुन्हा तीच कळ उठली.

" नि घरीं आई रागावते...धड जेवत कां नाही आताशा म्हणून ! '– ती, लाजून.

" नि अलीकडे माझ्याहि झोपेला काय झालंय कुणास ठाऊक ! "--तो, गोड वेदनेत.

त्या दिवशींपासून रोमान्सनं त्याच्या नांवे जांगडवर नोंद केली. व आधुनिक वातावरणांत चालतींबोलतीं यंत्रं बनलेल्या माणसांना रोमॅन्टिक वाटणाऱ्या ज्या ज्या कांही गोष्टी असतात त्या साऱ्या त्यांच्या लक्षणांसहित तो अनुभवूं लागला.

याप्रमाणं पुढच्या रविवारीं, त्याच्या पुढच्या रविवारीं–म्हणजे दर रविवारींच म्हणाना–त्यांच्या प्रणयाच्या दर वेळेस नवीन आवृत्त्या निघूं लागल्या. हृदयाला लागलेली कळ जास्तच तीव्र होत गेली. हृदयाचा विकार मेंदूपर्यंत जाऊन पोचला नि प्रणयाचं रूपांतर प्रीतींत होऊं लागलं, तेव्हा तो हळूहळू शुद्धीवर येऊं लागला !

असाच एका रविवारीं सकाळीं खाटेवर पडल्यापडल्या त्याचं लक्ष दोरीवर टांगलेल्या सुटाकडे गेलं. त्याला वाटलं, तो सूट, तो अंगावर असतांना बदलून जाणारं त्याचं स्वतःचं स्वरूप व मनोवृत्ति, त्यानं निर्माण केलेलं अवास्तव वातावरण, त्याच्या जीवनांतला तदुद्भूत प्रणय, 'अरेबियन नाइटस्" लाच सुसंगत असा तो सूट नव्हता का ? त्यानं एक सुस्कारा सोडला. या गोष्टींचा शेवट कुठं होणार होता ? प्रणयांतून प्रीतीकडे जातांच यथार्थतेची चुणूक त्याला जाणवली व एक प्रश्न त्याच्या मनांत वारंवार डोकावूं लागला. पगाराच्या पन्नास रुपड्यांत आपल्याला बायको कशी परवडेल ? मग ? आपल्या ह्या पन्नास रुपड्यांचं सत्य तिच्या तोंडावर आज फेकून याचा शेवट करायचा की काय ? आजपर्यंत ही गोष्ट त्यानं तिच्यापासून चोरून ठेवली होती; तशा कितीतरी अनेक ठेवल्या होत्या ! मग आज वास्तवतेला न परवडणाऱ्या या

प्रीतीचा अंत करणार आपण ना? ... त्याच्या डोक्यांत विचारांचं काहूर माजून राहिलं.

संध्याकाळीं काफेमधील टेबलाशीं तो तिची वाट पाहात बसला. किती उशिरानं ती आली. पण नेहमीपेक्षा अगदी वेगळया मनःस्थितींत! आज तिची कावरीबावरी नजर, उतरलेला चेहरा, डोळ्यांत पुनःपुन्हा दाटून येणारे अश्रु व ह्या साऱ्यांना दाबून ठेवण्यासाठी बळेंच आणलेलं हास्य, हें सारं त्यानं क्षणार्धात पाहिलं व घरीं कांहीतरी घडलं असावं असं त्यानं ताडलं.

ती जवळ येऊन बसतांच त्यानं विचारलं, " का? कांही झालं वाटतं? "

" हूं. " अश्रु आवरीत ती म्हणाली.

" साग ना काय तं! "

" इथं नको...बाहेर जाऊं या. "

तीं दोघं बाहेर पडतांच तो म्हणाला, " हं, सांग आता काय झालं? "

" बाबांनी घरांतून बाहेर काढण्याची धमकी दिलीय् आज! "

" कां? " त्यानं हादरून विचारल.

" कुणीतरी जाऊन त्यांना आपल्यासंबंधी बातमी दिली. ती मिळतांच त्यांनी मला बोलावून खूप दम दिला. म्हणाले, ' कुठला कोण, ज्याचं धड नांवगांव नि कुळगोत्रहि ठाऊक नाही असल्या उडाणटप्पूबरोबर तुला असले धंदे करायचे असतील तर घरांतून चालती हो. "

त्यानं विचारलं, " त्यावर तूं काय म्हणालीस. "

" काय म्हणायचं? ' ते कसेहि असले तरी माझं त्यांच्यावर प्रेम आहे ' असं मी म्हणालें—" ती.

तो रुक्षपणें हसला: " नि तूं काय करायचं ठरवलंस? "

" त्यांत काय ठरवायचं ? तुमच्यासाठी मी वाटेल तें करीन म्हणाल तर आताच्या आत्ता मी तुमच्या घरीं पळून यायला तयार आहें ! " ती शौर्यानं म्हणाली.

" माझ्या घरीं.? " त्यानं घाबरून म्हटलं.

" हं, कां ? "

त्यावर तो कांही बोलला नाही. एक मिनिट झालं, दोन तीन...तरीहि तो गप्पच.

" बोलत कां नाहीस ? " तिनं विचारलं, " दुसरा एखादा मार्ग दिसतो का ? "

तो गंभीरपणें म्हणाला, "दिसतो ना ! एक अगदी सरळ राजमार्ग आहे."

" कोणता ? " तिच्या हृदयांत धडधड उठली.

" आजपासून मला न भेटण्याचा ! "

" म्हणजे ? " ती आश्चर्यानं ओरडली.

" म्हणजे हेंच, की सरळ घरी जा, आजपासून माझं नांवसुद्धा काढूं नकोस व वडिलांना सांग, मी खरंच उडाणटप्पू आहे, भिकारी आहें···खरंच सांगतों तुला, मी दिसतों तसा नाही ! "

" म्हणजे ? मग तुम्ही आहांत तरी कोण ? " ती रागानं म्हणाली.

" तुझ्याच काय, पण कुणाच्याहि प्रेमाला अपात्र असलेला एक माणूस आहें मी ! मी बायको पोसूं शकत नाहीं ? "

ती रागानं लाल झाली. " मग ही सुरवातच कशाला केली ? तुम्ही भ्याड आहांत, दगाबाज, असंभावित .." असं तिच्या रागाला जेवढं सुचलं तेवढं तिनं बोलून टाकलं !

दुःखित होऊन तो अखेरीस म्हणाला, " तुला काय वाटेल तें म्हणून घे तूं मला. पण मला एवढंच म्हणायचं आहे, की मी माणूस आहे पण माणूस

म्हणून जगूं शकत नाही ! मला हे हृदयाचे, प्रीतीचे चाळे परवडूं शकत नाहीत ! म्हणून या साऱ्याचा शेवट करायचं मी ठरवलंय.

ती स्तब्ध राहिली. तिचा राग पार ओसरला होता. पण तिचं हृदय दुःखानं भरून गेलं. हातांत असलेला त्याचा हात ओठाला लावून तिनं तो खाली सोडला व हळूच ती म्हणाली, " बराय्, शेवट केला मीं हा ! "

किती वेळ तरी तीं तशींच बसून होतीं. रात्र वाढत चालली होती. तो म्हणाला, ' चल, तुला अखेरंच पोचवून देतों. "

" चला..."

नि त्यानंतर दोघांचीं तोंडं बंद पडलीं. नेहमीप्रमाणं ती त्या अंधाऱ्या गल्लीच्या तोंडाशीं आली.

त्यानं जड अंतःकरणानं म्हटलं, " खरंच, मला क्षमा कर. "

" ठीक आहे." हसण्यासाठी तिनं गाल वर केला व एखाद्या हरलेल्या खेळाडूच्या वृत्तीनं ती भर्रकन् अंधारांत गडप झाली !

तो क्षणभर तिथंच उभा राहिला. त्याच्या कारकुनी जीवनांतल्या एकुलत्या एक प्रणयाच्या पहिल्या रात्रीं तो तिथं तसाच उभा होता; पण त्या दोन रात्रींत किती तफावत होती !

तो दुःखानं वेडा झाला. पण त्यांत त्वेषाची भावना अधिक होती. त्याच्या कार्बूत असतं तर त्याच्या प्रीतीच्या आड उभ्या राहणाऱ्या त्या सामाजिक पोलादी चौकटीच्या त्यानं ठिकऱ्या उडवल्या असत्या-इतकं दुःख त्याला झालं होतं. पण किती दुर्बळ होता तो.

जड, घुटमळती पावलं टाकीत तो खोलीवर पोचला. त्यानं कुलूप काढलं. दारांतच हृदय फाटलेल्या सतरंजीनं त्याला पाहून विकट हास्य केलं. त्याच वेळीं समोरच्या भिंतीवरील भग्नहृदयी दुभगलेल्या आरशांत त्यानं आपलं प्रतिबिंब पाहिलं.

अगदी भकासपणें हसून त्यानं अंगावरचा निळा सूट काढून दूर कोपऱ्यांत भिरकावला.

दुसरे दिवशीं ऑफिसांत गेल्यावर, बरेच दिवसांनंतर त्याला आपले पाय जमिनीला लागल्याचं पावलोपावलीं आढळून आल. हृदयांत आग ठेवूनहि ऑफिसांतल्या परिचित वातावरणांतून त्याला बाहेर पडण्याची हिंमत नव्हती. मशीनच्या चाकाबरोबर फिरतांना स्वतःच्या हृदयाची तगमग होऊनहि आपल्याच जागीं घट्ट रुतून बसणाऱ्या खिळयाची त्याला आठवण झाली व तसाच घट्ट मनानं तोहि खर्डेघाशी करीत राहिला.

पुढच्या रविवारीं त्याचे पाय नकळत 'काफे रीगल' वरून गेले. पण त्याच्या अंगावर आज निळा सूट नव्हता; खोलींत तो अजून त्याच भिरकावलेल्या स्थितीत पडून होता. तो काफेत शिरला नाही; पण रस्त्यावरून त्यानं बघितलं, आपल्या नेहमीच्या टेबलाशीं तो निळा सूट घालणारा तरुण व त्याची प्रेयसी बसली होती. त्याची स्वतःची जागा रिकामी होती. सारे प्रसंग एकदम टोळधाडीप्रमाणं त्याच्या मनांत गर्दी करून धावून आले. त्याला पुढं जाववेना. तो तसाच मागल्या पावलीं परतला.

तो केव्हा खोलीशीं पोचला हे त्याच्या लक्षांतसुद्धा आलं नाही. पण 'दाराशीच' " बाबूजी, गरिबावर दया करा. " हे एका भिकाऱ्याचे शब्द ऐकून तो शुद्धीवर आला! त्यानं खिशांत हात घातला. त्यांत दिडकीसुद्धा नव्हती. त्याच्या मनांत एक कल्पना चमकली. त्यानं खोलीचं दार उघडलं व कोपऱ्यांत भिरकावून दिलेला तो सूट उचलून थंडींत कुडकुडणाऱ्या त्या भिकाऱ्याच्या अंगावर टाकला.

तत्क्षणीं आपल्या प्रेयसीचा दुःखी चेहरा त्याच्या नजरेसमोरून निघून गेला. पण एक शौर्याचं स्मित करून त्यानं धाडकन खोलीचं दार लावलं.

*(ही कथा प्रथम 'किर्लोस्कर' मासिकांत प्रकाशित आली होती.)*

# ३. किनाऱ्याचं अंतरंग

अगणित वर्षांपासून मी पडून आहे इथं. माझ्या अस्तित्वाला कालाचं बंधन नाही. मानवी स्मृतीच्या पलीकडील लांबच लांब, अफाट अशा गतकालांतील असंख्य गोष्टी मी जागतों. माझ्या अंगावरील वाळूवर येऊन बागडलेले अनेक मानव, त्यांनी खेळलेल्या प्रीतीची सुखदुःखं, अनेकांचे दुःखद अंत, अशा कैक गोष्टी मला आठवतात. तुम्हाला त्या ऐकावयाच्या असतील तर असे इकडे या. माझ्यावरील वाळूवर पडा. वाळूची कुरकुर ऐकूं येईल तिथं तुम्हाला. तोच माझ्या अंतःकरणांतला प्रतिध्वनी ! नीट कान देऊन ऐकाल तर माझ्या अंतरंगांत दडलेलं एखादं गुह्य तुम्हांला ऐकूं येईल तिथं !

गतकालात मी अवगाहन करतों, तेव्हा सर्वात प्रामुख्यानं आठवते भीमा ! तिला पाय फुटल्या दिवसापासून ती माझ्याकडे येऊन तासन्‌तास खेळण्यांत घालवी. भिमा म्हणजे एका कोळ्याची मुलगी. तिथं पलीकडे डाव्या बाजूस दिसत असलेल्या झोपडयापैकीं एका झोपडींत तिचं घर होतं. तिचा बाप पहाटे-पासून अंधार पडेपर्यंत मासेमारी करण्यास जाई. कमरेला लंगोटी व खांद्यावर जाळं ! त्याचं तें कसलेलं तुळतुळीत काळं शरीर, चेहऱ्यावरील गांभीर्य, पण बेधडक वृत्ती हे सारं माझ्या रोजच्या परिचयाचं होतं. त्याचे अनेक सोबतीहि तसेंच. आपल्या जीवनावर विचार करायला त्यांना सवड नव्हती. दिवसभर मरेमरेतों काम, रात्रीं जमिनीला पाठ लागली कीं गाढ निद्रा–हें त्यांचं जीवन. त्यांत सुखहि नव्हतं–पण दुःखहि नव्हतं. कसली ओढही नव्हती पण तृप्ती ही नव्हती. फक्त जगण्यासाठी तें करायचं होतं. कोळ्यांचीं अनेक उघडीनागडीं शेंबडीं पोरं माझ्या अंगावर खेळायला यायचीं, माझ्या वाळूंत पोटभर खेळायचीं अन् समुद्राची गंमत पहात बसायचीं. भिमी त्यांच्यापैकी एक. लांब दिसणाऱ्या होडयांत कुठं तरी आपला बाप आहे अशी तिची खात्री असे. त्यामुळं तिला एक प्रकारचं समाधान वाटत राही. आपलं गुबगुबीत लोभस शरीर माझ्या

अंगावर ती टाकून देई. अन् खरचं ! साऱ्या मुलांत ती उठून दिसे. तिच्याविषयीं माझ्या मनांत जिव्हाळा होता. म्हणूनच मला तिचं अभागी जीवन इतकं जाणवतं. बिचारी भिमी !

* * *

वर्षामागून वर्ष गेलीं. तसतशी मला भिमीच्या सहवासाची संवय होत गेली. आता ती चौदा पंधरा वर्षांची अल्लड पोरगी होती. तिचं तें काळं, अर्धवट उघडं कसलेलं शरीर. पण त्यांतहि एक प्रकारचं सौंदर्य व नाजुकपणा होताच. बरोबरीचीं पोर कधीमधी तिची चेष्टा करीत. पण त्याकडे तिचं लक्ष नसे. दिवसभर तिची भाबडी नजर कांही तरी शोधीत असल्याचा भास होई. या जगांत राहूनही दुसऱ्या जगांत तिचं मन वावरत असावंसं वाटे.

घरांतला धंदा, पाठच्या एका खालच्या एक भावंडांचीं कामं हें सारं ती मुकाटयानं करी. पण सारं शून्यमस्कतेनं. त्यांत उत्साह नव्हता, आपुलकी नव्हती, जिव्हाळा नव्हता. रोज संध्याकाळी डोक्यावर पाटया घेऊन माझ्या कांठीं यायचा तिचा नेम असे. अंधार पडायच्या सुमारास तिचा बाप येई. त्या पाटया माश्यांनी भरल्या जात. त्यांचं ओझं घरी वाहून नेलं की त्या दिवसाच्या तिच्या कामाचा शेवट होई.

आपल्या बापाची वाट पाहात कधी कधी तिला तासन् तास बसावं लागे. पण त्याचा तिला वीट येत नसे. क्षितिजाला जाऊन भिडणाऱ्या अफाट समुद्राकडे पाहात ती किती वेळ तरी बसली राही. समुद्राच्या सान्निध्यांत खरी भीमा प्रगट होई. तिचे डोळे आनंदाने नाचूं लागत. त्यांत वेगळीच तकाकी दिसूं लागे. माझ्या कांठीं आल्याशिवाय तिचा एकही दिवस जात नसे. पण कधीं अपरिहार्य कारणामुळं जर ती येऊं शकली नाही तर मला चुकल्या चुकल्या सारखं वाटत राही. अशी होती भीमा. असं होतं तिचं जीवन—भावना, संवेदना-प्रधान; पण विचारशीलताशून्य. भावना अमूक सांगतात म्हणून तें

करायचं. त्यांना विचारांचा लगाम नव्हता. तिचं जीवन दुःखी झालं, तें यामुळंच ! ... सांगतोंच पुढं.

*   *   *

रखरखीत उन्हाचे दिवस. एक दिवशीं अंधार पडण्यापूर्वी ती नुकतीच माझ्या कांठीं येऊन पडली होती कांही क्षण गेले असतील. इतक्यांत तिची नजर कुठं तरी समुद्रावर खिळून राहिल्याचा मला भास झाला. समुद्रावर क्षितीजाशीं मोठा काळा डाग दिसत होता, त्यावर तिनं आपली नजर रोखून धरली होती. हळूहळू तो पुढं सरकत होता हें मी बघितलं. तें गलबत होतं. ती त्याकडे टक लावून बघत राहिली, कोण जाणे कां तिचे जड डोळे सचेतन दिसूं लागले. अमळशानं तें माझ्या अंगाला लागलं. त्यांतून दोघे खलाशी उतरले. आजूबाजूला कोणीच नव्हतं म्हणून भिमाजवळ आले तिला आपली कहाणी सागूं लागले. त्या खलाशांचा नायक बोटींत जखमी होऊन पडला होता. दोन प्रतिस्पर्धी गलबतांतील चांचे लोकांत चकमकी झडल्या होत्या. शत्रु संख्येनं बरेच जास्त होते पण त्यांचा नायक फार शूर अन् धाडशी. त्यामुळं त्यांचा तशा परिस्थितींतही निभाव लागला. त्यांच्या जवळचं अन्नपाणी संपलं होतं. औषधपाणी नव्हतंच अन् त्यांच्या बारा जणांपैकी ते दोघंच शिल्लक राहिले होते. अन् तिसरा त्यांचा नायक ! बाकीचे सारे मारले गेले होते.

भिमी उठली. धांवत घरी गेली. पुन्हा परतली तेव्हां तिच्या हातांत फडक्यांत बांधून आणलेली शिदोरी होती. एका द्रोणांत कुठल्याशा पानांचा रसही होता त्याच्या जखमांवर लावण्यासाठीं. तें पाहून त्या खलाशांची अंतःकरणं कृतज्ञतेनं भरून गेलीं.

*   *   *

त्यानंतर तीनचार दिवसांनीच तो खलाशांचा नायक नि भिमी माझ्यापाशीं येऊन बसलीं. रात्रीचा दहाचा सुमार असेल. आकाशांत चंद्र नव्हता. पण

चांदण्याच्या अस्पष्ट प्रकाशांत त्या दोन्ही आकृति मी ओळखूं शकलों. किती वर्षांपासूनचं गाढ प्रेम त्या दोघांच्यामध्ये असेल अस पाहणाराला वाटलं असतं. तरवारीचे व संकटाचे घाव झेलून झेलून कणखर बनलेल्या त्याच्या देहाचा भीमेनं आधार घेतला होता. हे आत्यंतिक सुखाचे क्षण पाहतां पाहतां हातांतून निसटून जातील की काय अशी भिती नकळत तिच्या मनाला वाटत होती अन् म्हणूनच जणुं काय तिनं त्याचा हात घट्ट धरून ठेवला होता. पानांच्या अस्पष्ट सळसळी प्रमाणं त्यांची अंतःकरणं बोलत होतीं तासन् तास ती काय बोलत होतीं हें त्यांचं त्यांनाच ठाऊक नव्हतं. त्या साऱ्या शब्दांचा फक्त ठसा राहून जाई. शब्द विरून जात. त्यांच्या त्या कुजबुजण्यांतले कांही शब्द माझ्या कानावर पडले.

—" जें आजपर्यंत शोधीत होतें, तें मिळालं तुमच्यांत. तुमच्यासारखं दुसरं कोणीच नाही इथं ...... " भीमेचा स्वर.

" किती गोड पोरगी आहेस भिमे तूं ? " त्याचे घोगरे शब्द.

" खरंच ? "

" हं. खूपच. "

" तुम्हांला आवडण्याइतकी ? "

त्याचं उत्तर भीमेला शब्दांत मिळालं नाही-अंमळशानं पुन्हा कुजबुज...

" पण खरंच, तुम्ही मला सोडून जाणार नाहीत ना कधीच ? "

" असं कां बोलतेस तूं ? " ...म्हणून त्यानं तिचं तोंड गप्प केलं. अन् त्या अंधाऱ्या रात्रींत ती दोघं एकमेकांत साऱ्या जगाला विसरलीं. अशा किती तरी रात्री त्यांनी घालविल्या होत्या इथं माझ्याजवळ बसून कोण जाणे.

* * *

दोन महिन्यानंतर चारपांच कोळिणी बोलत बोलत माझ्याकडे येतांना दिसल्या.

" खरं का ग हें ? "—पहिली.

" काय म्हणतेस ? भिमीला पोर होणार ? "—दुसरी.

" तिच्या आईनंच सांगितलं मला हें. "—तिसरी.

" बाकी त्या खलाशाचं प्रेम मिळायलाहि भाग्य लागतं. "—चौथी विमनस्कपणें.

" पण तो कुठला कोण आहे ? अन् त्याचा काय नेम असणार ? मला तर वाटतं बाई, की भिमी चांगलीच फसली आहे. "—पांचवी पोक्तपणे उद्गारली. कोळिणी निघून गेल्या. पण मी विचार करीत राहिलो.

* * *

त्यानंतर चार-पांच दिवसांची गोष्ट. संध्याकाळीं अंधारून आलं होतं. आकाशांतून मेघ धावत होते. समुद्रालाहि भरतं आलं होतं. त्याच्या लाटा धाडधाड माझ्या अंगाशीं आपटत होत्या. तीं दोघं इथं येऊन बसलीं होतीं. आज बोलण्याचं काम मात्र भिमीच करीत होती. तो गप्प होता. त्याचं लक्ष त्या अथांग सागराकडे होतं. त्याच्या चेहऱ्यावर उदासीनता होती. अंतःकरणांत अन् डोळ्यांत ओढ दिसत होती. कुठं तरी आपण जावं असं त्याला तीव्रतेने वाटत होतं. जगाच्या पाठीवर स्वैरसंचार करीत भटकावं...पण भिमेच्या हातांचा मृदु-पाश त्याला अडवून धरीत होता. उफाळलेला दर्या आपणांस जणुं हांक देत आहे, आव्हान करीत आहे असं त्याला वाटलं. पण त्याचं हृदय प्रत्युत्तर देण्यास कचरत होतं. दोन परस्पर विरोधी भावनांचं तुमुल युद्ध त्याच्या हृदयांत चालूं होतं अन् म्हणून तो बेचैन होता. भिमाचं सान्निध्य अन् त्याला आव्हान देणाऱ्या रुद्ररूप सागराचं सान्निध्य एकाच वेळीं वेगवेगळ्या विभिन्न भावना त्याच्या हृदयांत उद्दीपित करीत होतीं.

त्याच्या हातांत भीमेचा हात होता. पण त्या स्पर्शातून तिला सुखाचा संकेत मिळत नव्हता. तिनं काकुळतीस येऊन म्हटलं,

" आज बोलत कां नाही ? "

" काय बोलूं ? "

" बोलण्यासारखं काही नाही ? सारं संपलं ? "

" भीमे... ! " तोंडांतून अस्पष्ट हांक निघाली, 'तुला काय सांगू ?' तिला त्याच्या अंतःकरणांतल्या द्वंद्वाची पुसट सुद्धा कल्पना आली नाही. पण आपली आनंदाची बातमी देण्यास उत्सुक असलेले विलग ओठ तिनं तसेच दावून धरले.

मला वाटतं ही त्यांनी दोघांनी एकत्र घालविलेली शेवटचीच रात्र त्यानंतर ती दोघं एकदाच दिसली पण एकत्र नव्हे-विलग झालेली.

*   *   *

रात्री भिमीला गोड स्वप्न पडलं. आपल्या कुशींत झोपलेलं पोर तिनं न्याहाळून बघितलं. हुबेहूब तिच्या प्रियकरासारखं. झोपेंतही त्याच्या लुशलुशीत गालाला तिनं कितीदा तरी आपले ओठ लावले असतील......

त्यालाहि स्वप्नं पडत होती त्या रात्रीं; पण अगदीच वेगळीं ! पूर्वीप्रमाणं आपण समुद्रावर स्वैर भराऱ्या मारीत आहोंत...अज्ञात, नवीन, दूरच्या प्रदेशात भटकत आहोत....शत्रूंशी, संकटांशीं, तुफानाशीं लढत देत आहोंत...नित्य नव्या अनुभवांत जीवन जगण्याचा पूर्वानुभूत आनंद पुन्हा लुटीत आहोंत...... कधी कधी अंतःकरणांत कुठं तरी खोल खुपत होतं. मधून मधून तें उसळून येई. स्वतःला सावरण्यासाठी आपण क्षणभर मागे वळून बघतो—तो भिमीचा चेहरा. क्षणैक मायेचे पाश पुन्हा ओढूं पाहतात पण तितक्यात......समोरून समुद्राची गर्जना ऐकूं येते. 'कुणाची तरी मोठ्यानं हांक......अन् आपण धांवून जातों ......'

ती स्वप्नांतली हांक ऐकून तो जागा झाला. पहांट झाली होती. समुद्राची अस्पष्ट कुरकुर ऐकूं येत होती. रात्रीचं वादळ जाऊन आकाश निरभ्र झालं होतं. पहाटेच्या चंद्राचा निस्तेज प्रकाश बाहेर पडला होता. तो लगबगीनं उठला. भिमेकडे एकवार बघितले. पण क्षणार्धात तो बाहेर पडला झपाझप पावलं टाकीत तो माझ्याकडे आला व माझ्या अंगाला लागलेल्या गलबताकडे वळला.

तीन महिन्यापासून तें पडलं होतं तिथं. तो सरसर त्यावर चढून गेला, व दुसऱ्याक्षणीं त्या गलबतानें क्षितिजाचा रस्ता सुधारला. त्यांत गाढ निद्रेत असलेल्या त्याच्या सोबत्यांना किनारा सोडल्याची कल्पना देखील नव्हती. निसर्गाचे धागेदोरे इतक्या दूरवर पसरलेले असतात मानवाच्या आयुष्यांत !

*　　　*　　　*

कांही काळ लोटला असेल. एक आकृती पहाटेच्या अंधुक प्रकाशांत मी धावत येतांना बघितली. ती भिमी होती. तिचे विस्कटलेले केस, विलग ओंठ व विस्कटलेले डोळे मी बघितले अन् सारं उमजलो. तिनं क्षितिजाकडे बघितलं मात्र अन् तिची भीती खरी ठरली. निस्तेज चंद्रप्रकाशांत तोच मोठा काळा डाग तिला पुन्हा एकदा दिसला. ' अयाई ' म्हणून तिनं वक्षःस्थलावर दोन्ही हात दाबून धरले, व दुसऱ्या क्षणीं तिच्या प्रियकराची बोट वाहून नेणाऱ्या अफाट सागराकडे तिनं धाव घेतली. ' खळ्ळ् ! ' असा आवाज झाला व क्षणार्धांत निस्तब्ध शांतता पसरली.

आकाशांत छिन्नविच्छिन्नपणे विखुरलेल्या मेघांत चंद्रानं तोंड लपवलं होतं. दर्याची अखंड कुरबूर चाललीच होती. माझ्या शेजारीं उभ्या असलेल्या ताडवृक्षाचं फडफडणं मला किती वेळ तरी ऐकूं येत होतं.

अत्यंत कष्टी झालो मी ! माझ्या आयुष्यांत दर्याच्या लाटेशीं मीही प्रीति खेळून चुकलों होतों. त्या वेळी तिला प्रेमाचं भरतं आलं होतं. निसर्गानं मला एकाच ठिकाणीं बांधून, अक्षय्य स्थायी करून ठेवलं होतं. लाट मात्र मनमुराद स्वैरपणें वागडे तिच्या प्रेमाला ओहोटी लागतांच ती माझ्यापासून दूर निघून गेली होती. पण मी त्या दुःखांतून जाऊनहि अजून तगून राहिलों होतो. अन् भीमी !

*( प्रथम ' सह्याद्रीत ' प्रकाशित )*

# ४. अनुद्बुद्ध मन

**अप्रतिम संगीत जलसा !**

कोकिलकंठी प्यारीबाईच्या गाण्याचा अभिनव कार्यक्रम

* **आज रात्रौ १० वाजता** *

'**श्या**मच्या' भिंतीवरून व मोठमोठाल्या फलकांवरून ठळक अक्षरांत ती जाहिरात झळकत होती. थिएटर तर आंतून-बाहेरून अगदी मधमाशांच्या पोळयाप्रमाणं नुसतं फुलून गेलं होतं. लोकांच्या गर्दीचा घोंघावणारा आवाज, समोरच्या हॉटेलमधील धांवपळ, रिक्षा, टांगे, मोटारी, सायकलीं यांचे भिन्नभिन्न आवाजाचे ते भोंगे...नुसता गोंधळ उडून गेला होता अगदी !

आंत येणाऱ्या लोकांची सतत रीघ लागली होती. तिकीट-कचेरीसमोर तर विलक्षण गर्दी होती. तिकिट घेण्यासाठी सुरवातीला उभी असलेली "रांग" या तुफान गर्दीत तर केंव्हाच मोडून गेली होती व प्रत्येकाची आधी तिकिट घेण्यासाठी रेटारेट व धक्का बुक्की चालू होती.

थिएटरसमोरील रस्त्यावरून लांबून श्रीनाथ येत होता. जवळच्या कोलाहलाकडे त्याचं लक्ष नसावं. थिएटरच्या अगदी जवळ येतांच मात्र त्या गर्दीकडे त्याचं लक्ष वेधलं; जवळच्याच एका इसमास त्यानं विचारलं.

"कसली गर्दी आहे एवढी ही ?"

"अहो, तुम्हाला ठाऊक नाही का ?" किंचित आश्चर्य दाखवीत तो म्हणाला, "त्या सुप्रसिद्ध प्यारीबाईचा जलसा आहे आज इथं."

श्रीनाथानं क्षणभर समोरच्या भिंतीवरील जाहिरातीवर आपली नजर स्थिर करीत म्हटलं, " प्यारीबाई ! कोण बुवा ही ? कसलीं एकेक नांवं ठेवून घेतात या गायिका ! "

" नांव कसंहि का असेना, पण तिच्यासारखं गोड गाणं दुसरीकडे ऐकायला मिळायचं नाही ! "

नि त्यानंतर प्यारीबाईच्या कोकिलकंठाची तोंडभर स्तुति करण्यास त्या गृहस्थानं सुरवात केली. श्रीनाथाचं त्याच्याकडे मुळीच लक्ष नव्हतं. पण कां कोण जाणे. गाण्याचा विषय निघतांच एक विषादाची छटा त्याच्या मनाला चाटून गेली. त्याचं कारणहि त्याला उमगलं नाही. "

नि असं अनेकदा होई, मधूनमधून त्याचं मन कां कोणास ठाऊक, अस्वस्थ होई, एका विलक्षण विषण्णतेनं तो कासावीस होऊन जाई व तशा मनःस्थितींत कितीतरी दिवस निघून जात अशा वेळीं, आपलं जीवन कुठंतरी अपूर्ण आहे, कांहीतरी चुकल्या चुकल्यासारखं वाटतंय् हीच एक भावना त्याच्या विषादांतून नळावे. तशांतच, शेवटीं तो आपल्या कलेंत विसावा शोधी, एकादी कलाकृति निर्माण होई व त्याचं मन पुन्हा आपोआप पूर्ववत् प्रफुल्लित होऊन जाई. पण त्याला आपल्या ह्या मानसिक विकृतीची उकल कधींच करतां आली नाही.

आताहि असलाच विषाद त्यांच्या मनांत डोकावून गेला; पण तरीहि त्याचे पाय नकळत थिएटरमधे शिरले.

बाहेर गोंगाट चालूच होता. आंत थिएटर खच्चून भरलं होतं. गाण्याला अजून थोडा अवकाश होता. अन्यमनस्क, कोपऱ्यांतल्या एका खुर्चीवर रेलून श्रीनाथ बसला होता. थिएटरमधे शिरतांना वाटलेली विषण्णतेची छटा अजूनहि त्याच्या मनांत घुटमळत होती. केसांची एक बट कपाळावर रेंगाळत होती.

" तो नुक्ताच येऊन बसलेला, तरुण कोण आहे रे ? " श्रीनाथाच्या मागच्या खुर्च्यांवरून दोघे मित्र आपसांत कुजबुजत होते.

" अरे, तो श्रीनाथ नाही का ? शिल्पकार ? "

" खरं का ! बाकी दिसतो खरा कलावंत ! "

" नि आहेहि ! त्याच्या कलाकृति सुप्रसिद्ध आहेत. लहानपणीं म्हणे अत्यंत गरिबीत वाढला. मामाकडे शिल्पकला शिकला. ते स्वत. म्हणे चांगले मूर्तिकार होते. केवळ आपल्या कलेमुळंच श्रीनाथ इतका वर चढला... "

श्रीनाथाच्या बाजूच्या खुर्च्यांवरून प्यारीबाईच्या गाण्याची चर्चा चालू होती. बोलण्यावरून श्रीनाथाला वाटलं, ती माणसं संगीताचीं दर्दी असावी. तोहि त्या चर्चेत सामील झाला.

" कुठली गाणारीण म्हणालांत ही प्यारीबाई ? " त्यानं मधेच विचारलं,

" लखनौच्या रेडिओवर नेहमी ब्रॉडकास्ट होतं तिचं गाणं. शिवाय रेकार्डसहि आहेत कांही. अलीकडेच लोकांच्या नजरेसमोर जास्त येऊं लागलीय् ती ! पण मूळची म्हणतात किरणगावची आहे. "

" काय, किरणगावची आहे ती ? " श्रीनाथ म्हणाला.

" हो, कां ? इतकं आश्चर्यसं वाटलं तुम्हांला ?"

" कांही नाही, उगाच ! मीहि फार लहानपणीं किरणगावाला मामांकडे राहत असे. "

" मग तुम्हांला तर तिच्याविषयी सारं ठाऊक असेल. फार लहानपणापासूनच ती गात असे म्हणतात ! " दुसरा म्हणाला.

" अं...तसं...तशा माझ्या मामाकडच्या साऱ्याच आठवणी अस्पष्ट आहेत. आई वारल्यानंतर मी मामाकडे गेलों तेव्हा कांहीतरी आठएक वर्षांचा असेन. आता तर त्यांतलं कांहीसुद्धा आठवत नाही. " श्रीनाथ बोलला.

" कांहीसा मनोरंजक इतिहास आहे म्हणतात तिच्या आयुष्याचा. तो एक काळाकुट्ट, हेमाडपंती इसम तिला तबल्यांची साथ देतो ना ? त्याच्याजवळ असते ती लहानपणापासून. त्यानंच तिला...लहानपणापासून गाणं शिकवून

मजलसीसाठी तयार केलीय्. पण कांही म्हणा बुवा, इतकं अप्रतीम गोड गाणं म्हणते ना ? पण कशी अगदी यंत्राप्रमाणं, एखाद्या निर्जीव बाहुलीसारखी..."

त्या संगीतप्रेमी जिज्ञासूचं वाक्य अर्धवटच राहिलं. सर्रकन् पडदा वर गेला. नि त्याक्षणी त्याच्या कानाला गायनाचे गोड सूर जाऊन भिडले.

" श्रीकृष्ण, तुम्ही हो मोरे जीवनाधार ! "

गाणं सुरू झालं. किती सुरेख आवाज होता तो ! लवकर सारं थिएटर मुग्ध होऊन गेलं. श्रोते माना डोलवूं लागले. श्रीनाथहि एकाग्रतेनं ऐकत होता.

हळूहळू बैठक रंगूं लागली. वा ! केवढी मिठास ! काय हातोटी !

" श्री ऽ ऽ ऽ ! " " श्री ऽ ऽ ऽ " प्यारीचं एकामागून एक ताना, आळवणं सुरू होतं ! प्रेक्षकांवर वेगवेगळ्या व अप्रतीम तानांचा वर्षाव होऊं लागला. मात्र श्रीनाथाच्या हृदयांतील ती अननुभूत विषण्णता, बुडी मारून कांही वेळानं पुन्हा वर डोकं काढणाऱ्या मनुष्याप्रमाणं वर उचंबळून आली व जसजसा तिच्या तानांतील ' श्री ' हा शब्द त्याच्या कानांवर आदळूं लागला तसतशी त्याची तळमळ वाढतच गेली.

" असं कां वाटतयं आपणाला ? " त्यानं स्वतःशीच विचारून पाहिलं; " हा आवाज आपल्या ओळखीचा आहे का ? पण पूर्वी आपण कधीच प्यारी-बाईचं गाणं ऐकलं नाही !... मग ? कदाचित्..."

मनांतली अस्वस्थता असह्य होऊन त्यानं त्या शेजारच्या संगीतप्रेमी इसमाला विचारलं,

" काय हो, तुम्ही या प्यारीबाईचं नांव काय सांगितलंत मघाशी ?"

" अं . सुमती की कायसं म्हणतात बुवा !"

" की वासंती रे ? " दुसऱ्यानं अंमळ आठवून सुचवलं.

" असंच कांहीसं आहे. पण कोण जाणे. नक्की आठवत नाही. मात्र नांव थोडसं अवघड आहे, " पहिला.

" वासंती ? की सुमती ?... अं ?" श्रीनाथ स्वतःशीं पुटपुटला, " काय हो, वसुमती तर नाही ? "

" हो हो, खरंच ! वसुमतीच ! अगदी नक्की तेंच ! " तो गृहस्थ पुन्हा गाणं ऐकण्यांत मग्न झाला.

पण ' वसुमती ' हें नांव आठवतांच, सतत कानावर आदळणाऱ्या तिच्या आवाजाच्या पार्श्वभूमींत श्रीनाथाच्या मनांतील स्मृतीवर चढलेली सारी पुटं एकदम भराभर दूर सारलीं गेलीं व त्या सर्वांच्या खाली दडून बसलेला एक नाजुक, फिक्कट, सुंदर चेहरा त्याच्या अप्रकट मनांतून निघून अंतःश्चक्षूंसमोर उभा राहिला. त्याला एकदम आठवलं. कित्येक वर्षांपूर्वी त्यानं तो बघितला होता. तिचे भिरभिरते डोळे, अगदीं पातळ नाक व लांबट चेहरा-हें त्याचं वैशिष्ट्य होतं. तोच तो ! तीच वसुमती ! तिचाच हा गोड आवाज, अगदी आपल्या ओळखीचा !

त्यानं प्यारीबाईकडे बघितलं. ती तान आळवीत होती.

" मग तीच ही कोकीळकंठी प्यारीबाई तर ! पण ' प्यारीबाई ' हें नांव कधीपासून घेतलं हिनं ? " तो मनाशीं म्हणाला.

वाऱ्याची झुळूक येतांच गुदमरणाऱ्या जिवाला हलकं वाटावं त्याप्रमाणं तो चेहरा व इतके दिवस खोल दडून बसलेल्या तदनुषंगिक साऱ्या स्मृति त्याच्या सुप्त मनांतून बाहेर पडतांच त्याच्या हृदयाची कालवाकालव थांबली, मनाचा कोंडमारा बंद झाला; जिवाची अज्ञात अस्वस्थता गेली फक्त त्या जागीं विषाद बाकी होता.

तो आठवूं लागला. कितीतरी जुन्या स्मृति होत्या ! त्याच्या जागृत मनांत त्यांचे त्या क्षणापर्यंत पुसटहि अवशेष बाकी नव्हते. प्यारीच्या गाण्याचे सूर कानांवर आदळत होते व त्या स्वरवलयांत सारीं जुनी स्मृतिचित्रं त्याच्या अंतःश्चक्षू समोरून एकामागून एक सरकूं लागलीं...

* * *

वसुमती ! कुठं पाहिली बरं हिला प्रथम ? खरंच, उस्तादजीकडे ! ते छोटसं किरणगाव...तें मामांचं मोडकं घर...जवळच राहणारे ते काळेकभिन्न उस्तादजी; आपली आई वारल्यानंतर मामांनी आपल्याला किरणगावला आणलं. पुरा महिनाहि झाला नव्हता तिथं येऊन. आपले दिवस कंटाळवाणे जात. राहूनराहून आईची आठवण येई आणि उदास वाटे. मामांकडे किंवा शेजारीहि खेळायला बरोबरीचं कुणी नव्हतं. गरिबीमुळं मामी घरांतील काबाडकष्टांतच सदैव गुरफटलेली असे. मामा एकसारखे ' ठक्, ठक् ' करीत एकाद्या मूर्तीचं नाक किंवा डोळा घडविण्यांत गुंतलेले राहात. शेजारचे उस्ताद रहीम बोलके असूनहि मला आवडत नसत. पण मामांची त्यांच्याशी दोस्ती होती.

त्या दिवशीं रात्रीं मामी म्हणाल्या, " श्री ! उस्तादमियां ××× पुरच्या मेळ्याहून संध्याकाळीं परत आले बरं का ! "

" आले असतील, मला काय त्याचं ? " त्यांच्याबद्दल वाटणारा तिरस्कार न लपवतां आपण म्हणालो.

" त्यांनी तुझ्यासाठीं काय आणलंय ठाऊक आहे ? "

" खरंच का ! काय आणलंय्.? " आपण प्रफुल्लित झालों लगेच.

" ओळख पाहूं ? "

" विटीदांडू ?...ढमढमगाडी ?···तो किल्लीचा राघूचा पिंजरा ? ".

प्रत्येक वेळी मामी नकारार्थी मान हलवी. शेवटीं आपण म्हणालो, " हारलों. सांग आता ! "

" तुझ्याबरोबर खेळायला खरोखरची एक बाहुली आणलीय ! "

" बाहुली ? शीः, मी काय मुलगी आहे का बाहुली खेळायला ? " आपण खट्टू झालों.

" असा फुरंगटूं नकोस. चल तर खरा. इतकी सुंदर आहे ती, की मग तिच्याशींच रात्रंदिवस खेळत राहशील " मामीनं उस्तादजीकडे नेलं थेट बवर्जीखान्यापर्यंत जाऊन आलों. बाहुली कुठंच दिसली नाही. उस्तादजी फक्त गालांतल्या गालांत हसत होते. शेवटीं रागावून आपण मामीला म्हणालो,

" कुठं आहे ग मामी बाहुली ? "

" ये ना दाखवतो ! " असं म्हणत उस्तादजींनी आपला हात धरला व आपल्या खोलीकडे नेलं. हातानं अलगद दार उघडलं. आपण अगदी अधीर झालों होतों. दार एकदम सताड उघडं झालं; उस्तादजी म्हणाले " ही बघ. " आपण उंबरठ्यावरच पाहात उभे राहिलों. उस्तादजींच्या खाटेवर एक सुंदर मुलगी बसली होती. पांचसहा वर्षांची असावी ती. तिनं चमकून आपली भिरभिरती, भित्री नजर आपणाकडे वळवली. रडूनरडून तिचे डोळे अगदी लाल झाले होते. पण तरीहि आपणास वाटलं, किती सुंदर डोळे आहेत तिचे ! त्यांतला भित्रेपणा, असहाय्यता, साऱ्या गोष्टी संवेदनेनं आपल्या हृदयाला जाऊन भिडल्या होत्या.

आणि एकदम किती आवडली ती मुलगी आपणाला ! तिचे ते भित्रे, भिरभिरणारे, काळेभोर डोळे, पातळ बारीकसं नाक, लांबट चेहरा...किती बाहुलीसारखीच होती ती ! त्यानंतर मामी, बुवाजान व उस्तादजी आपापसांत व तिच्याशीं काय बोलत होती यांकडे आपलं मुळीच लक्ष नव्हतं.

रात्रीं मामीशेजारीं पडल्यापडल्या कितीदातरी तो तिचा बाहुली-सारखा नीटसा चेहरा आपणांस आठवत होता. अर्धवट झोपेतच आपण मामीला विचारलं,

" मामी, ती मुलगी उस्तादजींनी मेळ्यांतून आणली म्हणजे काय ग ! विकत मिळाली त्यांना ?

" छे, रे ! त्यांना ती मेळ्याच्या गर्दींत सापडली."

" सांपडली म्हणजे ? " आपण.

" मेळ्याच्या त्या गर्दींत तिचे आईबाप हरवले व उस्तादजींना ती एकसारखी रडत असतांना रस्त्याच्या कडेला बसलेली सापडली. त्यांनी मुलीच्या वर्णनाप्रमाणं तिच्या आईबापाना खूप शोधून पाहिलं. पण ते एवढया गर्दीत कसले सापडतात ? बिचारे कुठंकुठं तिला शोधत असतील कोण जाणे ! उस्तादजींनी शेवटी आणली तिला बरोबर..." मामी सांगत होती.

नि दुसरे दिवशीपासून आपली दोघांची विलक्षण गट्टी जमली. ' बाहुली इतकी सुंदर आहे, की मग रात्रंदिवस तिच्याशीच खेळत राहशील ! हे मामीचे शब्द खरे ठरले होते.'

तीच वसुमती... तोच हा चेहरा... त्या वेळचा आपल्या मनावरचा पहिला ठसा याच चेहऱ्याचा !

* * *

प्यारीबाईचं गाणं ऐन रंगांत आलं होतं. त्या गाण्यांत आता श्रीनाथाला किती आपुलकी वाटत होती ! श्रोत्यांच्या कौतुकालाहि सीमा नव्हती. पण त्याचं मन गतायुष्यांतील वसुमतीच्या आठवणींना उजाळा देत होतं. मियांमल्हारचे सूर अर्धवट त्याच्या कानावर पडत होते.

श्रीनाथाला ती रात्र आठवली. त्या रात्रीं कंदिलाच्या मिणमिण प्रकाशांत तो पुस्तक घेऊन उगाचच अभ्यासाचं ढोंग करीत होता. त्याच्या मनांत मात्र संध्याकाळचा प्रसंग घोळत होता.

मध्यंतरी दीड वर्ष लोटलं होतं. हळूहळू वसुमतीचं जीवन पालटलं होतं. बुआजान तिला वाईट वागवीत. उस्तादजींनी तर एक नवीन उपक्रम आरंभला होता. वसुमतीचा गळा विलक्षण गोड आहे हें त्यांना आढळून येतांच त्यांनी तिला संगीताची दीक्षा देण्याचं आरंभलं. साऱ्या गावानं त्यांना ' उस्ताद ' म्हणण्याइतकं संगीताचं ज्ञान त्यांना होतंच. सुरवातीला एखादा तास, पण आताशा तर दिवसांतून पांचपांच, सहासहा तास ते तिच्याकडून गाण्याची तालीम घेऊं लागले. ती आता आईबापांविरहित अशी निराश्रीत छोकरी म्हणून

राहिली नव्हती. तर त्यांच्या पुढील स्वप्नांच्या व महत्वाकांक्षेच्या पूर्तीचं एकमेव साधन बनली होती. बालमनाच्या स्वाभाविक खेळकरपणालाहि त्यांच्या त्या तालमींत कुठं स्थान राहिल नव्हतं.

त्या दिवशीं संध्याकाळीं पाठीवर दप्तर टाकून श्रीनाथ शाळेंतून परत येत होता.

" श्री ऽऽ ए, श्री ऽ ऽ", अशा हाका त्याला ऐकूं आल्या. त्यानं चमकून बाजूला वळून बघितलं.

" कोण ? वसुमती ! " झाडाखाली उभ्या असलेल्या आकृतिकडे पाहात तो म्हणाला व धावत तिच्याजवळ गेला.

त्यानं विचारलं, " इथं कशी आलीस ? " किती कोमेजलेली दिसत होती ती त्याच्या डोळ्यांना.

" आज मुद्दाम आलें पळून. सारखं गाणं, गाणं, गाणं !...कंटाळा आल मला. आज उस्तादजी बाजारांत गेले आहेत. व बुवाजान चुलीशीं खुडबुड करीत होत्या. म्हणून मी बाहेरच्या बाहेर पळून आले," तिच्या बोलण्यां वैताग होता.

" आजकाल तूं माझ्याकडे कां येत नाहीस ? "—श्री.

" उस्तादजी म्हणतात, श्रीनाथ उनाड आहे; त्याच्याशीं खेळण्यांत वे दवडीत जाऊं नकोस. कारण तुला आता मोठ्ठी गाणारीण व्हायचं आहे. "

श्रीला वाईट वाटलं होतं. उस्तादजी विषयीचा त्याचा तिरस्कारही वाढला तो मुकाट्यानं ऐकत होता.

" नि तुला ठाऊक आहे का, श्री ? उस्तादजी म्हणतात, तूं मोठी गाणारी हो. नांव मिळव. मग आपल्यापुढं पैशाच्या राशी लागतील. मग तूं मोठ होशील नि मग मी तुझ्याशीं निका लावीन ! "

" निका म्हणजे काय ग ? " श्रीनं विचारलं होतं.

" मी उस्तादजींना विचारलं ! " वसुमती म्हणाली, " तेव्हा ते म्हणाले, निका म्हणजे लग्न. "

" शीः ! किती काळेढोण आहेत ग तुझे ते उस्तादजी. पण इतका काळा नवरा आवडेल का ग तुला ? "

" छट्, मुळीच नाही. पण त्यांची मला खूपच भीति वाटते. मला बुबा-जानचाही राग येतो. त्याहि तसंच बोलतात. "

नि आपले भित्रे डोळे मोठ्ठाले करीत तिनं आजूबाजूला बघितलं "श्री... मी जाते. आता उस्तादजी आले असतील. मग गाणं म्हणायचं आहे. नाहीतर... रागावतील." तिचे डोळे ओले झाले. तिनं एकदम धूम ठोकली. तो झाडा-खालीच उभा होता.

किंचित लांब जाऊन ती थबकली. " श्री ऽऽ ! मी उद्या अशीच पुन्हा येईन !" ती ओरडली व क्षणार्धात नाहीशी झाली.

लहानग्या श्रीनाथाला हाच सारा प्रसंग अभ्यासाचं पुस्तक समोर धरलं असतांना आठवत होता. वसुमतीसाठी वाईट वाटत होतं रात्रीचं काम आटोपून मामी तिथं आली त्यावेळींहि श्रीसमोर पुस्तक उघडं पडलं होतं. मामी म्हणाली:

" नीज आता श्रीनाथ ! पुरे झाला अभ्यास. "

त्यानं पुस्तक मिटलं आणि किंचित घुटमळत हलक्या आवाजांत विचारलं, " मामी, उस्तादजी वसुमतीशीं निका लावणार आहेत का ग ? "

" छट् ! कुणी सांगितलं तुला हें ? "

" वसुमतीच सांगत होती मला. " व श्रीनं सारी हकीकत सांगितली. तरीहि तिचा त्यावर विश्वास बसलेला दिसला नाही. ती म्हणाली, " वसुमतीनं गाणं शिकावं म्हणून गंमत करीत असतील उस्तादजी. शक्य तरी आहे का ? ते किती मोठे ! जवळजवळ पंचविशीचे व ती कुठं सातआठ वर्षांची गोड, कोवळी पोर ! नि शिवाय..."

"नि शिवाय-किती काळेकुट्ट नि घाणेरडे आहेत ग ते !" श्री म्हणाला. मामी हसूं लागली. त्याला थोडं बरं वाटलं. उस्तादजींनी गंमत केली अशीच त्यानंहि आपली समजूत करून घेतली. उद्यां आपण वसुमतीला समजाऊन सांगू म्हणजे तिची भीति कमी होईल बिचारी वसुमती ! अशी उदास का दिसते ती नेहमी ? तेव्हांची तीच भित्री, असाहाय्य वसुमती ! अजूनहि डोळयांत तोच भित्रेपणा, चेहऱ्यावरहि तीच उदासी दिसते. पण आता ही कसली दगडी निश्चलता शिरली आहे तिच्या वृत्तींत ! " श्रीनाथ स्वतःशीच बोलत होता !

श्रीनाथानं प्यारीच्या साथीदाराकडे नजर फिरवली. तबलजीकडे त्याचं लक्ष गेलं. होय, तेच उस्तादजी होत. त्यांचा रंग ही त्यांना ओळखून काढ- ण्याची बिनचूक खूण होती !

" नाधिंधिंना ! नाधिंधिंना ! " तबल्याचे घूं घूं घुमणारे बोल ते आपल्या जाड बोटांनी काढीत होते. डोळे प्यारीकडे होते. तबल्याच्या ठोक्याबरोबर त्यांचं अंगहि लचकत होतें. प्यारी एखाद्या वेळीच त्यांच्याकडे पाही; पण त्या वेळीं तिची तीच भावनाशून्य भित्री नजर असे. ते तिच्या उजव्या बाजूला अगदी जवळ बसले होते. श्रीनाथाला वाटलं, तिथंहि त्यांची तिच्यावरची मालकी दिसत होती. मग ? ' निका ' लावला असेल का त्यांनीं ? म्हणून तर हा निर्जीव दगडीपणा आला नसेल तिच्यांत ?

पडदा खाली आला. मध्यंतर होतं अर्ध्या तासाचं श्रीनाथाच्या मनांत एकदम एक विचार आलाः "आताच्या आता जाऊन प्यारीला भेटावं...तिच्या या निर्जीव जीवनाचं कारण विचारावं...आपल्याहि अंतःकरणाची व्यथा सांगून टाकावी अन् . " तो एकदम उठला व थिएटरच्या अंतर्भागाकडे जाऊं लागला. कांही पावलं गेला असेल; पण...पडद्याजवळ येतांच त्याचे पाय अडखडले...

पडद्याच्या आंत चहा-कॉफीच्या कपबशांचा खणखणाट ऐकूं येत होता. मोठमोठ्यानं संवाद चालू होते. त्यांत हसणंहि एखादे वेळेस ऐकूं येई. श्रीनाथ पडद्याशींच उभा राहिला.

" आज तर बहार केलीस प्यारी तूं ! " उस्तादजीचा घोंघावणारा आवाज.

क्षणभर उत्तर नव्हतं. मागाहून " खरचं ? " प्यारीचा स्वर. किती पडलेला आवाज !

" अगदी अक्षरशः खरं ? " दुसरा कुणीतरी.

" बाकी खरंच, प्यारी, आपला निका लागलाय् तेव्हापासूनच इतकं तळमळीनें गाऊं लागली आहेस तूं !..." उस्तादजी, लाडिकपणें.

प्यारीचं उत्तर नाही. बहुधा मान खाली असावी. सर्वत्र हंशा. प्यारीचे बाकीचे साथीदार असावेत. श्रीनाथाला तिथं उभं राहवेना !

" एकूण त्यांचा निका लागला म्हणायचा ! " तो स्वतःशीं पुटपुटला. " नि तेव्हापासूनच प्यारीची तळमळ वाढली आहे. पण उस्तादजीला काय ठाऊक वसुमतीच्या तळमळीचं खरं कारण ? "

त्यानंतर श्रीनाथाला आपली कृति हास्यास्पद वाटूं लागली. " काय करणार आहोंत आपण ? यापासून काय फायदा ? " अन् शिवाय उस्तादजी ? त्याहीपुढं . वसुमती आपल्याला ओळखेल काय ? " ही कल्पना मनांत येतांच त्यानं आपलीं पावलं मागं वळवलीं.तो पुन्हा आपल्या जागीं आला व त्यानं जडपणें खुर्चीवर अंग टाकलं.

* * *

मध्यंतर संपलं. गाण्याला पुन्हा नवीन जोमानं सुरवात झाली. थिएटर लौकरच पूर्वीप्रमाणं, किंबहुना जास्तच रंगलं. पण श्रीनाथाचा विषाद मात्र वाढत गेला, "वसुमतीची भेट आता पुन्हा कधीच होणार नाही." या कल्पनेमुळंच त्याला अतोनात दुःख झालं. किती विचित्र योगायोग हा ! " आपण कधीकाळीं वसुमतीच्या गाण्याला हजर होतो, भेटीसाठी अस्वस्थ झालों व क्षणांत पूर्वीचा बेत रद्द करून भेटलों नाही हें तिला कधी समजलं तर? काय वाटेल

तिला?" तो विमनस्कपणे हंसला. गाण्याकडे त्याचं बिलकुल लक्ष नव्हतं. आता तर त्याचं मन वसुमतीच्या आठवणींत जास्तच गुरफटलं.

त्या दिवशीं संध्याकाळच्या प्रसंगानंतर दोन वर्षानी एका सकाळीं जेवायला वाढतांवाढतां मामी म्हणाली,

" तुला कळलं का रे, श्री ? "

" काय ? "

" उस्तादजी उद्या लखनौला जाणार आहेत. "

" नि वसुमतीसुद्धा ? " आपण भीतभीत विचारलं.

" अर्थात्. तिलाच पुढं गाणं शिकविण्यासाठी उस्तादजी चंबूगवाळ्या-सह जाणार. "

आपणाला खरं वाटेना. आपण वसुमतीकडे धावत गेलो. तिला एका-तांत विचारलं,

" तूं खरंच जाणार आहेस लखनौला ? "

" हूं. " तिनं माननंच हो म्हटलं.

आपल्यास पुढं काय बोलावं हें सुचलं नाही. दोघंहि उभीं होतो. थोड्या वेळानं आपण म्हटलं,

" परत कधी ग येणार तुम्ही ?"

" कोण जाणे ! उस्तादजी तर म्हणतात, कधीहि नाही. इथून कायम-चंच जायचं ! " ती दबलेल्या आवाजांत सांगत होती. सांगतांसांगतां किती पटकन् तिचे डोळे ओले झाले !

दुसरे दिवशीं सकाळींच एक गाडी उस्तादजींच्या दारासमोर येऊन उभी राहिलेली दिसत होती. सर्व सामान आंत ठेवलं जात होतं. संध्याकाळपर्यंत सारं सामान भरलं गेलं. त्या दिवशीं आपण घराच्या पडवींत उभं राहून ते सारं सामान ठेवले जातांना पाहात होतों. " वसुमती जाणार तर आज, नाही का ? " असं आपण शंभरदा तरी मनांतल्या मनांत म्हणालों असूं.

तिन्हीसांजेची वेळ होऊं लागली. उस्तादजी घाई करूं लागले. त्यांनाहि मामाचा इतके वर्षांचा सहवास सोडतांना वाईट वाटलं. वसुमती व मी एकमेकांकडे येतां जातां फक्त पाहात होतों. तिचा लाबट चेहरा जास्तच लांब दिसत होता. डोळे रडवेले झाले होते. पण ती कांहीच बोलली नाही. बुआजाननंहि मामींचा निरोप घेतला. आपण मात्र सतत खांबाशीं टेकून उभा होतों हळूहळू सारींजण गाडींत बसली. गाडी चालूं लागली. जातांना वसुमतीनं आपल्याकडे बघून अखेरचा निरोप घेतला. आपण तिच्याकडे व तिचा चेहरा दृष्टीआड होईपर्यंत बघत राहिलो. तिचे ते भित्रे भिरभिरते डोळे, बारीक नाक व लांबट चेहरा याचा फक्त ठसाच राहून गेला. वसुमती तिथून दिसेनाशीहि झाली होती.

झालं ! वसुमती गेली आपण अगदी एकटे पडलों ! कालांतरानं साऱ्या आठवणी पुसट झाल्या फक्त तिच्या चेहऱ्याची अस्पष्ट आठवण कांही दिवस मनांत रेंगाळत राहिली व कालांतरानं तिची स्मृति कायमची पुसली गेली.

गाण्याचा कार्यक्रम आटपत आला. भैरवीचे सूर प्यारीबाईच्या आवाजातून निघूं लागले. तिनं पहिलीच तान छेडली व लगेच हळूहळू शब्द बाहेर पडूं लागले.

" जोगी, मत जा, मत जा, मत जा. पाव पडूं मैं तेरी. "

प्रेक्षकांवर एकामागून एक आलापाचा वर्षाव होऊं लागला. अंतःकरणाचा ठाव घेणारे तिचे ते माधुर्यानं ओथंबलेले आलाप ऐकून [illegible]ांचीं मनं हालून निघाली. स्वतः प्यारीबाई बाह्यतः निश्चल दिसत होती. पण जणू कांही त्या स्वरात तिचं अंतःकरण फुटून बाहेर पडत होतं. कित्येकजण तर डोळ्यांना रुमाल लावतांना दिसत होते.

श्रीनाथला बसवेना ! त्याला आपल्या हृदयाचे तुकडेतुकडे होत आहेत असं वाटत होतं. " जोगी मत जा " या गाण्यातून वसुमतीच्या अंतःकरणां-

तली सारी व्यथा, जिवाची तगमग व जीवनातील कारुण्य ओतून निघल होतं असंच त्याला वाटलं. नि त्यावेळी कुठं त्याला वसुमतीच्या दुःखाची खरी तीव्रता अजमावतां आली! त्याच्यासमोर एकच मूर्ति वारंवार नाचत होती. भित्री, असाहाय्य वसुमती! तिचा तो लांबट, कृश चेहरा, ते बारीक सरळ नाक, मोठमोठाले सुंदर काळेभोर डोळे ..

श्रीनाथाला जास्त वेळ तिथे बसवेना. तो एकदम उठला व सारं अवसान गोळा करून थिएटरच्या बाहेर पडला. त्याची पावलं त्याला कुठं नेत होतीं याचं त्याला भान नव्हतं. फक्त तो वसुमतीच्या दुःखापासून दूर जाऊं इच्छित होता. ते त्याला ऐकवत नव्हतं. त्याच्या जिवाची काहिली होत होती.

श्रांत व जड पावलांनी श्रीनाथानं आपल्या घराच्या पायऱ्या ओलांडल्या. दाराचं कुलूप काढलं. समोर मिणमिण दिवा जळत होता. अशा अत्यंत विषादाच्या मनःस्थितीत त्याचं फक्त एकच आश्रयस्थान होतं— जिथं त्याच्या दुःखाला विरंगुळा मिळू शके— त्याचा स्टूडियो.

त्यानं तिकडेच पावलं वळवलीं. हळूंच स्टूडिओचा दरवाजा उघडला. स्टुडिओचा मोठा दिवा उजाळला. त्या उजेडांत त्याच्या साऱ्या कलाकृति न्हावून निघाल्या. त्यानं अलगद हातानं टाकी उचलली मधल्या स्टुलावर एक अर्धवट प्रतिमा पडून होती. तिच्या चेहऱ्यावरील साफसफाईचं काम बाकी राहिलं होतं. त्या प्रतिमेकडेच तो वळला. तिच्यावर टाकीचे घाव घालणार इतक्यांत त्याचं लक्ष प्रतिमेच्या पूर्ण चेहऱ्याकडे गेलं.

तो पुनःपुन्हा नीट निरखून पाहूं लागला...हें काय! की नुसता भासच? श्रीनाथाच्या मनांत कल्पना चमकली. तो तसाच प्रत्येक प्रतिमेकडे जाऊन तिचं निरीक्षण करूं लागला. त्यानं घडविलेल्या वेगवेगळ्या आकारांच्या, भिन्नभिन्न व्यक्तींच्या, नाना अवस्थेतल्या, लहानमोठया अनेक मूर्ति होत्या तिथं. बस्ट्स, प्रोफाईल्स, लाईफ साईझ पुतळे... साऱ्यांकडे त्यानं बारकाईनं न्याहाळलं.

नि त्याला आढळलं, की त्या साऱ्या मूर्ति इतर बाबतीत कितीहि भिन्न असल्या तरी त्या सर्वांत एक विलक्षण साम्य होतं. प्रत्येक मूर्तीच्या चेहऱ्यावर थोडयाफार फरकानं एकच एक ठसा उमटलेला दिसत होता. प्रत्येकीच्या चेहऱ्याची एकसारखीच घडण होती. लांबट चेहरा, सरळ बारीक नाक, मोठ-मोठाले सुंदर डोळे !

श्रीनाथ क्षणभर पाहातच राहिला. दुसऱ्या क्षणीं, मधे ठेवलेल्या मूर्ती-जवळ जाऊन त्यानं डोकं तिच्या पायथ्याशी टेकलं. त्याच्या तोंडून फक्त " वसुमती ! वसुमती ! " असे शब्द बाहेर पडले आणि डोळ्यांतून अश्रुंच्या धारा वाहूं लागल्या.

*ही कथा प्रथम एप्रिल १९४८ च्या ' स्त्री ' मासिकांत प्रसिद्ध झाली.*

# ९. न सुटणारी गांठ

" कांहो ? या पार्वतीबाई कोण आहेत ? ' पाव्हण्याबाईंनी स्वयंपाकीण काकूंना एकांतांत हळूंच विचारलं.

" पार्वतीबाई ? त्या साहेबांच्या पत्नी," काकूंनी ठसक्यानं सांगितलं.

" हो कां ? " आश्चर्य दाबीत पाव्हण्याबाई म्हणाल्या.

" पण मग इंदिराबाई ? "

" अहो त्याही साहेबांच्याच ! मोठया मालकिणी इतक्याच किंबहुना ज्यास्तच आहेत कांकणभर ! "

" म्हणजे ? सदाशिवरावांना दोन बायका आहेत ? "

" छे हो ! चोवीस तास पाप वावरतं आहे या घरांत ? " अन् काकू हळूंच कुजबुजल्या. " या इंदिराबाई म्हणजे मालकाची राख···" पाव्हण्याबाई पाहातच राहिल्या.

पण ते हळूंच उच्चारिलेले शब्दही त्यावेळीं स्वयंपाक घरावरून जिन्या-कडे जाणाऱ्या सदाशिवरावांच्या कानांवर जोरानं आदळले नि केवढा आघात केला त्यांनी ?

" इंदिराबाई म्हणजे मालकाची राख ! " ते स्वतःशींच त्वेषाने म्हणाले. ..." पण खरंच ? " असं कांहीसं पुटपुटत ते हळूंहळूं जिना चढूं लागले. आफिसला जाण्याची घाई असूनही त्यांचे पाय झटपट उचलेनात. एकएक मणाचं ओझं त्यांच्या पायाला बांधलं होतं जणूं ! ते शब्द ऐकून त्यांना नुसतं दुःखच झालं नव्हतं. चीड व त्वेष यांचीही छटा त्यांत होती.

पण काय ? इंदिरा त्यांची ' राख ' नव्हती कां ? होतीच ! मग त्यांत काय होतं एवढं मनाला लावून घेण्याजोगं ? तरी पण ' राख ' ह्या शब्दानं

ज्या भाव व भावनांची अभिव्यक्ति होत होती, ती इंदिरेला लागूं करायला त्याचं मन तयार नव्हतं.

सदाशिवराव जिन्याच्या वरच्या पायरीवर चढेपर्यंत इंदिराबाई त्यांच्याकडे दाराआड लपून बघत होत्या. ते वर निघून जातांच त्यांनी आपली आंसवांची कणव दाबून धरली. पदराचं टोक डोळ्यावरून फेरलं व सदाशिवरावासाठीं आंघोळीला पाणी काढण्यासाठी त्या नहाणींत निघून गेल्या.

"मालकांची राख" ह्या शब्दांनी सदाशिवरावाच्या हृदयात कालवाकालव सुरूं केली...पण इंदिराबाईच्या कानात तर ते तापलेल्या सळईप्रमाणे खुपसले गेले. कारण त्यावेळी त्या स्वयंपाकघराशेजारीच कोठीच्या खोलीत होत्या ते ऐकतांच त्यांच्या हृदयावर सुरी धरल्याप्रमाणे झालं. खरंच, पण लोकप्रवादाचे चटके सहन करण्यापेक्षा त्यानी सदाशिवरावाशी विवाहच का केला नाहीं ? त्यानी स्वतःशीच प्रश्न केला. नाहीं तरी त्या राजरोसपणें त्याच्याबरोबर संसार करीत नव्हत्या का ? मग उघड उघड लग्नच करायला काय हरकत होती ?

'काय हरकत होती ! तिथंच तर त्याच्या सारख्या इतर स्त्रीपुरुषाच्या जीवनाची खीळ होती. तीच नड होती. सामाजिक निर्बंधनानी व कायद्यानी त्यांना दुसरा मार्ग मोकळा ठेवला नव्हता...त्याच्या गळ्याभोवती अधिकच आंवळून नुसती माणुसकी पाळायची सुद्धा मोकळीक त्याना ठेवली नव्हती. नि म्हणूनच नाहीं का त्यानी त्या साऱ्यांची गठडी वळून खुंटीला लावली होती ? त्यांत काय वावग झालं ? इंदिराबाईनी पुन्हा आपल्या मनाला सवाल टाकला. "हे त्यानी स्वैराचार म्हणून केलं होतं कां ? कीं जीवनाची आत्यंतिक गरज म्हणून ?" अन् कुणाला उजळ माथ्यानं जगायला आवडणार नाही ? पण–पण ?

ह्या एका 'पणा'नं त्याच्या जीवनप्रवाहात बाध टाकून तो अडवून धरला होता ? नि त्या विचारासरशीं त्याच्या मनानं भूतकालाकडे एकदम झेप टाकली. त्यांचा प्रथम संसार, त्याचा तो व्यसनी पती, त्याची निर्दय वागणूक, ती मानहानी व असह्य यमयातना···ह्या साऱ्यांची आठवण क्विना'न-

पेक्षांही कडू होती. तो दुःखाचा पेला स्मृतीच्या ओंठाशीं येतांच त्यांनी तो बाजूला सारला, तेवढयांत ... जिन्यावर पावलं वाजलीं. सदाशिवराव खालीं येत होते. त्यांची चाल रोजचीच होती. परंतु त्यांचा चेहरा-? त्याकडे इंदिराबाईंनी ओझरती सुद्धां नजर टाकण्याचं धाडस केलं नाहीं.

पाण्याच्या बादलींत टाकलेला हात त्यांनी खरकन् बाहेर ओढला व त्या लगबगीनं बाहेर जाऊं लागल्या. पण सदाशिवरावांची नजर त्यांच्या चेहऱ्याकडेच होती. त्यांना सर्व कांही उगमलं. तिनंही ते शब्द ऐकले होते तर ? एकदम रूद्ध स्वरांत त्यांनी म्हटलंः

" इंदिरे ? "

" अं ऽऽ? " इंदिराबाईची मान खालीच होती.

" इंदिरे ? पाणी काढलंस आंघोळीला ? "

" हूं. "

" मग मला बोलवायला रोजसारखी आली नाहीस ? "

" अंहृ- ऽऽ! "

" कां ? " तो खोंचक प्रश्न ऐकून इंदिरा गोंधळली. पण लगेच म्हणाली, " ऊं ! उगीच. येणारच होते..."

" खोटं " सदाशिवराव एकदम म्हणाले इंदिरेनं चमकून त्यांच्याकडे पाहिलं. पण कदाचित् आवरून धरलेले अश्रू बाहेर धांवून येतील म्हणून ती दुसरेक्षणी स्वयंपाक घरांत निघून गेली.

* * *

आंघोळीनंतर सदाशिवराव जेवायला बसले होते. पाव्हण्याबाईनी कुतूहलपूर्ण नजरेनं आंत डोकावून बघितलं. इंदिरा त्यांना वाढीत होती. पण ती दोघं बोलत नव्हतीं. काकू पोळया लाटत होत्या. पण हाताप्रमाणे त्यांचं मनही त्या लाटत असलेल्या पोळीप्रमाणेच पाव्हण्यांशीं नुकत्याच झालेल्या चर्चेभोवती

गोलगोल फिरत होतं. त्यांचंच कशाला ! इंदिराबाई व सदाशिवराव दोघेही आपल्या विचारांत मग्न होतीं. त्याचवेळीं देवघरांतून आवाज येत होता.

‘ धांव पावरे गोविंदा
हातीं घेऊनिया गदा ’

व्यंकटेश स्तोत्र म्हणून पार्वतीबाई देवाचा धांवा करीत होत्या. त्यांना आपल्या पतीच्या मनांत चाललेल्या वादळाची बिलकूल जाणीव नव्हती... नि जाणण्याची इच्छाही नव्हती. पण ते शब्द कानी पडताच, सदाशिवरावांच्या मनांत, पांच वर्षांपूर्वीच्या साऱ्या घटना एकदम जमा झाल्या.

पांच वर्षांपूर्वी. त्यावेळीं इंदिरा त्यांच्या जीवनात सुद्धां नव्हती. फक्त ती दोघंच... सदाशिवराव नि पार्वतीबाई. पण सदाशिवरावांच्या हृदयांतला कुठलातरी एक कोपरा रिकामा राहिला होता. पार्वतीबाई सदा संसाराची व देवाची सेवा करण्यांतच गुंतलेल्या असत. उठल्याबरोबर देवाची काकडारती, त्यानंतर देवांना चहा, नंतर आंघोळ, पूजा, नैवेद्य, कपडेलत्ते, दागदागिने, देवघराची स्वच्छता, एक ना दोन. अनेक गोष्टीत पार्वतीबाई रमून जात. अगदी तासनतास उत्कटतेनं व भक्तीनं त्या देवाच्या मूर्तीची सेवा करीत व अखंड सुख नि सौभाग्य मागीत. पण त्यांना कल्पनाही नव्हती की खरं सौभाग्य टिकवायलाही सतत प्रयत्न करावा लागतो. पण पतिसुख म्हणजे पती दीर्घायुषी होऊन त्यानं आपल्याला नीट वागविणें. व संसार म्हणजे घरकाम व व्यवहार अशीच त्यांची व्याख्या होती व त्या तशाच वागत. संसार नीट चालायला भावनांचंही भांडवल गुंतवावं लागतं याची त्यांना कल्पनाही नव्हती. दोन्ही वेळ पतीसाठी रांधावं, पतीला वाढावं व त्याच्या उष्टयांत जेवावं व रोज नियमितपणे त्याची कामे करावी हाच त्यांना पत्नीधर्म वाटे. म्हणून याच्या पलीकडे त्यांच्या मनाची मजल कधींच गेली नाहीं. कुठल्यातरी खडकाळ कोंपऱ्यांत उगवलेल्या खुरट्या झुडुपासारखं त्यांचं मन, सदाशिवरावांच्या फोंफावलेल्या भावुक हृदयाशीं कशी जोडी साधणार ?

अन् असा त्यांचा संसार चालला होता. नि सदाशिवरावही निभवून घेत होते. त्यांनी कधींच वावगा विचार मनात आणला नव्हता... व या अशाच उजाड संसारांत त्यांचा शेवटही झाला असता, जर त्या रात्रीचा तो प्रसंग उद्‌भवला नसता तर—!

*　　　　*　　　　*

त्या दिवशींची ती भयंकर अंधारी रात्र, रातकिडयांच्या आवाजांनी निनादून उठली होती. सदाशिवराव पंधरवडयाच्या दौऱ्यावर होते. एका शहरांतील डाकबंगल्यात त्यांचा मुक्काम होता. डाकबंगला अगदीं गांवाबाहेर होता. पलीकडे जंगल पसरलं होतं.

जिकडे तिकडे सामसूम होती. निजानीज झाली होती सर्वत्र. सदाशिवरावांनीही दिवा मालवला व ते पलंगावर जाऊन पडले. एक दोन मिनिटं गेलीं असतील नसतील इतक्यांत—

" टक् , टक् ! " दारावर एक भीतीयुक्त थरथरती थाप पडली.

" कोण ? " सदाशिवरावांनी ताडकन् बिछान्यावरून उठून विचारलं.

पुन्हा पहिल्यापेक्षांही अधिक घाईची दुसरी थाप आली.

" कोण आहे ? "

" मी... लवकर उघडा. " सदाशिवरावांनी दार उघडलं. अगदी भेदरलेल्या स्थितींत एक स्त्री त्यांच्यासमोर उभी होती. एकंदर स्वरूप श्रीमंतीचंच दिसत होतं. पण काळजीनं ती अगदी पोखरून काढलेली दिसत होती ?

" कोण तुम्ही ? " सदाशिवरावांनी भांबावून विचारलं.

" इंदिरा ! " तिला बोलवत सुद्धां नव्हतं. धापा टाकीत होती ती.

" पण इतक्या रात्रीं काय पाहिजे तुम्हांला ? "

" आश्रय ! ती क्षीणपणें म्हणाली व आंत आली.

" म्हणजे ? पण तुम्हीं तर श्री..."

“ शू ऽऽ ! ” तिनं तोंडावर बोट ठेवलं नि दाराकडे बोट दाखविलं. सदाशिवरावांनी एकदम दार लावून घेतलं. त्या नंतर ते मागे वळून तिच्याशी बोलणार तो ती शेजारच्या खुर्चीवर कोलमडून पडली होती.

क्षणभर ते गोंधळले. पण दुसरेक्षणीं तिला अलगद उचलून पलंगाकडे ते नेऊं लागले तों ती ओरडली, “ हा ऽऽ ! अयाई ग ! ”

“ कां ? काय झालं ? त्यांनी घाबरून विचारलं.

तिनं फक्त पाठीकडे हात नेला. तिला निजतांना सुद्धां त्रास होत होता. सदाशिवरावांनी तिला हळुवारपणे विचारलं, “ कां ? काय झालंय पाठीला ? ” उत्तरादाखल तिच्या डोळ्यातून अश्रु वाहूं लागलें. बराच वेळ ती विव्हळतेनं रडत होती. सदाशिवरावांनी सहानुभूति वजा तिला म्हटलं.

“ तुम्ही आधी कॉफी घ्या थोडी. मी करून देतों इथं स्टोव्हवर. सारं कांही माझ्याजवळ आहेच. ती घेतली म्हणजे बरं वाटेल. ”

नि खरंच, कॉफीनंतर इंदिराबाईना थोडी हुशारी आली. त्या खुर्चीवर उठून बसल्या. अन् त्या रात्रीच कांही न लपवतां त्यांनी आपली कहाणी सदाशिवरावांना सागून टाकली.···तींत विशेष वेगळं असं कांही नव्हतं. त्यांच्या सारख्या अनेक दुर्दैवी स्त्रियांचंच जीवन त्या सांगत होत्या जगुं कांही ! एका श्रीमंत व्यसनी पतीची ती पत्नी होती इतकं सांगितल म्हणजे पुरे ! अन् त्या अमानुष जांचाला कंटाळून त्यारात्री त्या घराबाहेर पडल्या होत्या. दैव नेईल तिथं जायचं त्या मनाशीं ठरवून निघाल्या होत्या. श्रीमंत घराण्यांतल्या म्हणून घरांतच इतके दिवस जीवनाची जन्मठेप बनली होती. त्यांना शहरची कांही सुद्धा माहिती नव्हती. तो डाक बंगला आहे, हें सुद्धां ठाऊक नव्हतं. पण डाकबंगल्यांत दिवा पाहिला नि एकाद्या शाळेच्या वसतिगृहाच्या कल्पनेनं त्यांनी आपलीं पावलं तिथं वळवलीं होतीं. ते सारं ऐकून सदाशिवराव थिजून गेले.

* * *

तीन दिवस इंदिरा त्यांच्याबरोबर तिथंच अज्ञातवासांत राहिली. पण तिच्या भविष्यकालापुढे एक मोठं प्रश्न चिन्ह होतं. ज्या दिवशीं सदाशिवरावांचा मुक्काम हलणार होता, त्या दिवशीं इंदिरा विलक्षण उदास दिसत होती. भविष्यकालानं तिच्यापुढं निकड लावली होती. सदाशिवरावही त्यादिवशीं व्यथित दिसले. त्यांचं कामांत लक्ष लागलं नाहीं. ते विचार करीत होते: पुढे कय ?

शेवटीं, रात्रीं इंदिरेनं मनाचा कांही निश्चय केला व छातीवर दगड ठेऊन तिनं म्हटलं.

" माझंही एक तिकिट काढावं लागेल तुम्हांला.

" कुठलं ? "

" कुठलं ? कुठलंही···पुण्याचं ··किंवा···नाही तर मुंबईचं "

" तिथं कोण कोण आहे तुमचं ? "

उत्तरादाखल ती खिन्नपणे हंसली व तिनं मान खालीं केली.

" खरं कां ? नाहीं तर मग···असं करा.···" ते अडखळलं.

" एकाद्या अनाथाश्रमाचा वगैरे पत्ता सांगा···मी टिपून घेईन. "

" पण मग त्यापेक्षां······" पण ते पुढं बोलले नाहींत.

थोडयावेळानं टांगा दाराशीं उभा राहिला. सदाशिवरावांनी सामान ठेवलं व टांग्यांत दोघं बसलीं. टांगा चालू झाल्यावर इंदिराबाईंनी विचारलं:

" मग काय ठरलं ? "

" चला···नेऊन सोडतों एका अनाथाश्रमांत " ते म्हणाले. व त्यांनी इंदिरेलाबरोबर घेतली. वाटभर इंदिरेनं एक अक्षरसुद्धां तोंडावाटे काढलं नाही. भविष्याची चित्रं रंगविण्याइतकं सुद्धां तिचं भविष्य तिला ज्ञात नव्हतं. अनाथाश्रमाच्या दारांत अखेर सदाशिवरावांचे आभार मानले कीं त्यांचा संबंध

संपला ! पण किती मर्यादित होता तो ! इंदिराबाई विचार करीत होती···पण त्या कल्पनेनं तिला वाईट वाटलं···कारण त्या तीन दिवसांतही सदाशिवरावांच्या हृदयाची ऋजुता तिला भासली होती ··पण जे काय होईल तें मुकाट्यानं सहन करायचं होतं तिला.

प्रवासाअखेर टांगा एका दाराशीं थांबतांच सदाशिवराव म्हणाले:

“ हं उतरा, आलं तुमचं ठिकाण ” इंदिरा मुकाट्यानं उतरली. तिनं कृतसत्तेनं त्यांच्याकडे पाहिलं···पण तिला त्याशिवाय अधिक कांहीतरी वाटत होतं. अखेर ती म्हणाली.

“क्षमा करा···फार त्रास पडला तुम्हांला···तुमचे उपकार जन्मभर · ”

पण सदाशिवरावानी तें ऐकलं न ऐकलंसं करून ते पुढे गेले व दारांत जाऊन त्यांनी एकदम हाक मारली.

“ शंकर ? ” इंदिरा एकदम चमकली. तेवढ्यांत एक गडी पुढें आला व सदाशिवरावांच्या पायाला लागून त्यांनीं सामान नेलं.

“ म्हणजे ? ” ती आश्चर्यानं म्हणाली.

“ म्हणजे हें माझं घर आहे यांत तुमच्या सारख्या अनाथ स्त्रीला आश्रय देणार आहे मी. माझ्या पत्नीजवळ रहा तुम्हीं.” असं म्हणून सदाशिवराव हंसले.

‘ पण आधीं नव्हतंत कां सांगू ?” इंदिरा संकोचून म्हणाली व तिच्या डोळ्यांत पाणी चमकलं.

“ खरंच, मी तुमची आगाऊ परवानगी घेतली नाहीं.” नि सदाशिवराव गंभीर झाले एकदम.

तीं दोघं उंबरठ्यावर आलीं. तिथं क्षणभर उभं राहून एकाएकी इंदिरा म्हणाली.

“एकदां घेतलं खरंय घरांत... पण आतां मेल्याशिवाय निघायची नाहीं इथून. ”

" ठाऊक आहे मला. "

दोघेही आंत गेली .. नि घराबरोबरच हळूंहळूं इंदिरा त्यांच्या जीवनांतही शिरली. प्रथम आश्रित म्हणून पार्वतीबाईंनी तिच्याकडे मोलकरणीप्रमाणें घरांतलं सर्व काम सोंपवलं, जबाबदाऱ्या टाकल्या. त्याच्या निवृत्त व व्यक्तित्वशून्य मनाला इंदिरेच्या आगमनानं केवढा विसांवा मिळाला होता? पण हळूंहळूं आश्रितेची भूमिका बदलून इंदिरेचं अस्तित्व साऱ्या घरांत भरून राहिलं. अन् अखेर सर्वांच्याच नकळत सदाशिवरावांच्या त्या रिकाम्या ऋजुजागी तिनं स्थान घेतलं. पार्वतीबाईंना प्रथम त्याची व्हावी तितकी जाणीव झाली नाही. पण झाल्यावरही त्यांनी आपल्या जिवाचं रान केलं नाही. त्यांचं सारंच अस्तित्व इतकं भित्र निर्जीव, प्रतिकारशून्य होतं इंदिरेचं स्थान त्यांनी मान्य केलं.

*　　　　*　　　　*

नि अशा प्रकारें त्यांची हृदय जुळलीं, जीवन जुळलं... पण त्यांचा विवाह झाला नाहीं. कुठं होऊ शकत होता? पण मग··· पुढें काय.?

" तुम्हींच सांगा, पुढे काय? " सदाशिवरावांनी स्वतःशींच मोठ्यानं प्रश्न केला व दचकून ते एकदम भानावर आले मागचा भात चालू होता त्यांचा!

इंदिरेनं त्यांची मनःस्थिति केव्हांच ओळखली. पण ती कांही बोलली नाहीं. त्यांनीही फक्त एकदां तिच्याकडे बघितलं नि पानावरचा भात तसाच टाकून ते उठले. वर जाऊन त्यांनी कपडे चढवले नि ऑफिसचा रस्ता सुधारला. इंदिराबाईंचंही डोकं उठलं होतं.

*　　　　*　　　　*

निशा-गीत म्हणून पार्वतीबाई देवाला निजविण्यांत गर्क झाल्या होत्या. खालून सदाशिवरावांना ते स्वर ऐकू येत होते. त्यांच्या मनांत विचार उठत होते. जिच्याशीं ब्राह्मणांनीं अग्निसाक्ष वेदमंत्रांनीं विवाहग्रंथी बांधून दिली, ती

एकाच घरात असून आपल्यापासून शेंकडों मैल लांब आहे. पण जिला धर्म-मान्यता, समाज-मान्यता नाहीं, ती एक कुठली कोण आज आपल्या जीवनाशीं इतकी समरस झाली आहे आपल्या भावनाग्रंथी स्वतःशी बांधून टाकल्या आहेत. एक नुसत्या नात्यानं अर्धांगी आहे...तर दुसरी हृदयानं. मग...माझं हृदय कुणाला अधिक जवळ करणार ? लोक याला उत्तर का देत नाहींत. बोला... कां सोडवीत नाहीं हा माझा प्रश्न ? पण तो कधीहीं न सुटणारा आहे अन् बिचारी इंदिरा .....

इतक्यांत इंदिरा दुधाचा पेला घेऊन वर आली. खोलींत जातांच तिनं पेला मुकाट्यानं टेबलावर ठेवला. सदाशिवरावांच्या उदास व उतरलेल्या चेहऱ्याकडे एक अर्धवट दृष्टिक्षेप टाकला, नि ती बिछान्यावर जाऊन पडली.

सदाशिवरावाना ठाऊक होतं, इंदिरा आपली उगी भिजवीत होती. त्यानी दुधाच्या पेल्याकडे ढूंकूनही बघितलं नाही. ते सरळ इंदिरेकडे गेले. तिचं डोकं मांडीवर सरकवलं व कातर स्वरांत म्हणाले·

" खरंच इंदिरे, मला क्षमा कर ! " पुन्हां इंदिरेचे अश्रूंचे ओघळ.

" खरं म्हणजे, मी तुला इथं आणायलाच नको होतं···माझी दुर्बळता आधींच जाणून घ्यायला हवी होती. पण तुझ्या नांवाची मी पर्वा केली नाहीं."

" माझं नांव ? कुठलं माझं नांव ? " इंदिरा डोळे पुशीत म्हणाली, " मी ज्या दिवशीं माझ्या घरचा उंबरठा ओलांडला...त्याच दिवशीं माझं तें नांव मेलं होतं...पण माझ्यामुळं मात्र तुमचा सामाजिक दर्जा...तुमचं नांव बरबाद झालंय. "

" इंदिरे, ज्यावेळी तुला आयुष्यानं ओढून माझ्याजवळ आणलं, त्यावेळींच मी तुझ्यात व माझ्या नांवांत निवड केली ··· अजून कधीं कधीं माझ्या मनांत संघर्ष होतो...पण अखेर तुला स्वीकारून मी माझं नांव टाकलंच आहेना ? मग कशाचं दुःख करतेस तूं ? "

" पण...आपण दोघं पापी आहोत नां जगाच्या दृष्टीनं ? त्याची काय वाट ? " इंदिरेचे डोळे पुन्हा भरून आले.

" जगाची दृष्टि ! मी त्या दृष्टीनं जगतोय असं वाटलं तुला ? "

पण इंदिरा अजून उदास होती. तिला वाटलं तिच्या सारख्यांच्या जीवनाचे प्रश्न अखंड होते...कधी सुटणारे नव्हते ते !

" इंदिरे, तुला माझं सर्वस्व देऊन टाकल्यावर दुसऱ्याची पर्वा कशाला करतेस तूं ? "

" पण... "

" पण काय ? आपण जीवनाचं आदर्श नसूं, दुर्बल असूं, इंदिरे ! पण पापी नाही खास ! " त्यांचा गळा दाटून आला...इंदिरेच्या त्या कोमेजलेल्या उदास चेहऱ्याकडे पाहून त्याचं अंतःकरण पिळवटलं. पण एक आवंढा घेऊन तिच्या केसांतून बोटं फिरवीत ते पुनः म्हणाले:

" असं काय, इंदिरे ! उठ नां आतां ? नाही तर मी दूध प्यायचा नाही... "

इंदिरेनं आपलं डोकं उचलून त्यांच्याकडे भावपूर्ण नजरेनं पहात म्हटलं: " हं, ही घ्या उठले: "

*[ प्रथम 'भगिनी मंडळ' नागपूर येथील " जागृति " या हस्तलिखित मासिकांत प्रकाशित ]*

# ६. तिचें थडगें !

आत्यंतिक प्रीतीचं तें एकच उदाहरण मला वारंवार आठवतं.

दोन वर्षांपूर्वींची गोष्ट. मी नि माझा जिगर दोस्त विनायक हवापालट करण्याच्या उद्देशानं त्या गावी जाऊन राहिलों होतों. गांव लहानसंसंच खेडे-वजा होतं. पण अत्यंत रमणीय व टुमदार. नीटस वस्तीचं व निसर्गरम्य.

त्या गांवाच्या जीवनांत एकच गोष्ट प्रमुख होती. व तिच्या भोंवतींच तेथील तीन हजार वस्तीचं सारं जीवन गुफलं होतं जणू काय ! नि ती म्हणजे तेथील ख्रिस्ती लोकांचं मिशन. ते अनेक वर्षापासून तिथं येऊन स्थापन झालं होतं. त्याचीच भलं थोरलं आवार असलेली एक इमारत होती. त्यांत गोरगरीबा-साठी एक दवाखाना उघडला होता. शिवाय मिशननं एक लहानशी प्रायमरी शाळा चालविली होती. मिशनमध्यें पांच पंचवीस अनाथ पोरं होती. पाद्री साहेब होते. कांहीं ख्रिस्ती कुटुंबही होतीं. हीं सारी कुटुंब कित्येक वर्षांपासून तिथं येऊन राहिलीं होतीं. त्यांच्या दोन दोन पिढयाही तिथं वाढल्या होत्या. गावच्या वस्तीपासून किंचित् दूर लहानसं चर्च होतं. व चर्चच्या मागं त्यांची स्मशानभूमी.

माझी नि विनायकाची खोली चर्चपासून सुमारे फर्लांगभर असेल. सभों-वतालीं सुंदर जागा होती. उशालगतच्या खिडकींतून केव्हांही बाहेर बघितलं कीं तोच देखावा नजरेस पडे. निळ्या आकाशाची पार्श्वभूमी, तीवर रेखाटलेली चर्चची बाह्यरेषा, आकाशाच्या कुशींत डोकं खुपसणारीं चर्चचीं तीं अणकुचीदार टोकं, आजुबाजूस त्याची राखण करीत उभी असलेलीं सरूचीं उंचच उंच झाडं, खालीं जमिनीवर पसरलेली ती गडद रंगाची हिरवळ. रोज तोच देखावा. सारं कांही जसंच्या तसंच.

त्या दिवशी अंधारी रात्र होती. दहा साडे दहाचा सुमार असेल. मी नि विनायक शिळोप्याच्या गप्पा हाकीत पलंगावर पडलों होतों. बोलतां बोलतां माझं लक्ष सहज खिडकीबाहेर गेलं. मी एकदम विनायकाला म्हणालों,

" तें बघ..."

" काय आहे ? "

" इतक्या रात्रीं हातांत दिवा घेऊन त्या स्मशानभूमीकडे कोण जात असावं ? "

" अरे, कालसुद्धां याच सुमारास मी त्या माणसाला त्या बाजूनं जातांना बघितलं होतं. "

" काय करीत असेल बरं तो तिथं ? " मी म्हणालों.

" काल तर तो त्या थडग्यामधून आपली वाट काढीत असतांना दिसला. " विनायकानं सांगितलं.

मी उत्सुकतेनं खिडकीशीं येऊन उभा राहिलों व बाहेर डोकावून बघूं लागलों. अतिशय मंद गतीनं तो चालत होता, उजव्या हातांत दिवा धरलेला होता. डाव्या हातांत कसलंसं एक पुडकं दिसत होतं. हळू हळू तो स्मशान-भूमीजवळ आला व फाटक उघडून आंत शिरला.

आम्हीं दोघे तें पाहण्यांत गर्क झालों. स्मशानभूमींतील त्या लहान-मोठया कबरींमधून आपलीं पावलं हळू हळू टाकीत तो एका थडग्याजवळ थांबला. त्यानं हातांतील दिवा खाली ठेवला. खाली बसून त्यानं हातांतील पुडकं सोडलं व त्यांतून थडग्याच्या पायथ्याशीं त्यानं कांहीतरी ठेवलं.

" काय असावं तें ? " विनायक कुजबुजला.

" कोण जाणें, मला तर इथून स्पष्ट दिसत नाहीं. " मी म्हणालों, " कदाचित् फुलं असतील. "

त्यानंतर बराच वेळ थडग्यावर आपलं डोकं ठेवून तो बसला होता, अगदी निश्चलपणें. अंमळशानं उठला, हातानं पुन्हां दिवा उचलला व आला

तसा त्याच मंदगतीनं निघून गेला. आम्हीही विचारमग्न स्थितींत बिछान्यावर येऊन पडलों.

दुसरे दिवशीं रात्री तीच वेळ होताच मी गुपचुप पुन्हा खिडकीशी उभा राहिलो. दहावर घड्याळाचा काटा गेला, व आमच्या खिडकींतून दिसणाऱ्या त्या ठराविक देखाव्यांत त्या व्यक्तीनं प्रवेश केला. एका हातांत दिवा, दुसऱ्यांत पुडकं. तीच मंद गति. सारी हालचाल अगदीं आदल्या दिवशींप्रमाणे. मी पहातच राहिलों.

माझं कुतूहल वाढूं लागलं. त्यानंतर मी त्याला पाहण्याचं रोज साधूं लागलों. त्याचा क्रम अव्याहतपणे चालू राहिला. रात्रीची वेळ होतांच, त्याच मंदगतीनं एक एक पाऊल टाकीत चालणारी, हातांत दिवा घेऊन स्मशान-भूमीत प्रवेश करणारी ती आकृति मला रोज दिसे. एकही दिवस त्याच्या नियमांत खंड पडला नाहीं, कीं कार्यक्रमांत फेरबदल झाला नाही. अगदी रोज नियमितपणे तो येई. कधीं उशीरा, तर कधीं लवकर !

त्या दिवशीं सारा दिवस पाऊस पडतच होता रात्र बरीच झाली होती. मी घड्याळाकडे बघितलं. तों अकराला दहा मिनिटं. मी मोठ्यानं जांभई दिली व सहजच पाऊस थांबला की नाही हे पाहण्यासाठी खिडकीजवळ येऊन उभा राहिलों. बाहेर बघितलं, पाऊस थांबला होता. पण सूं सूं आवाज करीत वाऱ्यानं धूम चालवली होती. एकाएकी माझं लक्ष वेधलं. कोपऱ्यावरील वळणावरून प्रकाश येतांना दिसला. मी पहात उभा राहिलों हळू हळू रोजच्या परिचयाची ती आकृति दिसूं लागली. होय, अगदी तोच ! तोच निसर्गातील घडामोडींच्या शास्त्रीय बिनचूकपणें हळू हळू पावलं टाकीत येत होता. मी थक्कच झालों. केवढी भक्ती ही ! नकळत तोंडावाटे उद्गार निसटलेः

" कमाल आहे बुवा ! "

" कां, काय झालं ? कसली कमाल आहे ? " झोंपण्याच्या तयारींत असलेला विनायक डोळे चोळीत म्हणाला.

" तो बघ " मी फक्त इतकंच म्हणालों. विनायक उठून बघूं लागला.

" इतक्या असीम श्रद्धेनं हा कोण्या भाग्यवान् प्राण्याची कबर पाहायला दररोज जातो ? " त्यानं विचारलं.

नि खरंच, त्याची त्या मृतात्म्याच्या दगडी प्रतीकावरील विलक्षण भक्ति पाहून माझं अंतःकरण हाललं. मी एकदम उठून दाराची कडी खर्रकन काढली व तसाच बाहेर पडलों.

स्मशानाच्या त्या दगडी आवाराशीं पोंचलों, त्या वेळीं तो नुकताच थडग्यावरील क्रॉसच्या पायथ्याशीं आपली श्रद्धा अर्पण करून परत येत होता. मी घुटमळत कोपऱ्याशीं हिंडू लागलो. पाठीमागून विनायकही येतांना दिसला. आपलीं संथ, दमलेली पावलं त्यानं कोंपऱ्यावर वळवतांच मी थोडासा खाकरलो. त्याबरोबर त्यानं एकदम मान वळवून विचारलंः

" कोण आहे ? "

" कोणी नाहीं... " काय उत्तर द्यावं म्हणून मी घुटमळलों.

" पण काय हो ?...इतक्या रात्रीं तुम्हीं इथं स्मशानांत येऊन काय करीत होतांत ? " विनायकनं प्रश्न केला.

" मी ? कांही नाहीं !...असाच आलों होतों. "

" आम्हीं आमच्या खिडकींतून रोज तुम्हाला ह्या वेळीं इथं पाहतों. मनाला कुतुहल वाटलं म्हणून म्हटल विचारावं. " मी......

" काय म्हणालांत ? एकूण तुम्ही मला रोज पहातां ? अस्सं ! " अंमळ थांबून तो म्हणाला, " पण खरचं...इथं एकाद्या दिवशीं आलों नाहीं तर मला रात्रीं झोंप सुद्धां यायची नाहीं. "

" कां बरं ? " मी किंचित् उत्सुकतेनं विचारलं.

" तिच्या थडग्यावर फुलं चढविल्याशिवाय, तिथं तिच्या घुटमळणाऱ्या आत्म्याशीं थोडा वेळ कानगोष्टी केल्याशिवाय मनाला चैनच पडत नाहीं..." त्याच्या आवाजांत विकलता होती.

" ही ' ती ' कोण ? "

" ही तीच...लिझी...माझी लिझी. किती तरी वर्षं झालीं बिचारीला मरून. पण ती मेल्याचं दुःख अजून कमी होतच नाहीं...तितकंच ताजं आहेसं वाटतं...किती विचित्र आमचं जीवन ! सारं गांव जाणतंय म्हणा. तुम्हांला काहीच ठाऊक नाही वाटतं यातलं ? "

मी नकारार्थी मान हालविली. लिझीच्या सहवासांत घालविलेल्या जीवनाची आठवण होतांच त्याच्या आवाजांत एक विलक्षण तरलता आलीशी भासली. जणूं काय तिच्याबरोबर प्रत्यक्ष जगल्याचा अनुभव तो घेत असावा. त्यानं हातांतील कंदील खालीं ठेवला व हळूहळू चालत जाऊन बाजूला पडलेल्या एका दगडावर बैठक मारली.

" हं, सांगा, " मी म्हणालो.

" त्या रात्री मी नि लिझी ह्याच गांवाहून पळालों होतो. " तो सांगू लागला, " त्या गोष्टीला आज तीस वर्षं झालीं. ह्या स्मशानाच्या पुढल्या बाजूला तें गिरिजाघर दिसतंय ना ? तिथं संकेताप्रमाणं मी रात्रीं एक तास आधींपासून लिझीची वाट पहात बसलों होतों. त्या समोरच्या टेकडीवरील मिशन हाऊसकडे माझे डोळे लागले होते. भीतीनं हृदय धडधडत होतं.

" अशीच अंधारी रात्र होती. मला वातावरणांतही थोडीशी भिती भासूं लागली होती. अंमळशानं मिशनच्या मागच्या दारांत दिव्याचा मिणमिण प्रकाश लुकलुकतांना दिसला. नि त्याबरोबर माझं अंतःकरणहि उजळून निघालं. लिझी येत होती. मी अधीरपणें उभा राहून वाट पाहूं लागलो. ती आली व माझ्या गळ्यांतच पडली एकदम. रडक्या कांपऱ्या आवाजांत ती म्हणाली,

' जॉन, जॉन, किती धडधडतंय रे अजून ? '

‘ असं काय करतेस ? ’ मी तिला सांवरीत म्हणालों. ‘ भीतीनं कधीं कोणती कामं झाली आहेत कां ? चल आटप लौकर. ’

‘ पण उद्यां पाद्री साहेबांना जेव्हां कळेल तेव्हां काय होईल ? ’

‘ असलं कांहीच मी सांगणार नाहीं तुला सध्या. ती पलीकडे बैलगाडी तयार आहे. बैस पाहूं त्यांत लौकर, मग विचार काय होईल ते. ’

ती घाबरटपणें पटकन् गाडींत जाऊन बसली. मीही बसलों. आजूबाजूस पाहून घेतलं. कोणाचे दुष्ट डोळे आमच्यावर नजर धरून टपलेले तर नाहींत ना ! अगदीं गुडुप अंधार होता नि सगळीकडे शुकशुकाट होता.

“ मी गाडीवानाला म्हटलं, ‘ हांक बाबा लौकर ’ व त्यांनीही आपले बैल धावडवले. लिझी गाडींत बेचैनच होती. अजूनहि कुणी आपला पाठलाग तर करीत नसेल ना, या कल्पनेनं धास्ती वाटत होती तिला. गाडींत जणूं काय सारा वेळ तिनं माझी कुशीं सोडलीच नाहीं. मी दिलासा देत होतो एकसारखा नि मी म्हणत होतो तें खरंही होतं सारं. लिझीनं जें जग नुक्तंच सोडलं होतं—त्यांत तिनं कुणाची दरकार बाळगावी असं कोण होतं तिथं ? तिचे प्रेमाचे किंवा कर्तव्याचे धागेही कुठे गुंतले होते त्यांत ? ”

“ पण तुम्हाला लग्नासाठीं पळून कां जावं लागलं ? ” मध्येच विनायकानं प्रश्न केला.

“ त्याचं असं होतं ” तो म्हणाला, “ अज्ञात मातपितरांना नकोशी असलेली व म्हणून मिशनच्या अनाथालयांत आणून टाकलेली ती पोर. लिझीनं आपल्या आईबापाचं तोंडही पाहिलं नव्हतं कधीं. तिच्या जन्माविषयीं पाद्रीसाहेबांनीही मौनच स्वीकारलं होतं. पण दिसायला चुणचुणींत व बुद्धीमान् म्हणून पाद्रीसाहेबांची तिच्यावर मर्जी असे. पण माझे आईबाप चांगल्या घराण्याचे असून मिशननं चालविलेल्या दवाखान्याचे डॉक्टर होते. मी मॅट्रिकपर्यंत शिकलों व पुढं डॉक्टरी शिकायला जाणार होतो पण लिझीच्या प्रेमांत अडकलों. पण जिच्या जन्माचीसुद्धां कांहीच माहिती नाहीं अशा एका मिशनमधल्या

अनाथ मुलीबरोबर मी लग्न करावं ही कल्पनाहि माझ्या आईबापांना असह्य होती." तो पुढं सांगूं लागलाः

"शिवाय मिशनमधल्या पाद्रीसाहेबांचीही लिझीविषयीची कल्पना निराळीच होती. लिझीवर खूष होऊन त्यांनी तिला पुढं शिकवून आजन्म अविवाहीत राहून मिशनचं कार्य करण्यासाठी तयार करावं असं ठरवून टाकलं होतं. दोन्ही बाजूनं विरोध होता, म्हणून आम्हीं पळालों. त्या वेळीं लिझी फक्त पंधरा वर्षांची होती नि मी अठरा. लिझी भलत्याच हळुवार मनाची. मिशनच्या कोंडवाड्यातील जीवन लिझीला असह्य वाटे. आपल्या अज्ञात जन्म कहाणीबद्दलहि तिला विषाद वाटे कुणाच्या आधाराशिवाय जगूं न शकण्याची तिच्या मनाची घडण होती, म्हणून आमचं जुळलं. हे गांव सोडलं त्या दिवसापासूनच इतर साऱ्या आकांक्षांचा त्याग करून मी तिचा होऊन बसलों. तो आजपर्यंतहि तिच्याच स्मृतीला वाहिलों आहे मी !"

तो सतत बोलत होता. पण त्यांत दुःखाची छटा नव्हती. आत्यंतिक प्रीति अनुभवल्याचं समाधान मात्र व्यक्त होत होतं.

त्याचा कंदील बाजूला जळत होता. त्याचा अंधूक, तिरकस प्रकाश त्याच्या प्रोफाइलवर पडला होता. त्यामुळं आम्हांला चेहरा नीट दिसत नव्हता. तरी मी कयास बांधला, पन्नाशी उलटून गेली असावी त्याची. पण किती खचलेला दिसत होता तो !

"हें गांव सोडल्यानंतरचीं पांच वर्षं तेंच काय आम्ही दोघांनी एकत्र जगलेलं, आमचं खरंखुरं जीवन...बाकीची एक दुःखांत अशीच कथा आहे." तो त्याच ओघानं पुढं सांगूं लागला, "खिशांत पुरेसे पैसे नाहींत, नौकरी नाही, अनुभव नाही, किंवा दुसरं ठिकाणहि नाहीं. अशा स्थितींत मी लिझीला घेऊन सतत पांच वर्षं भटकलों–ह्या गांवाहून त्या गांवीं. तिथून इथं. मधून मधून

धंदा मिळे, त्याचे पैसे येत. लिझीहि हातभार लावूं लागे. पण कांही काळच. पुरता जम कधींच बसला नाहीं.

" लिझीचे फार हाल होत. पण मीं कधीं त्या दारिद्र्याबद्दल खेद व्यक्त केला तर ती रागावून म्हणे,

' असं काय मनाला लावून घेतोस तूं नेहमीं? मला तूं मिळाला आहेसच. मला बाकीचं कुठं पाहिजे आहे ! ' नि हा तिचा राग अगदी अकृतिम असे. मी अगदी पाझरून निघे. असल्या प्रीतिपुढं काय बोलूं ? लिझीच्या प्रीतींच्या हजारो गोष्टी आठवतात. त्या स्मृती म्हणजे माझं केवढ धन आहे ! नि त्यांच्या रूपानंच ती माझ्याजवळ जिवंत आहे "...व खरोखरच त्याच्या आवाजात कुठलंहि जडपणा व विकलता दिसली नाहीं. वाटलं, लिझीची स्मृतीच त्याला पुरेशी असावी. आपल्या त्याच आकर्षक पद्धतीनं तो पुढे म्हणाला:

" शेवटीं शेवटी फारच हलाखीचे दिवस आले. पग लिझीच्या प्रीतीला थांग नव्हता, मर्यादा नव्हती, त्याचप्रमाणं तिच्या सहनशीलतेलाहि अखेर एक मार्ग खुला झाला. पहिलं महायुद्ध त्यावेळीं चालूं होतं जोरात. सैन्यात भरती होण्यासाठीं आणखी माणसं पाहिजे होती. एका भल्या माणसाच्या शिफारशीनं सैन्यांतील एक आकर्षक पगाराची नोकरी चालून आली. मला हायसं वाटलं. फक्त लिझीपासून दूर रहावं लागेल म्हणून जीव घुटमळत होता. पण असल्या हलाखीपेक्षां कांही काळ विरह बरा. म्हणून मी संध्याकाळी लिझीला म्हटलं,

" ' लिझी, एक छानशी नोकरी मिळतेय. '

" ' कुठं ' ? एकदम आनंदून तिनं विचारलं.

" ' अशीच, खूप दूर... ' मी म्हणालों.

" ' मग ? '

" ' पण तुझ्यापासून दूर रहावं लागेल ! '

" ' किती वर्षं ? ' तिनं खट्टू होऊन म्हटलं.

" 'कांही नेम नाहीं. दोन, तीन, चार वर्षंसुद्धां...'

" त्यावर ती काहीच बोलली नाही. मागाहून तिनं मोठया नाखुशीनं मला संमति दिली. मी भराभर तयारीला लागलों.

" चार दिवसानंतर मी लिझीचा निरोप घेतला. तेव्हां या अफाट जगात मी लिझीला अगदी एकटी टाकून जात आहे असं मला किती तीव्रतेनं वाटलं. मला सोडतांना तिच्या हृदयाची झालेली कालवाकालव, तिच्या डोळ्यावाटे दिसत होती.

" ती हळूच म्हणाली, ' दोन, तीन चार...वर्ष नाही का ? '

" ' हं, अशीच कांहीतरी'...मी म्हाणालों.

" 'इतकीं वर्ष एकटी कशी घालवूं शकेन मी?' ती दाबलेल्या आवाजांत म्हणाली.

" ' वेडी ! हीं वर्ष केव्हांच, भरकन् निघून जातील ! ' मी तिचं सांत्वन केलं.

" 'बरं, जा आतां...पण अगदी सुखरूप परत येशील ना ! अगदी असाच्या असाच ? मला कोण जाणे कां, भीती वाटते जॉन ! ' माझ्याकडे भरलेल्या डोळ्यांनी पहात ती ओरडली.

' लिझी, नीट रहा...' मी कसंबसं म्हणालो व गाडींत बसलो.

' चाललास जॉन ? जा ऽऽऽ न ! ' तिची अस्पष्ट हांक ऐकू आली.

" गाडी चालू झाली होती. लिझीची हांक अजून कानांत भरून राहिली होती. तिच्या एकलेपणानं मी जास्तच कासावीस झालो खरंच, कोणी म्हणतां कोणीच कसं नव्हतं या जगांत तिचं ? वाटलं, लिझीला मी पपांच्या घरीं जाऊन राह्यला सांगून आलो आहे, कारण त्यांच्याशीं अलीकडे तिचा पत्रव्यवहार सुरू झाला होता, पण ती मानी पोरगी ऐकेल का !

" झालं. लिझीला सोडून निघालों... जीवनांतला एक अंक संपला. पुढं काय होणार याची कल्पना कुठं होती ? मागाहून कितीदां तरी वाटलं, ही

युद्धांत भरती होण्याची अवदसा कुठून आठवली मला ! सारं जीवनच पालटलं... "

बोलतां बोलतां तो जरासा थांबला. त्यानं एक निश्वास सोडला. बिचाऱ्या एकाकी लिझीविषयी सहानभूती दाखवून विनायक म्हणाला:

" कां ? कसलं परिवर्तन घडून आलं तुमच्या जीवनांत ? "

" कसलं परिवर्तन सांगू "... कसलं भयंकर परिवर्तन ! सारं जीवनच बदलून गेलं !...प्रथम आमच्या सैन्याची तुकडी इराकमध्यें लढली. तेथून पुढं जातां जातां आम्ही तुर्कस्थानमध्यें आलों पॅलेस्टाइनमध्यें असतांना आमच्या तुकडीची वाताहात झाली. त्यांतल्या त्यांत दुर्दैवानं मी एकटाच माझ्या बाकीच्या सोबत्यांपासून वेगळा पांगला गेलों. विलक्षण अनुभव होता तो. माझ्या अंगावर दोनतीन किरकोळ जखमा होत्या. जवळ फारसं नाहीं कांही. अनोळखी मुलुख. आठ दिवस सतत भटकत राहिलो त्या वैराण मुलुखांत. जिकडे तिकडे ओसाड वाळवंट. वस्तीचं कुठं नांवहि नव्हतं. किती दिवसापासून माणसाचं तोंडहि दिसलं नव्हतं.

" त्या दिवशीं असाच भटकून भटकून फार दमून गेलों होतों. किती मैल चालून गेलो असेन, कोण जाणें ! रात्र व्हायला आली होती. पुन्हा हाहि दिवस निर्जन वाळवंटांतच घालवावा लागतो की काय, याची धास्ती वाटू लागली. आतां मात्र जवळचं पाणीहि संपलं होतं. तरीहि मी चालतच होतों एकसारखा. "

किंचित् थांबून तो पुढं म्हणाला, " एकाएकीं माझं लक्ष समोर गेलं. अंधुकसा प्रकाश असावासा भास झाला. मी धांवतच त्या दिशेकडे आपलीं पावलं वळवलीं. कितीतरी लांब तसाच चाललों होतों. तरी ती वस्ती, अक्षय मागंच मागं हटणाऱ्या क्षितिजाप्रमाणं माझ्यापासून लांब लांब जातांना मला वाटली. पण आतां प्रकाश स्पष्ट दिसला. will-o- the wisp चा नुसता भासच नव्हता. खरीखुरी वस्ती होती ती. माझ्या जिवांत जीव आला. पण त्या ठिकाणीं

पोचलों तोंपर्यंत अगदीं खूपच रात्र होऊन गेली होती. मी इतका विलक्षण दमून गेलों होतो कीं, वेशीजवळ असलेल्या दोनचार घरांना ओलाडून जातांच एका घराची पुढची पडवी रिकामी दिसली, तिथंच शिरलो अंधारात चाचपडत गेलो. तों एक रिकामी खाट दिसली. तीवर कांहीसं चिरगुट हाताला लागलं, त्यावरच मी लोळण घेतली. पडल्या पडल्या मानवी आश्रयाची सुरक्षितता जाणवली. समाधानानं मी हातपाय ताणले व इतक्या दिवसाच्या थकव्यामुळं मी लवकरच गाढ झोपी गेलो. ''

मी नि विनायक एकाग्रतेने ऐकत होतो. त्याच्याबरोबर आम्हालाहि हायसं वाटलं. अंमळ विसावा घेत तो पुन्हां सागूं लागला

'' सकाळी चागली उन्हं पडली, तेव्हा मी जागा झालों. हळू हळू डोळे उघडले. मी कुठं होतो ? मागाहून साऱ्या आठवणी वेगानं धावून आल्या. मी ताडकन् उठून बसलो...पण धड बसवत सुद्धां नव्हतं. अंगात तापहि चढून आला होता. उठावंसं वाटलं नाही. म्हणून पुन्हा पडून राहिलो. सहज लक्ष गेलं. खाटेखालीं कांहीतरी झाकून ठेवलं होतं, मी अधीरपणें उघडून पाहिलं. कांहीं खायच्या वस्तू होत्या. नि हाताला कोमट लागत होत्या. मी कसलाहि मागचा पुढचा विचार न करता बकाणे भरूं लागलों. क्षणार्धात अधाशासारखं सारं खाऊन टाकलं व मागून ढसढसा पाणीहि प्यालो. तेव्हां कुठं अंमळ शक्ति आली. तेव्हा उठलों व रस्त्यावर हिंडायला लागलो लवकरच माझ्याभोवतीं कुतूहलयुक्त चेहरे जमा झाले. मी वेडयासारखा पहात राहिलों. मनांत विचार आला, हीं सारी माणसं अशीं कांहींतरी विचित्र व बेढब कां दिसताहेत ? नि त्याबरोबर एक विलक्षण शंका मनांत डोकावली व पोटांत एकदम धस्स झालं. माझी धास्ती खरी होती. हाय रे दैवा ! मी कुठं होतो ? मी कपाळावर हात मारून घेतला. ती महारोग्यांची वस्ती होती. ''

'' हा ऽ '' आमच्या तोंडून उद्‌गार निघाला. त्यानं पुन्हा गोष्टीचा धागा घेतला: '' मी ताडकन् उभा राहिलों. भीतिनं माझे हातपाय लटपटूं लागले

होते. मला आठवलं, पॅलेस्टाइनमध्ये महारोग्यांच्या बऱ्याच वसाहती आहेत असं म्हणतात. नि खरंच, मी त्यांचच अन्न खाल्लं होतं व पाणीहि प्यालो होतो. मला कांहीं झालं असेल तर ? ह्या कल्पनेचीच आतां मला विलक्षग दशहत बसली. मी नुसता थराकून गेलो. त्या ठिकाणीं क्षणभरहि राहण्याची सोय नव्हती. मी तसाच धांवत निघालो. व येतांना आलों तसाच पुन्हां भटकूं लागलों.

" त्या अफाट वाळवंटांत बेचैन होऊन मी एकसारखा भटकत होतों चार दिवस निघून गेले. एका अननुभूत भीतीनं मी जणूं काय पछाडला गेलों होतों. ती भीतीच भयंकर होती. माझ्या मनाला ठाऊक होतं, इतक्या आत्यंतिक भीतीचा परिणाम शरीरावरही झाल्याशिवाय राहणार नाही. नि खरंच, हळूहळू मला वाटूं लागलं, माझा उजवा हात दुखूं लागला आहे मी तो लगेच घट्ट बांधून ठेवला. सहा दिवसानंतर आपल्या स्वच्छ निरोगी वस्तीच्या ठिकाणीं येऊन पोंचलों. पण माझी भीति कमी झाली नव्हती. उलट, मला वाटलं माझा हात जास्तच दुखूं लागला होता पण तो सोडण्याचं धैर्य मला झालं नाहीं. पांच दिवसांपासून सतत तो बांधलेलाच होता. शेवटी मनाचा हिय्या करून मी एकांतांत हातावरचा रुमाल काढला व भेदरलेल्या उत्सुक नजरेनं पाहूं लागलों. तों काय ? खरोखरच माझ्या हातावर पै एवढा एक लाल डाग दिसला. मी पुन्हा पुन्हा बारकाईनं पाहूं लागलों छः चूक नव्हती ती, दृष्टिभ्रम नव्हता ! डाग होताच तिथं ! ! "

" अरेरे ! " दुःखानं विनायक ओरडला.

" मी दुःखानं डोकं आपटून घेतलं, " तो सांगत होता. " माझ्या शोकाला सीमा नव्हती कांहीं दिवस तर मी नुसता त्या हाताकडे पहात मुळू मुळू रडत बसे. तासन् तास निघून जात. वाटे, लिझीला आतां कसं तोंड दाखवूं ? लिझी ?...नि तिच्या आठवणीबरोबरच तिचे निरोप देतांनाचे शब्द आठवत. ' अगदीं सुखरूप परत येशील ना जॉन ? अगदीं असाच्या असाच ? मला कोण जाणे कां, भीती वाटते आहे रे ! ' व मी पुन्हा ओक्साबोक्सी रडूं लागे.

" झालं. माझ्यात संपूर्ण परिवर्तन घडून आलं एकदम. माझं जीवन-माझा दृष्टिकोण, माझं सारं जग ! अनेकदा आत्महत्या करावीशी वाटली. पण लिझीचा-मोह होता अजूनहि. अखेर विचार आला, अशा परिस्थितींत लिझीला भेटून तरी काय करायचंय ? कुठंतरी एकाद्या अज्ञात ठिकाणी जाऊन मोलमजुरी करावी व लिझीच्या जीवनातून कायमचं नष्ट व्हावं ! "

प्रथमच, त्यांच्या आवाजांतील पूर्वीचा तरळपणा जाऊन त्या ठिकाणी दुःखाचा जडपणा मला जाणवला. कदाचित् त्याचा कंठहि दाटून आला असावा.

" पुढं काय केलंत मग ? " मी विचारलं.

" पुढं काय ? माझं जागृत मन जरी लिझीपासून दूर पळण्याचं ठरवी, तरी सुप्त मन लिझीकडे अक्षय धाव घेतच होत व हळू हळू माझी पावलं त्या दिशेकडे वळूं लागलीं. या जगांत जिवंत राहून लिझीपासून दूर राह्यचं मला ठाऊक नव्हतं. कसाहि असलों तरी लिझी माझा स्वीकार करील, अशी खात्री होती. तिचं प्रेम असं मोठंच होतं. पण तिला एका अक्षरांनंहि कळविण्याचं धैर्य झालं नाहीं मला. मी तसाच निघालो.

" त्या दिवशीं पोचलों," तो पुढं सांगू लागला, " त्या वेळीं तिन्हीं सांजा झाल्या होत्या. मी घरी पोंचलो. गाडीतून सामान काढलं पण लिझी समोर दिसली नाही. अंतःकरण धडधडूं लागलं होतं लिझीला भेटलो म्हणजे तिला काय वाटेल ? नि आपण काय करूं त्या वेळीं ? पण तिला स्पर्श करायचा का ? नि त्या कल्पनेनं मी जागच्या जागीं थिजलों. इतक्या वर्षांनंतर, भेटायचं, नि लिझीला मिठी मारायची नाहीं म्हणजे काय ?

" जड पावलांनी मी पडवीत शिरलो उंबरठ्यावर पाऊल टाकलं व आंत डोकावून बघितलं. टेबलाजवळ लिझी पाठमोरी बसली होती. कशाकडे तरी ती एकाग्रतेने पहात होती. एकदम लक्षांत आलं, ह्या गांवाहून पळालों होतो, त्यापूर्वींच काढलेला तो माझा एकूलता एक रद्दी फोटो होता. मी हळूच हांक मारली ' लिझी ! '

" तिनं चमकून मागं बघितलं. क्षणभरच दृष्टीभेट. ती ओरडत धांवत आली माझ्याकडे.

" ' जॉन, जॉन, आलास का ? '

" तिच्या हांकेने माझे बांध फुटले. पण तरीहि, एका लाकडी ठोकळ्या प्रमाणें मी निश्चल उभा होतों. चेहराहि तसाच होता. आनंदानं बेहोष होऊन धांवत येणाऱ्या लिझीला कवटाळण्यासाठीं मी हात पुढें केले नाहींत. किती अवघड ! पण मी केलं सारं. ती एकदम थबकली. केविलवाण्या स्वरांत तिनं विचारलंः

" ' असं काय करतोस ? '

" तरी मी नुसता दगडासारखा उभा होतो. दुःखा.मुळं शब्द फुटला नाही. लिझी पुन्हां रडक्या स्वरात ओरडली,

" ' बोलत कां नाहीस ? जॉन, काय झालय तुला ? '

" ' माझ्याजवळ येऊं नकोस तूं, लिझी ! ' मी कसं बसं म्हणालो.

" ' कां ? ' तिनं आश्चर्यानं म्हटलं मी बोललो नाहीं. ती वेडयाप्रमाणे जागच्या जागीं निश्चल उभी राहिली. एक हुंदका देऊन ती खुर्चीवर कोलमडून पडली. मी बाहेर सामानाकडे निघून गेलों. "

मध्ये तो थांबला. सांगतां सांगतां त्यानं डोळे पुसले. मी विनायकाकडे बघितलं, तोहि द्रवला होता.

" झालं ! आमच्या आयुष्यांतील सुख संपलं. जीवनाचा उपहास, खरी विटंबना व दुःखं सुरू झाली ! लिझीचं दुःख मला पाहावत नव्हतं. माझ्या विचित्र वागणुकीनं ती आंतल्या आंत कुरतडून निघत होती पण मला तिला सांगण्याचं धैर्य अजून होत नव्हतं. तिचा स्पर्श मी टाळी. तिच्यासमोर एकदांहि हात उघडला नाहीं. सारं डाव्या हातानं करी. त्यामुळं ती जास्तच गोंधळे. कधीमधीं एकांतात मी हात सोडून बघें...नि त्याबरोबर तो दुष्ट डाग मला दिसे. मला वाटतं, तो सारखा वाढत असावा. तें पाहून माझ्या हृदयाचं पाणीपाणी होऊन

जात असे. तिच्याशीं मी जगाभरांतील साऱ्या गोष्टी बोले. पण मूळ गोष्ट सांगण्याचं ठरवतांच लिझीवर भयंकर परिणाम होईल, म्हणून माझं मन थबकून जाई

" अशा प्रकारें पंधरा दिवस निघून गेले, " तो आंवढा गिळून म्हणाला, " लिझीची स्थिति पाहवत नव्हती मला. तिच्या सहनशक्तीची मर्यादा संपूं लागली होती. ती केव्हां कोलमडून पडेल याची भीति वाटे. कित्येकदां मोह उत्पन्न होई. वाटे, धांवत जाऊन तिला हृदयाशीं धरावं पण लगेच !...तो लाल डाग डोळ्यासमोर दिसूं लागे...पण...असं किती दिवस चालणार होतं ? त्यापेक्षां मी सारं कांहीं सांगून टाकून दूर निघून जावं, असं निश्चयानं ठरवलं ...पण तें कांहीच करावं लागलं नाहीं मला. "

" कां ? " विनायकानं मध्येंच विचारलं,

" कारण अखेर तो दिवस लिझीनंच आणला. " तो म्हणाला, " रात्रीचे बारा वाजले असावे. मला वाटतं, लिझी ती रात्र खुर्चीवर बसूनच जागून काढणार होती. किती वेळ तरी बिछान्यांत चुळबूळ केल्यानंतर कुठं माझा किंचित् डोळा लागला. एकाएकीं माझ्या गालाला नाजुक स्पर्श झाला. मी दचकून डोळे उघडले व पुटपुटलों:

" ' कोण लिझी ? "

" ' हं. ' लिझीचा अस्पष्ट आवाज ऐकू आला.

" ' जॉन, आतां मी राहूं शकत नाहीं तुझ्यावांचून ! ' माझ्या कानाशीं ती विव्हळली. माझ्या गळ्याभोंवती तिनं हात टाकले व खांद्यावर मान टाकून दिली. लिझीच्या स्पर्शानं माझ्या हृदयाचे बांध फुटले. भान विसरून मी तिला पोटाशीं घट्ट धरीत, तिच्यावर आयुष्यांत कधीं केला नाहीं इतका प्रीतीचा वर्षाव केला. माझ्या मांडीवर पडून ती आनंदानं रडत होती. मी दुःखानं रडत होतों.

" ' लिझी, हें काय केलंस तूं ? असं वेडयासारखं काय करतेस ? '

" ' तुझं मी आतां कांहींच ऐकणार नाहीं. आज तूं मला सारं कांही सांगणार नसशील, तर मी प्राण देईन, खरंच सांगते-' मी जाणत होतों, हा तिचा कांगावा नव्हता.

" नि त्या दिवशीं मी लिझीला सारं कांहीं सांगून टाकलं केवढा धक्का बसला तिला. तिनं म्हणतांच मी आपला हातहि उघडून दाखवला. त्या दुष्ट डागाकडे पहात ती केवढयानं रडूं लागली... म्हणाली, 'जॉन, ह्यापेक्षां तूं हातापायानं अधू झाला असतास तरी मला बरं वाटलं असतं !'

" त्या नंतरच्या दोन महिन्यांच्या आयुष्यांत मी लिझीच्या गाढ प्रीतीची खरीखुरी विशालता, तीव्रता व सखोलता अनुभवली. पण तिला झालेल्या शोकाची आठवण होतांच माझं मन अजूनही रडूं लागतं. पण काय ? त्या प्रसंगानंतर जेमतेम दोन महिनेही लिझी जगली नाहीं ! व तेव्हांपासून आजतागाईत मी दुःखानं वेडा होऊन भटकत आहे ! झालं, संपलं. अशा रीतीनं आमचं विचित्र आयुष्य संपलं ..फक्त मींच उरलोंय...नि तोही केव्हां गळून पडेन याचा नेम नाहीं ! ." त्याला पुढं बोलवेना. तो उठला. हातानं दिवा उचलला व नेहमीच्या मंद गतीनं जड पावलं टाकीत तो निघून गेला. मी व विनायक निश्चलपणें पहात राहिलों.

*( नोव्हें. १९४७ च्या सत्यकथा मासिकांत. )*

---

# ७. आजीनं गोष्ट सांगितली

तिन्हीं सांजा झाल्या. आजी देवळांतून घरीं आली. पण अगदी हळू हळू चालत. आज त्यांत रोजचा उत्साह नव्हता. चेहरा श्रांत दिसत होता. घराच्या पायऱ्या चढतांना देखील तिला प्रयास पडत आहेत हें कुणालाहि दिसलं असतं. पण तिथं पाहणारं होतंच कोण ? होती फक्त मुलंच. तीं आवारांत खेळत होतीं. सारींजग खेळण्यांत अगदी दंग होतीं. तीं ह्या जगाला विसरून गेलीं होतीं. आवाराच्या कोपऱ्यांत वाळूचा मोठ्ठा ढीग पडला होता. त्यावर बालेकिल्ल्याचं बांधकाम चालू होतं. रघू व विन्या हे दोघे कारागीर. अन् बाकीचे प्रेक्षक.

पण मधूनच रघूचं तिकडे लक्ष गेलं. त्यानं आजीला पायऱ्या चढतांना बघितलं. त्यासरशी त्याचे डोळे विस्फारित झाले. एक कल्पना चमकून गेली मनांत. चेहेऱ्यावर हास्याची लकेर उमटली. त्यानं विनूला कोपरानं डिवचलं. म्हटलंः

" अरे विन्या, आजी आली ना देवळांतून ! "

विनूने उत्सुकतेनं खेळांत गढलेलं डोक वर केलं. " अरे, खरंच ! मग आपल्यासाठी तिनं प्रसाद आणला असेल रे ! " त्यानं साऱ्यांना कल्पना सुचवली.

" चला रे जाऊं या सर्वजण ! " माली ओरडली.

" आजी, आजी, प्रसाऽऽद " सारीं मुलं ओरडत उठलीं. खेळांतून धावत निघालीं अन् आजीला जाऊन बिलगलीं. त्या वेळीं आजी घराच्या पायऱ्या चढत होती, तिनं मुलांकडे बघितलं. पण त्यांना पाहून ती रोजच्याप्रमाणं हंसली नाही.

" आजी, प्रसाद दे न ग " मधूने आर्जवी स्वरांत म्हटलं.

" आज प्रसादच मिळाला नाही ग ? " विन्यानं पदर ओढींत विचारलं.

"नाही, आज किनई देवबाप्पा रागावले,"

मुलांचा विरस झाला. तीं परत जाऊं लागलीं. त्यांना बिचाऱ्यांना काय ठाऊक की आजी आज अर्धवटच कीर्तन सोडून उठून आली होती, तेव्हा कुठला प्रसाद मिळणार? रोज प्रसाद देणारी आजी आज रिकाम्या हातांनी परतली कशी? देवबाप्पा कां रागावले? आजीला त्यामुळंच वाईट वाटत आहे का? इत्यादि भयंकर प्रश्नांनी त्यांच्या चिमुकल्या डोक्यांत थैमान घातलं. पण क्षणभरच! दारावरून जाणाऱ्या वाजंत्र्यांचे सूर ऐकतांच मुलं तेथून केव्हाच पळालीं व सारं क्षणार्धात विसरून गेलीं.

अन् आजीहि पायऱ्या चढून घरांत गेली. तिनं हातपाय धुतले. तुळशी-जवळच्या दिव्यांत तेलवात घातली. देवाजवळ दिवा लावला व पाट ठेवून देवासमोर हात जोडून बसली. तिच्या बाह्यत: गंभीर व शांत चेहेऱ्यावर उदासीनतेखेरीज कसलीहि छटा नव्हती. तीहि ती मोठया कष्टानं घालवून टाकण्याच्या प्रयत्नांत होती. तिच्या अंतःकरणांत गतायुष्यांतील आठवणीचं तुफान उठलं होतं आज. हृदयांतून बेसूर संगीत निघत होतं. त्यांतून तिला कसली तरी स्वर-स्मृति जागृत होत होती. पण ती तिला सोसवेना असह्य झालं म्हणून तिनं डोळे घट्ट मिटून घेतले. हात छातीशी जोडून धरले. तोडानं शब्दांचा उच्चार चालला होता 'मूकं करोति वाचालं,' पण मनाला रडावसं वाटत होतं......

* * *

गांवांत मुरलीधराचं देऊळ होतं. आज अनेक वर्षं झालीं. आजी रोज कीर्तन ऐकायला जाई. कधी खंड पडला नाही त्यांत. अगदी भक्तिभावानं ती सारीं प्रवचनं, कीर्तन, कथापुराणं श्रवण करी. क्वचित् ती म्लानहि दिसे. पण आजइतकी भावनावश ती कधीच झाली नव्हती. रोजप्रमाणं आजहि मुरली-धराच्या देवळांत कीर्तन होतं. सोलापुरचे प्रसिद्ध कीर्तनकार आज कीर्तन करण्यास आले होते. त्यांच्या विद्वत्तेविषयीं सारीजण बोलत होतीं. उत्तरराम-

चरित्रांतील आख्यान लागणार होतं आज. श्रोतृवृंद उत्सुकतेनं वाट पाहत बसला होता. फार वेळ वाट पाहावी लागली नाही त्यांना. अंमळशानं कीर्तनकार आंत आले. कीर्तन करण्यास सुसज्ज झाले. मंदिरातील कार्यवाह शिरस्त्याप्रमाणे उठले त्यांचा परिचय करून देतांना म्हणाले: " आजचे सुप्रसिद्ध कीर्तनकार रामचंद्रराव जोशी हे सोलापूरचे असून......" ते शब्द उच्चारण्याचा अवकाश, आजीच्या मनाला केवढा हादरा बसला ! डोक्यात विचारचक्र सुरू झाल. रामचंद्रराव जोशी - राम...माझा राम हाच असेल का? ज्याच्याविषयीच्या साऱ्या गोड स्मृती आपण महत्प्रयासानं दडपून ठेवल्या होत्या तो हाच का? तिचं मन बेचैन होऊं लागलं. पन्नास वर्षापूर्वीचा राम ..आपली त्याची प्रथम भेट बकुलवृक्षाखाली झाली. त्यावेळी तो चौदा वर्षाचा होता. त्याचे काळेभोर तेजस्वी डोळे आपणांस खूप आवडत. तेच हे डोळे असावेत का? जसं जसं ती वक्त्याचं निरीक्षण करूं लागली तसतशी तिच्या मनाची खात्री पटूं लागली. चाळीस वर्षा-पूर्वीच्या रामच्या चेहेऱ्याचा ठसा हृदयांत कालातरानं पुसट झाला होता. एकाएकी तिला आठवण आली-खरंच, त्याच्या खालच्या ओठाखाली केवढा मोठा तीळ होता. अन् अभावितपणे तिची नजर वक्त्याकडे गेली. त्याच्या ओठाखालचा तो तीळ पाहून तिला एकदम ओळख पटली. हाच आपला राम अं? तिला कुठंतरी खुपत होतं, पण अश्रू येत नव्हते. वयानं मन बोथट केलं होतं ..पण... तिचं डोकं ठिकाणावर नव्हतं.

तिकडे कीर्तन सुरू झालं होतं वक्त्याच्या खणखणीत व ओजस्वी वाणीनं श्रोत्यांना मुग्ध करून सोडल होत. आजीचं मात्र लक्ष नव्हतं. आपला राम आपणांस ओळखणार नाही आतां अन् आतां ओळख देण्यांत तरी काय अर्थ? पन्नास वर्षांपूर्वीच आपण दुसऱ्याच्या झालों. सारं आयुष्य केवळ त्याच्या आठवणीवर घालवलं. आता आपलं आयुष्य संपायलाच आलं आहे. कशाला उगाच पुन्हा जुन्या आठवणी उकरून काढायच्या? कुणाच्या सुखासाठी? त्यांत दोघांचंहि अहितच आहे. तिनं आवंढा गिळला. वक्त्याचं आख्यान चालू होतं.

रामानं सीतेचा त्याग केल्यानंतरहि रामनामाचा अखंड व अव्याहत जप करीत सीतेनं उर्वरित आयुष्य घालवलं. सीतेच्या अंतःकरणाला रामविरहाने होणारे क्लेश व परित्यक्तेच्या अपमानित जीवनाच्या यातना या दोहोंचं वक्ता जेव्हा वर्णन करूं लागला तेव्हा श्रोत्यांपैकी बहुतांश बायकांनी डोळ्यांना पदर लावला. आजीला तर बसवेना. ती मधूनच उठली व घरीं खिन्न अंतःकरणानं परतली. त्याच वेळीं मुलं तिच्या अंगाला येऊन बिलगलीं होतीं.

* * *

देवाजवळ आजी बसली होती खरी. पण आपलं मन तिनं केव्हाच भूतकाळांत भटकण्यासाठी सोडून दिलं होतं. अजून तिच्या भावनांचा वेग ओसरला नव्हता. तरुण मन जास्त लौकर भावनाविवश होतं खरं, पण वृक्ष मनांतील भावनांची धार जरी थोडी बोथड असली तरी त्यांत असहायता असते. दुबळेपणा असतो. तरुण मनाची कठोरता व सहनशक्ति नसते. आजी आपल्या रामविरहाचं जें दुःख तारुण्यांत सहन करूं शकली. आता तिच्यांत असहायता, दुबळेपणा आला होता म्हणूनच आज तिचा राम तिला दिसतांच ती हताश अंतःकरणानं साऱ्या गतायुष्यांतील स्मृतींना दूर लोटीत होती. त्या तिला नकोशा होत्या.

देवाजवळून उठून आजी मुकाट्यानं पलंगावर जाऊन पडली. मुलांचीं जेवणं आटोपायला आलीच होतीं. तीं आजीला पलंगावर पाहतांच भराभर उठलीं, व तिच्या दुलईत एक-एक करून सारीं शिरलीं. दुलईखालून हळू हळू एक-एक डोकं बाहेर डोकावूं लागलं. साऱ्यांचं एकच म्हणणं होतं, "आजी गोष्ट सांग ना!"

अन् आढेवेढे न घेतां आजीनं सांगायला सुरुवात केली.

"एक होती आजी. तिला एक खूप सुंदर नात होती. जशी ही माली माझी आहे ना? तशीच." मालीकडे पाहात आजी म्हणाली. "ती आजीची खूप लाडकी होती. तिला आजी रोज खाऊ द्यायची. पण एका अटीवर. तिनं

आजीला रोज बकुळीचीं फुलं आणून द्यायचीं पुजेसाठी. बकुळीचं झाड गांवाबाहेर होतं. मुलगी रोज संध्याकाळीं फुलं वेचायला जाई. हातांत परडी असे. झाडाखाली पडलेलींच फुलं ती वेची. पण परडी पूर्ण कध्धी भरली नाही. याचा तिच्या मनाला मोठा विषाद वाटे. असं होतां होतां ३-४ वर्षे निघून गेलीं. बकुळीच्या फुलांचे दिवस आले की मुलगी आजीला फुलं आणून देई दरवर्षीप्रमाणे. आता मुलगी दहा वर्षांची झाली. एके दिवशीं रोजप्रमाणे ती फुलं वेचायला गली. रोज खालचींच फुलं वेचण्यापेक्षा आज झाडावर चढून झाड हालवावं म्हणजे खूप फुलं मिळतील असं तिच्या मनानं घेतलं. म्हणून तिनं ओचा बांधला व झाडावर चढूं लागली पण तिचा पाय घसरला, व ती खाली पडली. त्याच वेळीं त्या वाटेनं एक १४ वर्षांचा मुलगा चालला होता. त्याचं नाक तरतरीत, डोळे तेजस्वी, पण वर्ण काळासावळाच. त्यानं तिला पडतांना पाहिलं. तो एकदम धावून गेला. त्यानं तिला वर उचललं. तिला नीट उभं राहतां येईना. म्हणून त्यानं अंमळसं पायाला हातांनी चोळलं, व लुटुपुटूचा जादूचा मंत्र म्हणतांच मुलगी हसली. तिचा पाय एकदम बरा झाला. मग मुलगा झाडावर चढला. त्यानं खूप फुलं पाडलीं. दोघांनी मिळून फुलांनी परडी भरली. अगदी गच्च. मुलगी आनंदानं पळत पळत निघून गेली. परडी गच्च भरलेली पाहतांच आजीनं विचारलं, ‘ आज इतकीं फुलं कशीं ग मिळालींत ? ’ मुलीनं कांहीच सांगितलं नाही.

इकडे तो मुलगा घरीं गेला. पण त्या दिवशींपासून त्याची प्रकृति बिघडली. घरच्या माणसांना वाटलं कुणीतरी जादुटोणा केला मुलावर. त्यानं खाणंपिणं सोडलं. तो वेडयासारखा दिवसभर बसला राही. जणूं कांही संध्याकाळचीच वाट पाहत बसे. दिवस बुडतांच चोरटेपणें तो बाहेर निघून जाई, व बकुळीच्या झाडाखाली येऊन बसे.

रोज संध्याकाळीं मुलगी फुलं वेचायला गेली की तो मुलगा झाडावर बसलेला दिसे. झाडाला खूप हादरून त्यानं फुलं पाडावीं अन् मुलीनं तीं वेचावीं.

त्यानंतर बकुळीच्या बुंध्याशीं दोघंजण खूप गोष्टीं करीत बसत, व शेवटीं आपापल्या घरी जात. असा क्रम असे. असे होतां होतां त्या दोघांची विलक्षण गट्टी जमली."

अंमळसं थांबून आजीनं मुलांकडे बघितलं. त्यांचे विस्फारित डोळे व अर्धवट उघडीं तोंडं त्यांचीं तल्लीनता दर्शवीत होतीं. तिनं पुन्हा सुरवात केलीः

"एके दिवशीं मुलीने सुंऽदर नवे कपडे घातले तेच कपडे संध्याकाळीं घालून ती फुलं वेचायला गेली. मुलांनं तिला लांबून येतांना बघितलं. आज नवे कपडे घातल्याबद्दल तिच्या पाठींत नऊ टोले हाणण्यास सापडतील या कल्पनेनं त्याच्या चेहेऱ्यावर मिस्किल हास्य झळकलं. ती जवळ येतांच पटकन तो झाडावर चढला. फुलं खाली पाडलीं. गोष्टी करायला तीं दोघंजण झाडाखाली बसलीं तेव्हा मुलगा चिडवीत म्हणाला, 'आहेऽबुआऽऽआज एका माणसाची शान!'

'हट्, चावट कुठला!' तिनं त्याला चिमटा काढीत म्हटलं.

'कधी घेतली ही साडी तुला?'

'तुला ठाऊक नाही का? साखरपुडयाची साडी आहे ही.' तिनं अभिमानानं सांगितलं.

मुलानं विचारलं, 'कधीं झाला साखरपुडा?'

मुलीनं म्हटलं, 'परवां.'

"मुलाला वाईट वाटलं. तीं दोघंहि आपापल्या घरीं निघून गेली."

"कशाचं वाईट वाटलं, आजी?" रघूविन्यांनी मध्येच विचारलं. आजीनं सुस्कारा सोडला. "तें आत्ता समजायचं नाही तुम्हांला." आजीनं वेळ मारून नेली. इवलीशीं पोरं. त्यांना साखरपुडयाचा अर्थ कळला नाही. पुढं गोष्टीचा शेवट काय होतो हें जाणण्यासाठी तीं सारीं उत्सुकतेनं दुलईतून माना वर करून ऐकत होतीं.

" दुसरे दिवशीं मुलगी झाडाखाली आली. तिला मुलगा दिसला नाही. तिला कसंसंच वाटलं. मुकाटयानं तिनं झाडाखालचीं फुलं वेचलीं, व परत जाणार इतक्यांत तो तिला येताना दिसला. त्या क्षणीं तिला खूप आनंद झाला. तो येतांच तिनं त्याचा हात धरून विचारलं, ' आज किती उशीर केलास तूं ? ' मुलगा त्यावर कांहीच बोलला नाही. त्यानं खिशात हात घालीत म्हटलं, ' आज मी एक जम्मत आणलीय तुझ्यासाठी. ओळख पाहूं ' मुलगी अधीर झाली. तिला ओळखतां आलं नाही. शेवटीं तिनं ते पुडकं त्याच्या हातून हिसकून घेतलं, व उघडून पाहिलं. तों आंत एक छोटीशी चंदनाच्या लाकडाची रामचंद्राची मूर्ति ! तिला खूप आवडली ती. तिनं तें पोलक्याच्या खिशांत जपून ठेवली. त्या दिवशीं ती दोघं झाडाखाली खूप वेळ बसलीं. पण मुलगा तिच्याशीं धड बोलेना. मुलीनं त्याला दोनतीनदा विचारलं, ' आज तू बोलत कां नाहीस ? ' ' माझ्यावर रागावलास का ? ' ' तुला घरीं कोणी राग भरलं का ? ' प्रत्येक वेळीं त्यानं ' नाही ' म्हणून मान डोलावली. शेवटीं तो उठला. त्यानं तिला सांगून टाकलं एकदाचं, ' आजपासून आपली गट्टी मोडली. ' मुलीला याचा अर्थच कळेना. तिला एकदम रडूं कोसळलं. दोन्ही हात तिनं डोळ्याला लावले व रडूं लागली. मुलगा तेथून निघून गेला.

दुसरे दिवशीं मुलगी झाडाखाली येऊन बघते तों तिथं मुलगा नव्हताच. तिनं खूप वाट बघितली. पण तो शेवटपर्यंत आला नाही. तिला खूप वाईट वाटलं. ती बराच वेळ रडत बसली. त्या दिवशी तिनं फुलं वेचली नाहीत. तशीच रिकामी परडी घरीं नेली. तें पाहून आजी खूप रागावली तिला. पण तिनं तोंडावाटें शब्द काढला नाही. दुसरे दिवशीपासून ती कधी फुलं वेचायला गेली नाही.

पुढे कांही दिवसांनी तिचं दुसऱ्या एका गांवांतल्या मुलाबरोबर लग्न झालं. ती सासरीं गेली. पुढे तिला मुलं झालीं नातवंडं झालीं. पण ती त्याला विसरली नाही. रोज नेमाने ती त्या मूर्तीची पूजा करी.... त्याचीं आठवण म्हणून... "

आजीची गोष्ट संपली. आजी दूर कुठंतरी विमनस्कपणे पहात होती. नि मुलं तिच्याकडे आश्चर्यानं बघत होतीं. त्यांना त्याचा कांहीच अर्थ कळला नाही. भीत भीत विन्यानं आजीला विचारलं. 'आजी, गोष्टींतल्या मुलाचं नांव काय ग ?"

" राम."

" अन् मुलीचं ?" मालीनं म्हटलं.

" जानकी." आजी हळूच म्हणाली.

" आम्हाला आजची गोष्ट समजलीच नाहीं, आजी !" रघू कुरकुरत म्हणाला.

" तुमच्याप्रमाणंच त्या गोष्टींतल्या मुलांना देखील त्यांची स्वतःची गोष्ट समजली नव्हती, बाळांनो !" आजी विमनस्कपणें म्हणाली, सारी मुलं तिच्या चेहऱ्याकडे बघत होतीं.

*( ही कथा प्रथम 'अभिरुचि' मध्ये प्रसिद्ध झाली )*

# ८. टेलिफोनवरचं प्रेम

" हॅलो ऽऽऽ " ...

" हं. मी. श्रीपाद कुलकर्णी बोलतोंय् ... "

" कोण ? " ( किंचित् आश्चर्यानं ) एक बारका आवाज.

" श्रीपाद कुलकर्णी ... ( जास्त ठासून ) पण आपण कोण ? "

" मी नंदिनी चोरघडे-हें बघा आपण कुठून बोलतांहांत ? आपला नंबर ? "

" मी माझ्या घरूनच बोलतोय- ' कलाकुंजा 'तून. नंबर ५२७...कोण हवंय आपल्याला ? "

" ओ ! सॉरी. चुकून रॉंग नंबर लागला. मला २३० पाहिजे होता. बरं, माफ करा हं ? " ' खट्ट् '. श्रीपादनेहि फोन खाली ठेवला.

* * *

दुसऱ्या दिवशीं-

" हॅलो ऽऽ ? " तोच बारका आवाज.

" यस, मी श्रीपाद कुलकर्णी आहे. कोण बोलतंय ? "

" मीच ! नंदिनी चोरघडे- "

" कां ? आज पुन्हा रॉंग नंबर लागला का कालच्याप्रमाणं ? "

" नाहीं. आज मुद्दामच रिंग-अप केलं. "

" तें कसं काय ? "

" त्याचं असं झालं ... काल तुम्हीं आपलं नांव सांगितलंत, तेव्हा चटकन् ध्यानांत आलं नाही ... पण मागाहून आठवलं. ' रातराणीची फुलं ' व ' दुरंगी दुनिया ' इत्यादि कादंबऱ्याचे लेखक कुलकर्णी ते तुम्हीच ना ?

" होय, कां ? "

" कांही नाही. त्या दोन्हींहि माझ्या अत्यंत आवडत्या कादंबऱ्या आहेत. फारच अप्रतिम वाटतात मला त्या ! "

" फार आभारी आहे. "

" खरंच. 'दुरंगी दुनियें'तील 'टेक्निक' फार सुंदर आहे. परंतु, 'रातराणीचीं फुलं' यातील कथानक व संवादहि अगदी कलापूर्ण आहेत ! मी तीनचारदा वाचलीं तीं पुस्तकं... बाकी मला स्वप्नांतहि कल्पना नव्हती..."

" काय ? "

"की आपल्या आवडत्या लेखकाची भेट अशी अनपेक्षितपणें होईल म्हणून ! "

" वा ऽ ऽ ! नशीब आमचं. "

" खरंच, केव्हापासून कादंबऱ्या लिहूं लागलांत तुम्ही ? "

" पंचविसाव्या वर्षी एम. ए. झाल्यानंतर. तेव्हापासून आतापर्यंत हा पांचसहा वर्षांचा अनुभव आहे. "

" अस्सं ! " ( एकीकडे ) म्हणजे तिशीचं वय आहे स्वारीचं. ( फोनवर ) " एवढया अल्पावधींत मिळालेलं यश अप्रतिमच म्हणायचं. पण खरंच, एक विचारूं का ? सांगाल ? "

" हो, विचारा की... "

" तुमची कादंबरी लेखनाची पद्धत व त्या बाबतींतले अनुभव सांगूं शकाल का ? "

" हो, खुश्शाल ! त्यांत काय आहे ? पण मला असं वाटतं, मिस चोरघडे... फार वेळ फोन अडकविणं ठीक नव्हे...पुढं सांगीन कधीतरी. खरंच पण, तुमचा नंबर ? "

" ४५६. "

" बराय्... "

* * *

" हॅलो ऽऽ? "

" कोण पाहिजे तुम्हांला ? " एक अनोळखी आवाज.

" श्रीपाद कुलकर्णी आहेत का ? "

" नाही, ते बाहेर गेले आहेत. "

" बरं, त्यांची पत्नी तरी ? " नंदिनीनं खडा टाकून पाहिला.

" पत्नी ? कुठली ? आमच्या मालकाचं अजून लग्न कुठं झालंय ? "

" अस्सं ! " तिच्या चेहऱ्यावर समाधानाची छटा दिसत होती.

" मालकांना काय नांव सांगायचं आपलं ? "

" कांहीच सांगायचं नाही. "

" खट्ट् .... "

* * *

" हॅलाव ऽऽऽ " श्रीपादचा जाडा पण मधुर आवाज.

" कोण ? कुलकर्णी का ? मी नंदिनी आहे. "

हो, मी श्रीपाद. परंतु काय हो, मिस चोरघडे, तुम्ही फार लबाड आहांत ? "

" इश्श ! हे सांगण्यासाठीच का फोन केलात ? अन् मी कोणती लबाडी केली ? "

" ' पंकजा ' या टोपण नांवाखाली तुम्ही कविता लिहीत असतां म्हणे ? ".

" अं ?...ह. बरं, त्यांत लबाडी कसली ? "

" नि मला ह्याचा पत्ताहि लागूं दिला नाहीत तुम्ही काल ? "

" हात्तीच्या, एवढंच ना ? "

" हो. एवढंच !...बरं पण, केव्हापासून कवियत्री झालां तुम्ही ? "

" तीनचार वर्षांपासून. "

" खरंच, तुमच्या कवितांतून वाहणारी भावनांची तीव्रता पाहून मला काय वाटत असे ठाऊक आहे का ? "

" काय ? " नंदिनी आनंदानं बेहोष झाली होती.

" माझ्या कल्पनेसमोर कवियत्रीचं म्हणून एक चित्र उभं राहात असे–कविता करणारी कवयित्री कदाचित् अशी असेल असं मला वाटे. "

" कशी ? तुमचा कल्पनेंतल्या कवियत्रीचं वर्णन तर ऐकूं द्या. तें माझ्याशीं कितपत जुळतंय तें मी बघीन. "

" मला वाटे... एक नाजुकशी, लहानसर, सुंदर जिवणी असलेली, काळी सावळींच पण विलक्षण भावनायुक्त नजर असलेली, मोठया डोळ्यांची एक तरुणी... म्हणजेच ह्या सुंदर कविता करणारी ' पंकजा ' असावी ! "

उत्तरादाखल नंदिनीकडून श्रीपादला कांहीच ऐकूं आलं नाही.

" कां, बोललां नाहीत ? कितपत वर्णन जुळतंय् ? की ह्यापेक्षांहि सुंदर... "

" छट्... कांहीतरीच ! नि मला तुम्ही कसे आहांत म्हणून जें वाटतं तें सांगूं कां ? "

" हो, सांगा की ! " श्रीपादनं कान टवकारले.

" पण नकोच, मी नाही सांगत बाई ! बाकी पुरुष कसेहि असले दिसायला तरी त्याचं काय ? "

" असं तुमचं प्रामाणिक मत आहे ? "

" अर्थात्...पण खरंच, ती पहा आई हांका मारायला लागली ...बराय्, बाय बाय् "

* * *

" हॅलाव ऽऽ ? "

" कोण ? श्रीपाद का ? "

" हो, मीच. कां, आज इतका जडसा आवाज की ? "

" कांही नाही, उगीच! पण, तुम्ही किती दिवसांनी भेटतांहांत. जवळ-जवळ ह्या आठ दिवसांत... "

" हो. गांवाला गेलो होतों... "

" मी दोन तीनदां फोन केला होता... "

" नोकरानं सांगितलं मला नि म्हणूनच पहा. सरळ टांग्यांतून उतरलों नि बसलों इथे तुमच्यापाशीं गोष्टी करायला. "

" अगबाई! हो कां? मग बारा वाजून गेले नां? तुम्हांला भूक लागली असेल?"

" हो, पण काय? पडितचं अजून आटपायचंच आहे. "

" खरंच, नुसत्या नोकर माणसाच्या भरवंशावर किती हेळसांड होत असेल, नाहीं?"

" हं... पण काय करायचं?"

" बरं तर... आतां लौकर जा तुम्ही आंघोळीला वगैरे...... मग पुढं सावकाश बोलूं. अन् हे पहा...प्रवासांत प्रकृति वगैरे तर ठीक राहिली ना?"

" हो, राहते बिचारी ठीकच! तिला ठाऊक आहे ना!... आपली काळजी करायला दुसरं कोणी नाही..."

" बरं... बरं... जा आतां जेवायला "

* * *

एक महिन्यानंतर. रात्रीं नऊ वाजतां.

" किर्रर! किर्रर! किर्रर " नंदिनीनं धांवत जाऊन फोन उचलला.

" नंदिनी..."

" अय्या ऽऽ! श्रीपाद? एवढ्या रात्रीं!"

" हो. आज भलती वेळ वाटली असेल ना! पण काय करूं? "

कां? कांही झालं वाटतं?" जरा घाबरतच.

" तसं कांही झालं नाही म्हणा..."

" इश्श ! ( हायसं वाटून ) किती घाबरलें मी ! "

" कांही नाही... आज उगाच करमत नव्हतं. म्हटलं, रात्र झालीय, तरी बोलावंच तुझ्याशीं ! "

" नि खरं म्हणजे आज संध्याकाळपासूनच मलाहि कसंसंच वाटत होतं... तुमची आठवण..."

" संध्याकाळ झाली, म्हणजे मलाहि असंच एकटं वाटतं. खरंच नंदिनी तुला एक विचारूं का ? "

" विचारा ना ! "

" या दोन महिन्यांत आपण फक्त फोनवरूनच बोललों. एकमेकांची फक्त अंतःकरणंच जाणलीं. आतां मात्र तुला प्रत्यक्ष भेटावंसं वाटतं.... तुला नाहीं वाटत असं ? "

" शक्य तरी आहे का असं ? पण..."

" पण काय नंदिनी ? "

" श्रीपाद, मला कोणजाणं कां...एकदम भीति वाटते याची. त्या भीतिमुळं तुम्हांला डोळे भरून पाहण्याची माझी तीव्र इच्छाहि मरून जाते. वाटतं, आपण एकमेकांना प्रत्यक्ष शरिरानं ओळखण्यापेक्षा असंच जन्मभर हृदयानंच ओळखीत राहावं-हृदयानंच असंच प्रेम अक्षय करीत राहावं ! "

" नुसती कवि रे कवि !...नंदिनी, तूं इतकी वेडी कशी ? तूंच मनाशी विचार कर, जन्मभर एकमेकांना न भेटतां आपली प्रीतिं जिवंत राहूं शकते का ? नि नुसत्या ह्या टेलिफोनवरच्या प्रेमानं तुझ्या मनाचं समाधान होईल का ? मग देवानं हीं शरीरं तरी कशाला दिलीं असतीं ? "

" बरं मग...म्हणणं तरी काय तुमचं ? "

" म्हणणं एवढंच की... तूं त्या ××× पार्कात ये ना, उद्या संध्याकाळीं सहा वाजतां ? तूं त्या डावीकडच्या लताकुंजांत जाऊन बैस; मी ठीक वेळेवर येईन. आहे कबूल ? "

" .. तुमचा इतका आग्रहच असेल तर येईन. "

" हो अवश्य नंदिनी ! तुला खूप भेदरवंसं वाटतं आतां ! बरं पण तुला मी ओळखायचं कसं ग ? "

" बरं, मी केशरी, निळ्या काठाची साडी नेसून येईन. "

" उशीर करूं नकोस हं ! "

" नाही. पण तुम्ही कसे दिसाल ? "

" उद्यांच बघ आतां ! बरं, नंदिनी, उद्यां संध्याकाळपर्यंत बाय बाय ! "

नंदिनीनं सुस्कारा सोडला. पण फोन बंद झाला होता.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं सहाचा सुमार. अंदाजे तेवीस वर्षांची एक तरुणी लगबगीनं पार्कात शिरली. पण तिच्या पावलांत प्रियकराच्या प्रथम भेटीचा आल्हाद किंवा चोरटेपणा नव्हता. जडपणानं ती पावलं टाकीत होती. अंगावर केशरी रंगाचं पातळ व त्याला निळे रुंदसे कांठ. तिनं चौफेर नजर टाकली. येणारेजाणारे तिच्या चेहऱ्याकडे पाहात, क्षणभर थबकत, व मग पुन्हा पुढे जात. लगेच ती डावीकडच्या लताकुंजाकडे वळली व कुणाची तरी मार्गप्रतीक्षा करीत बसली.

अमळशानं तिशीबत्तिशीचा एक तरुण कुंजाजवळ आला. तलम धोतर, अंगांत बंगाली कुर्ता, डोळ्यांना चष्मा पण रंग कोळशाला लाजविणारा व वरचे दात खालच्या ओठांवर येऊन बसलेले. त्या तरुणीनं क्षणभर त्याच्याकडे पाहिलं व अंग शहारल्यासारखं केलं व ती पुन्हां बाहेर पाहूं लागली.

थोड्या वेळानं तोच तरुण पुन्हा तिथं आला. त्या वेळीं तिचं लक्ष नव्हतं. ती खाली मान घालून विचार करीत बसली होती. किंचित् घुटमळत शंकेच्या स्वरांत तो म्हणाला.

"माफ करा हं! पण आपलं नांव?"

"अं?" ती केवड्यानं दचकली. तो आवाज तिच्या रोजच्या परिचयाच होता. एकदम मान वर करून ती त्या तरुणाकडे पाहात जागच्याजागीं खिळल्याप्रमाणं बसून राहिली. तिनं अडखळत उत्तर दिलं.

"मी...मी...नंदिनी चोरघडे!"

"काय म्हणालांत?" तो आश्चर्यानें ओरडला. क्षणभर आपल्या डोळ्यांवर त्याचा विश्वासच बसेना. त्याच्यासमोर देवीच्या व्रणांनी विद्रूप झालेली जाड ओठाची, बारीक डोळ्यांची एक तरुणी बसली होती.

पण प्रसंगावधान राखून त्यानं "माफ करा हं," एवढे शब्द म्हटले व तो तेथून वाऱ्यासारखा निघून गेला!

व तिनंहि त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ढुंकूनसुद्धां पुन्हां बघितलं नाही.

*(सप्टेंबर १९४८ च्या 'स्त्री' मासिकांतून)*